# कृष्ण परमात्मा

2



श्रीपरमानंदस्वामी

“ ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ? ”

कोमल प्रकाशन

नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून
उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

भाग-२

**श्री. अविनाश मोरेश्वर लिमये**
**एम्. एस्सी.**
**उर्फ**
**श्रीपरमानंदस्वामी**








- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

सर्व हक्क : **©सौ. अनुपमा अविनाश लिमये**



१३, नावलकर बिल्डिंग, न. चिं. केळकर रोड,
दादर, मुंबई ४०० ०२८.
दूरध्वनी : ०२२-२४३६ १५१४
मोबाईल : ९९६९८ ७६८५०



ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane (w) 400604.
7710980841
https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks
प्रकाशन :३० जून २०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे,

**।।श्री।।**

साहित्यसिन्धोः बहुनि सन्ति

रत्नानि दिव्यानि सुभाषितानि ।

कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं

सुभाषितं मंगलमेव पुण्यम् ।।

श्रीअवधूतस्वामी

**अर्थ**

साहित्यरूपी सिंधुमध्ये

सुभाषितरूपी असंख्य दिव्य रत्ने आहेत.

परंतु

कृष्णाच्या हृदयाचे गुणगान करणारे वाक्य

हेच मंगलदायी आणि

पुण्यकारी सुभाषित आहे.







## ।।कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं।।

**‘कृष्ण सखा माझा’** हा ग्रंथ २००४ साली श्रीगुरूपौर्णिमेच्या शुभदिनी प्रकाशित झाला. त्यामध्ये कृष्णाच्या गोकुळातील जीवनापर्यंतचेच वर्णन करून झाले होते. त्याच वेळी तो ग्रंथ म्हणजे ‘कृष्णचरित्राच्या गायनातील एक ‘थांबा’ किंवा ‘विराम’ आहे’ असे म्हटले होते आणि ते खरेच होते. कारण कृष्णचरित्राला अंतच नाही आणि म्हणूनच त्याला पारही नाही. कृष्णावताराची समाप्ती झाली तरी कृष्णचरित्र मात्र संपत नाही आणि संपणारही नाही. ते संपूच शकत नाही.

सगुण प्रेमभक्तीचे प्रतीक असलेली अशी ही कृष्णमूर्ती अनेक भगवद्भक्तांच्या हृदयामध्ये सद्गुरूकृपेमुळे स्थापित झाली. **‘सगुण सद्गुरू तोची तो श्रीहरी’** या भावाने त्यांच्याकडून घडलेल्या सद्गुरूभक्तीचेच ते अमृतफळ होते. त्या रसाळ अमृतफळातून नित्य स्त्रवणाऱ्या मधुर प्रेमरसाच्या सेवनाने अंतःकरणाला तृप्ती व समाधान लाभूनही, त्याच्या सेवनाची गोडी त्या भक्तांच्याठायी वाढतच राहिली. स्वतःच्याच ठायीच्या त्या प्रेमरसाचे सेवन करून त्याचा आनंद घेता यावा, या एकमेव आंतरिक आर्ततेतूनच त्या भगवद्भक्तांकडून नारायणाच्या सगुण प्रेमभक्तीचे गायन उत्स्फूर्तपणे घडू लागले. त्यासाठी नारायणाचा पूर्णावतार म्हणून संबोधिलेल्या कृष्णाचे अवतारचरित्र हाच सर्व भक्तांच्या भक्तिगायनाचा एकमेव विषय झाला.

कृष्णचरित्र हा केवळ इतिहास नाही. त्यामुळे एक इतिहास म्हणून सुसूत्रपणे त्याचे वर्णन करता येणे जसे शक्य नाही, तसे ते आवश्यकही नाही. कृष्णचरित्र हे एक अत्यंत अद्भुत असे रसायन आहे, ज्यामध्ये प्रेमरस, भक्तिरस व ज्ञानरस यांचा मिलाफ होऊन झालेला एकीएक आनंदरसच पूर्णपणे भरलेला आहे. हा आनंदरस प्राशन करण्याच्या हेतूने भगवद्भक्तांनी कृष्णाच्या जीवनातून प्रगटलेले त्याचे अंतःकरण हेच प्रमाण मानून, त्याचेच व्यवधान घेतले आणि तेच लक्ष्य मनःचक्षूंसमोर ठेवून त्याचाच ध्यास चित्ताठायी धरला. अंतःकरणाच्या या आर्त अवस्थेतूनच त्या भक्तांकडून कृष्णाचे भक्तिगायन घडले असता, कृष्णाच्या अंतरीचे गुज त्यांच्यासाठी उलगडत राहिले आणि त्यांच्या अंतरात कृष्णप्रेम अधिकाधिक रंगत राहिले. त्यामुळे त्या भक्तांचेही अंतःकरण कृष्णाच्या अंतःकरणासारखेच झाले. म्हणजेच कृष्ण हाच त्यांचे अंतःकरण होऊन राहिला. सर्वांच्याठायी आत्मरूपाने असलेला हा **कृष्ण परमात्मा** त्याच्या भक्तांच्याठायी त्यांचा **प्रेमात्मा** होऊन राहिला. त्या भक्तांनाच कृष्ण खऱ्या अर्थाने पावला आणि त्यांच्यावर तो सदासर्वकाळ प्रसन्न होऊन राहिला.

गोकुळामध्ये असताना बालपणापासूनच कृष्णाची प्रेमस्वरूप अवस्था प्रगट होत राहिली. त्या अवस्थेतूनच कृष्णाकडून शुद्ध प्रेमाची देवाणघेवाण घडत राहिली खरी, परंतु कृष्णाला त्याचा योग्य व खरा प्रतिसाद मात्र पेंद्याच्या निरागस प्रेमाच्या रूपाने अंशतः आणि राधेच्या भक्तिभावाच्या प्रेमरूपाने पूर्णतः मिळाला. राधेच्या भक्तिभावाचीच पूर्ती, ती राधा कृष्णस्वरूप होऊन राहण्यामध्ये झाली. कृष्णचरित्राची ही सुरुवातच मुळी एवढ्या परमोच्च बिंदूने झाली, की कृष्ण म्हणजे केवळ गोकूळ असे समीकरण झाले आणि कृष्णचरित्र म्हणजे फक्त **'राधाकृष्ण ऐक्य'** एवढीच भावना सर्वसाधारणपणे सर्वांचीच होऊन राहिली. परंतु कृष्णाचे गोकुळातील वास्तव्य जरी विशेषत्वाचे होते, तरी ते काही कृष्णाचे संपूर्ण जीवन नव्हतेच. कृष्णाच्या एकूण सव्वाशे वर्षांच्या आयुष्यातील सुरुवातीची केवळ बारा वर्षेच कृष्ण गोकुळामध्ये होता, ही वस्तुस्थिती आहे. त्याचे पुढील सर्व जीवन हे अत्यंत व्यापक व अनेकविध घटनांनी पुरेपूर भरलेले आहे.

कृष्णाच्या पुढील जीवनात अनेक व्यक्ती त्याच्या जवळ आल्या खऱ्या, पण त्यांच्यापैकी कोणाच्या जीवनात कृष्ण आला, कोणाच्या जीवनात कृष्ण येऊन राहिला आणि कृष्ण कोणाचा कायमचा होऊन राहिला? असा विचार केला असता, सुदामा, रुक्मिणी, अर्जुन, द्रौपदी व उद्धव अशी काही नावे लागलीच दृष्टीसमोर येतात. त्यांचा कृष्णाच्या जीवनात व कृष्णाचाही त्यांच्या जीवनात विशेष भावनिक संबंध आला होता. रुक्मिणी ही पत्नी या नात्यापेक्षाही कृष्णाची **'आत्मसखी'** म्हणून, अर्जुन हा अत्यंत प्रेमाचा मित्र म्हणून, तर द्रौपदी ही प्रिय सखी म्हणून कृष्णाच्या अधिक जवळचे होते, हे तर नक्कीच! सुदामाही कृष्णाचा गुरूबंधू या नात्याने थोडा वेळ का होईना, पण कृष्णाच्या अत्यंत जवळचा झाला होता. सुरुवातीला केवळ कृष्णाचा सहकारी व जोडीदार म्हणून असलेला उद्धव हाही कृष्णाच्या जीवनातील अंतिम पर्वात कृष्णाच्या अत्यंत प्रेमाचा झालेला होता. या सर्वांनाच कृष्णाचा सहवास व प्रेम यांचा लाभ झाल्यामुळे कृष्णाचे माहात्म्यही जाणण्याची संधी जास्त होती. कारण या सर्वांच्या प्रत्यक्ष जीवनाशीही कृष्णाचा अत्यंत जवळचा संबंध आलेला होता. या सर्वांनी कृष्णाचे प्रेम तर निश्चितच अनुभवले, पण त्यांच्यापैकी कोणा कोणाकडून कृष्णाला किती किती व कसे कसे प्रेम मिळाले असेल आणि त्यांच्याकडून कृष्णाच्या अंतरातील प्रेमभावाचीही पूर्ती झाली असेल का?

कृष्णाच्या पुढील धावपळीच्या जीवनामध्ये त्याच्या अंतःकरणातील मूळ प्रेमस्वरूप अवस्था प्रगट होण्यासाठी त्याला काही संधी मिळाली की नाही? **ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करून ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. त्याच्या पुढील जीवनात अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही? अधर्माचा नाश करून सद्धर्माची स्थापना करण्यासाठी धर्मकार्याचे कंकण हातात बांधून, सर्व जीवन त्याच हेतूने व ध्येयाने जगणाऱ्या कृष्णाला, त्याचेच धर्मकार्य समर्पित भावाने करणारा कोणी वारसदार पुढे भेटला की नाही? मुख्य म्हणजे, खरेच अधर्माचा समूळ व पूर्ण नाश होऊन सत्य धर्माची स्थापना झाली का? आणि तशी झाली असल्यास, ती निश्चितपणे कोठे झाली?**





या सर्व प्रश्नांच्या सविस्तर व सोदाहरण उत्तरांमध्येच कृष्णाच्या पुढील जीवनाचा पूर्णपणे उलगडा होईल आणि त्याच्या अंतरातील गुज स्पष्टपणे प्रगट होईल. या सर्व प्रश्नांची खरी उत्तरे शोधून काढायची, तर त्यासाठी केवढातरी अभ्यास करणे व केवढेतरी संशोधन घडणेच आवश्यक आहे. पण हा अभ्यास व हे संशोधन, बुद्धीने व शब्दज्ञानाने कधीच होणार नाही. अनेक ग्रंथांचा वा शास्त्रांचा शोधक अभ्यासही यासाठी जराही कामाला येणार नाही. कारण हे संशोधन कृष्णाच्या त्या अंतःकरणाचे आहे, जे मनाच्या सर्व कल्पना व विचार आणि बुद्धीची सर्व जाण व तर्क यांच्या पलिकडचे आहे. त्यासाठी केवळ आत्मसंशोधनाचीच आवश्यकता आहे. पण त्या आधी कृष्णच अंतःकरण झालेला असावा आणि कृष्णाचे प्रेमस्वरूप हे हृदयच होऊन राहिलेले असावे. तरच हे संशोधन शक्य होईल आणि कृष्णाच्या अंतरीचे गुज हे अंतःकरणात प्रगट होईल. तेव्हाच कृष्णाचे सर्व जीवनही खऱ्या अर्थाने जाणता येईल आणि कृष्णरूपाने प्रगटलेला **परमानंद** हा आपल्याही अनुभवाचा होऊन राहील.

या सर्वाचा अंतर्मुख होऊन विचार केला असता, कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत जाण्याचा मार्ग मोकळा होऊन स्पष्टपणे नजरेसमोर दिसू लागतो. कृष्णचरित्राबाबतीत अनेक कथाप्रसंग प्रगट आहेत. त्यातील काही पौराणिक म्हणजे रचलेले आहेत, काही पारंपारिक म्हणून प्रचलित झालेले आहेत, तर कित्येक केवळ काल्पनिक आख्यायिका म्हणून सुचलेले आहेत. त्यातूनही त्या कथा सांगण्यामागील अंतःस्थ हेतू बहुतेक वेळा पूर्णपणे झाकोळला गेलेला आहे. व्यास महर्षींनी लिहिलेले **'महाभारत'** हे सुद्धा मुलतः काव्यच आहे. त्यामुळे त्यामध्येही वस्तुस्थितीचा व इतिहासाचा भाग किती आहे, हाही काही वेळा चर्चेचा किंवा वादाचाही विषय होऊन राहिलेला आहे. परंतु **'महाभारत'** लिहून पूर्ण झाल्यावरही व्यासांच्या मनामध्ये एक प्रकारची अस्वस्थता व उदासीनता आली आणि त्यावेळेस व्यासांचे परमगुरू श्रीनारद महर्षी यांच्या सांगण्यावरून व्यासांनी **'भागवत'** हा ग्रंथ लिहिला. तेव्हाच व्यासांच्या मनाला शांती व समाधान लाभले. एवढेच नव्हे, तर व्यासांचे अंतःकरण अत्यंत प्रसन्न व आनंदी झाले. यातून एकच भावार्थ अगदी स्पष्टपणे जाणवतो, की जेथे सगुण प्रेम व भक्ती यांचे गायन आहे, तेथेच आनंदाचा अनुभव आहे. कारण त्या ठिकाणी प्रत्यक्ष भगवंतच प्रगट आहे. **महाभारत** हा **'जय नावाचा इतिहास'** आहे, तर **'भागवत'** ही भक्तिभावाची **'यशोगाथा'** आहे.

**'महाभारत'** काव्यातही ज्या ज्या प्रसंगात कृष्णाचा सहभाग आहे आणि जे जे प्रसंग कृष्ण व त्याच्या प्रेमीजनांमध्ये घडलेले आहेत, त्याच ठिकाणी व त्याच वेळी भावपूर्णता आलेली आहे. कृष्णाच्या वागण्या-बोलण्यातून त्याच्या प्रेमीजनांविषयी प्रगट झालेले त्याचे विशेष प्रेम आणि त्यातूनच प्रगटलेले व त्यांना जाणवलेले कृष्णाचे माहात्म्य हेच त्या ठिकाणी आनंदाचे कारण ठरलेले आहे. तेव्हा **'भागवता'**चे मूळ हे **'महाभारता'**तच लपलेले आहे. जसे दुधामध्ये लोणी दडलेले असते, फक्त त्या दुधावरती प्रक्रिया करून व मंथन करून ते लोणी हे दुधातूनच काढून दुधापासून वेगळे केले जाते, तसेच **'महाभारता'**तील **'भागवत'** शोधून काढून जर त्याचे सेवन केले, तर ईश्वराच्या सगुण प्रेमभक्तीचा आनंद हा अत्यंत सहजपणे व सुलभतेने लाभतो. **'महाभारता'**मध्ये कृष्णाचे स्थान हे ध्रुव ताऱ्यासारखेच अढळ आहे. त्याच्याकडे लक्ष ठेवून त्यालाच लक्ष्य केले असता, सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे मिळून मनाला समाधान प्राप्त होते आणि त्या कृष्णाच्या दिशेनेच मनाचा आनंददायी प्रवास सुरू होतो. हीच महत्त्वाची गोष्ट लक्षात आल्यावरती व त्याचा निश्चय झाल्यावरती तोच ध्यास चित्ताठायी निर्माण होतो आणि सर्व विचारांची व सर्व लिखाणाची दिशा व हेतू हे दोन्हीही निश्चित होतात.

आत्मचिंतनातून घडलेल्या या संवादात्मक लिखाणामध्ये ‘सगुण प्रेमभक्तीच्या माहात्म्याचे निरूपण’ हेच मुख्य सूत्र आहे. त्यासाठी निरनिराळ्या व्यक्तिरेखा या माध्यम होऊन साकारलेल्या आहेत आणि त्यांच्याद्वारे जीवभाव, श्रद्धाभाव, प्रेमभाव व भक्तिभाव असे नानाविध भाव रूपाला आलेले आहेत. त्या व्यक्ती व कृष्ण यांच्यात घडलेले प्रसंग व कथा यांचा केवळ आधार घेऊन, वर्णन मात्र त्या भावांचे झालेले आहे. कथा प्रसंगांची मांडणी करताना किंवा काही वेळा त्यांच्या तपशीलातही बाह्यांगाने काही बदल करताना, मूळ प्रतिपाद्य विषयाला पुष्टी मिळावी हाच एकमेव हेतू आहे. त्यामुळेच क्रमाक्रमाने घडलेले कृष्णाचे जीवन किंवा त्याच्या जीवनात अनुक्रमाने आलेल्या व्यक्ती असे या लिखाणाचे स्वरूप नाही. किंबहुना, कृष्णाच्या जीवनात आलेल्या त्याच्या प्रेमाच्या व्यक्ती हा लिखाणामागील हेतू नसून, कृष्णाच्या विशेष प्रेमीजनांच्या जीवनातील कृष्णाचा सहभाग व त्याला त्या ठिकाणी मिळालेले स्थान हे एकमेव मूळ सूत्र आहे आणि तेच या लिखाणातून प्रगट झालेले आहे. या सूत्रामध्ये कृष्णप्रेमाचे प्रसंग गुंफताना मूळ सूत्र झाकोळले न जाता, त्यातून कृष्णभक्तीचा भावच प्रकर्षाने व विशेषत्वाने फुलून यावा याच एकमेव हेतूने प्रसंगांची रचना केलेली आहे असे म्हणण्यापेक्षा, तशी ती सहजपणे झालेली आहे असे म्हणणेच अधिक संयुक्तिक होईल.

अंतःकरणातील स्वानुभवाचे योग्य शब्दांकन होणे हे जेवढे कठीण आहे, तेवढेच त्या शब्दांकनाचे मुद्रांकन करणेही कठीणच आहे. परंतु प्रसाद, स्नेहल, प्रवीण व प्रतिमा या आठवले परिवाराने हे **‘शिवधनुष्य’** संयुक्त प्रयत्नाने व समर्थपणे पेलले, त्याबद्दल त्या सर्वांचे जेवढे कौतुक करावे तेवढे ते कमीच आहे. ईश्वरचरणी सेवा रुजू करण्याची संधी त्यांनी यशस्वीपणे साधली, म्हणून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांना प्रेमपूर्वक शुभाशीर्वाद!

परमात्म्याचे अंशात्मक कृष्णरूप व कृष्णाचे व्यापक परमात्मस्वरूप याचे अद्‌भूत दर्शन घडविणारे सुरेख मुखपृष्ठ श्री. प्रकाश तारी यांनी रेखाटले आहे. त्या ठिकाणी सर्वव्यापी **‘आकाश’** आणि त्याठायी प्रगटलेले **‘ब्रह्मतेज’**, अथांग **‘क्षीरसागर’**, विश्वरूपाने प्रगट होऊनही उरलेला आणि सर्व सृष्टीला आधार असलेला **शेष**, सर्व विश्वाचे मूळ असलेले **‘कमळ’** आणि ब्रह्मनादाकडे निर्देश करणारी **‘मुरली’** ही परमात्मस्वरूपाची प्रतीके आहेत, तर क्षीरसागरामधील कमळामध्ये शेषासह उभे असलेले कृष्णाचे मुरलीधारी रूप हा त्या परमात्मस्वरूपाचा सर्वांगसुंदर आविष्कार आहे. श्री. तारी यांची ही सेवा प्रभूचरणी रुजू झाली आहे. त्यांना प्रेमपूर्वक शुभाशीर्वाद!







सदर ग्रंथाच्या प्रकाशनाची व वितरणाची जबाबदारी कोमल प्रकाशनचे श्री. गुरूनाथ शेट्ये यांनी सांभाळल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच मुद्रक मे. प्रगति प्रिंटर्स, मुंबई यांनी या ग्रंथाच्या मुद्रणाची बाजू यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल त्यांना देखील मनःपूर्वक धन्यवाद!

**कृष्णचरित्ररूपी महासागरातील ही ग्रंथरूपी ओंजळ**

**सद्‌गुरूनाथ श्रीअवधूतस्वामी यांच्या चरणी**

**कृतज्ञभावाने सादर व सप्रेम समर्पण! !**

**श्रीपरमानंदस्वामी**

**।। हरि ओम् तत् सत् ।।**

## अनुक्रमणिका


७. सांदिपनींचे व्यवधान

८. कृष्णाचा गुरूगृहाला निरोप

९. सुदाम्याची सद्गुरूसेवा

१०. सुदाम्याचा कृष्णभेटीचा ध्यास

११. सुदामा-कृष्ण भेट

१२. कृष्ण-सुदामा संवाद








## सांदिपनींचे व्यवधान

हे लक्ष्मी, अशा रीतीने भक्तिभावाने आपल्या सद्गुरूंशी म्हणजे सांदिपनींशी एकरूप झालेला कृष्ण स्वतःचा वेगळेपणाने विचार करीतच नव्हता, तरी सांदिपनींच्याठायी मात्र कृष्णाच्या जीवनाचे पूर्ण व्यवधान होते. कृष्णाच्या पुढील जीवनाविषयी केव्हातरी निर्णय घेणे आवश्यकच होते. पण ते केव्हा व कसे घडेल हे सांदिपनींनाही ठाऊक नव्हते. परमेश्वरी सत्तेत व परमेश्वरी संकेतानुसार योग्य वेळी योग्य गोष्टी घडतील, याची सांदिपनींना पूर्णपणे खात्री होती. त्यामुळे सांदिपनीसुद्धा स्वस्थचित्ताने कृष्णाच्या भक्तिभावाने आनंदित होऊन स्वतःच्या स्वानंदात नित्य रममाण होऊन रहात असत. आता परमेश्वरी इच्छा किंवा संकेत प्रगट होणार होता, तो तरी कसा व कुठे? तर तसा विचार किंवा इच्छा सांदिपनींच्याच अंतःकरणात सहजतेने व अकारण स्फुरून येणार होती. पण त्याचे वेगळे असे व्यवधान मुद्दामहून सांदिपनींच्या ठिकाणी नव्हते. कृष्णाच्या भक्तिभावानुसार तर सांदिपनींची इच्छा हीच त्याच्यासाठी परमेश्वरी इच्छा होती. सांदिपनींच्या परता असा दुसरा कोणी परमेश्वर वा त्याची इच्छा कृष्णासाठी अस्तित्वात अशी नव्हतीच मुळी! कृष्णासाठी सद्गुरूंची सत्ता हीच सत्य होती आणि म्हणूनच त्याच्यासाठी तीच परमेश्वरी सत्ताही होती.

हे लक्ष्मी, असेच एकदा रात्रीच्या शांत व निवांत समयी महात्मा सांदिपनी आपल्या पर्णकुटीत विश्रांतीसाठी पहुडले होते आणि साहजिकच कृष्ण त्यांच्या चरणाशी नम्रभावाने उभा राहून सांदिपनींचे पदयुगुल अत्यंत हळुवारपणे चुरीत होता. नेहमी शांत व प्रसन्न असणाऱ्या सांदिपनींच्या मुखावर त्या वेळेस मात्र गंभीरतेचे भाव पसरलेले दिसत होते. कोणत्यातरी गहन विचारात ते मग्न असल्याचेच ते लक्षण होते आणि हे कळावयास कृष्णाला जराही वेळ लागला नाही. कारण सेवाभावाने असणाऱ्या कृष्णाचे लक्ष मात्र सांदिपनींच्या मुखावरतीच होते. तेच तर भक्तिभावाचे मुख्य लक्षण आहे. 'सांदिपनींच्या विशुद्ध व निर्विकल्प अंतःकरणाच्याठायी काहीतरी संकल्पाच्या लहरी स्फुरण पावून, त्या त्यांच्या मनापर्यंत येत असाव्यात आणि मनात स्थिर न रहाता पुन्हा अंतःकरणात जाऊन विलय पावत असाव्यात' हे कृष्णाने जाणले. अशा वेळेस त्या लहरी सांदिपनींच्या मुखाद्वारे शब्दरूपाने प्रगट झाल्याशिवाय सांदिपनींचे मन मोकळे व शांत होणार नाही, हेही पूर्वानुभवाने कृष्ण जाणून होता. म्हणूनच सांदिपनींना बोलण्यास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने कृष्ण विनम्रभावाने सांदिपनींशी हळुवार आवाजात बोलू लागला.

''हे गुरूवर्य, आपल्या विश्रांतीच्या अवस्थेला माझ्याकडून थोडेसे विचलित करणे घडत आहे, त्याबद्दल मी सर्वप्रथम आपली क्षमाच मागतो. परंतु आपण कुठल्यातरी विशिष्ट विचारामध्ये मग्न आहात आणि त्यामुळे आपल्या मनाला पूर्णपणे स्वास्थ्य नाही, हे मला आपल्या मुखावरील बदलणाऱ्या भावाच्या सूक्ष्म छटांवरून जाणवत आहे. काहीतरी घडण्याचा संकल्प आपल्या अंतःकरणात स्फुरत असावा. परंतु तो संकल्प मनात येऊन तेथे स्थिर राहू शकत नसल्यामुळेच आपल्या मनाची अशी अवस्था होत असावी असे मला वाटते. तेव्हा आपल्या मनातील गोष्ट जाणून व समजून घेण्यास मी योग्य आहे अशी आपल्याला खात्री असल्यास, कृपा करून आपल्या मनापर्यंत स्फुरून येणारे विचार मला सांगून आपण आपले मन मोकळे करावे, अशी मी आपल्याला विनंतीच करतो. आश्रमात घडणाऱ्या गोष्टींसंबंधी किंवा एखाद्या शिष्याच्या अनुषंगाने आपल्या ठिकाणी काहीतरी व्यवधान निश्चितपणे आहे हे मात्र नक्की! पण मी आपल्याला असे खात्रीपूर्वक वचन देतो, की मी आपल्या ठिकाणच्या व्यवधानाची निश्चितपणे पूर्ती करीन. आपण माझ्यावरती भरवसा धरावा आणि मला आपल्या व्यवधानात सामावून घेऊन ते पूर्ण करण्याची संधी द्यावी, अशी पुन्हा एकदा आपल्या चरणी नम्रभावाने प्रार्थना करतो.''

कृष्णाच्या हळुवार व मधुर वाणीतून प्रगटणारे भावपूर्ण बोलणे श्रवण करतानाच सांदिपनींच्या मुखावर प्रसन्नतेचे भाव विलसलेले दिसू लागले. त्यांनी आपले नेत्र सावकाशपणे उघडले आणि ते कृष्णाकडे अत्यंत प्रेमळ नजरेने किती तरी वेळ पहातच राहिले. समोर नम्रभावाने हात जोडून उभी असलेली कृष्णाची मूर्ती पाहून सांदिपनींना अधिकच भरून आले. पण थोड्याच वेळात त्यांनी स्वतःला सावरले आणि ते कृष्णाशी शांत व गंभीर सुरात बोलू लागले.

''अरे कृष्णा, तुझ्यासारखा भक्तिभावाने युक्त असा शिष्योत्तम असताना मला तर कसलीच काळजी करण्याचे कारण नाही. माझी सर्व व्यवधाने मी तुला न सांगताही तू जाणतोस आणि त्याची लगेचच पूर्तीही करतोस. त्यामुळे माझ्या ठिकाणचे कोणतेही व्यवधान तुझ्यासाठी अप्रगट राहू शकतच नाही. कारण माझ्या अंतःकरणाशी तू भक्तिभावाने अत्यंत जवळीकता साधून आहेस. पण आज माझ्या ठिकाणी जे व्यवधान प्रकर्षाने आहे, ते तुझेच आहे. तुझ्या पुढील जीवनाविषयीचेच एकीएक व्यवधान माझ्या ठिकाणी आहे. कारण आता तुझा या आश्रमातील वास्तव्याचा काळ पूर्ण होत आला आहे असे माझ्या अंतःकरणाला जाणवू लागलेले आहे. मला खात्री आहे की तुझ्या मनात तसा विचारसुद्धा येणे शक्य नाही. कारण तुझे मन सर्वांगाने फक्त माझ्याशीच जडलेले आहे हे मी जाणून आहे. परंतु आपले दोघांचे जीवन वेगवेगळे आहे हे तर सत्यच

आहे आणि तसे जीवन वेगळेपणाने जगण्याची वेळ आता अगदी जवळच येऊन ठेपलेली आहे.

हे कृष्णा, माझे बाह्यजीवन हे केवळ आश्रमापुरतेच निगडीत आहे आणि माझे कार्यही या आश्रमात येणाऱ्या साधकांपुरतेच मर्यादित आहे. त्याचप्रमाणे मी माझ्या जीवनयात्रेच्या अखेरच्या टप्प्यात आहे ही गोष्टही खरीच आहे. या आनंददायी प्रवासाचा परमानंददायी असा परमोच्च क्षण काळाच्या या ओघवत्या व वेगवान प्रवाहात केव्हाही येऊ शकेल. त्या क्षणाची मी मुद्दामहून प्रतीक्षाही करीत नाही किंवा त्याचा विचारही करीत नाही. परंतु काळाच्या नियमानुसार व परमेश्वराच्या नियतीनुसार तो क्षण केव्हाही आला तरी मी तयारच आहे. तशी तयारी माझ्या अंतःकरणाच्या अवस्थेतच झालेली आहे. परंतु कृष्णा, तुझ्यासाठी पुढे केवढे तरी जीवन आहे आणि तुझ्याकडून त्या परमेश्वराचे कार्यही घडावयाचे आहे, हे माझी आंतरिक प्रेरणा मला सांगत आहे. कारण तसाच परमेश्वरी संकेतही आहे हे सत्यच आहे.''

सांदिपनींचे बोलणे लक्षपूर्वक श्रवण करत असतानाच कृष्ण अधिकाधिक गंभीर होत राहिला. सांदिपनींच्या बोलण्यातील भावार्थ तर कृष्णाच्या लगेचच लक्षात आला होता. पण तरीही काही न बोलता कृष्ण स्वस्थच राहिला. सांदिपनीही निःशब्द अवस्थेतच आपले नेत्र मिटून शांतपणे पहुडले होते. त्या नीरव शांततेत बराच काळ गेला. शेवटी कृष्णालाच राहवले नाही आणि त्याने आपल्या मृदू वाणीने बोलावयास सुरुवात केली.

''हे गुरूनाथ, आपले माहात्म्य केवळ अलौकिकच नव्हे, तर अत्यंत थोर आहे. आपल्या अंतःकरणाची व्यापकता ही सर्वसमावेशक आहे आणि आपल्या अंतःकरणाची सखोलता ही तर सर्वांचा विलयच करणारी आहे. पण तरीही आपल्या अंतःकरणातून सत्संकल्प स्फुरून ते बाहेर प्रगट होतात, म्हणूनच तर आमच्यासारख्या सामान्यांनाही आपल्या चरणी शिष्यभावाने रहाण्याची संधी प्राप्त होते. आमच्यावरील आत्यंतिक आत्मप्रेमाने आपणच आम्हाला चरणापासून उठवून हृदयाशी अत्यंत जवळ धरता, म्हणूनच आमच्या ठिकाणचा प्रेमभाव उठतो आणि आपली काहीतरी भक्ती आमच्याकडून घडू शकते. आपल्या आत्मानंदाच्या अनुभवातून आपणच आमच्याशी ऐक्यत्व पावता, म्हणूनच आम्ही आपल्याशी एकरूपतेचा अनुभव घेऊ शकतो. त्या अनुभवामुळे स्वतःचे सर्व अस्तित्वच विसरलेल्या आमच्या जीवनाचे व्यवधानही आपल्याच ठिकाणी निर्माण होते ही गोष्ट केवळ अद्‌भुतच नसून, त्याद्वारे आपले माहात्म्य व थोरवीच यथार्थतेने प्रगट होत आहे.

हे गुरूवर्य, माझ्याही जीवनासंबंधी आपल्या ठिकाणी असेच व्यवधान माझ्यावरील आत्यंतिक आपलेपणामुळे स्फुरून आलेले आहे, हे माझ्या लक्षात आलेले आहे आणि तेच

जाणून घेण्यासाठी मी आतुर आहे. ते आपण मला त्वरित व अगदी मोकळेपणाने सांगावे अशी मी आपल्याला कळकळीची प्रार्थना करतो. कारण ते व्यवधान कळल्याशिवाय माझ्या मनाला निश्चिंतता लाभणार नाही. आपले व्यवधान हे माझ्यासाठी केवळ आपली आज्ञाच नसून त्याची पूर्ती करणे, हा तर माझा धर्मच आहे. मी आपल्याला खात्रीपूर्वक वचनच देतो, की आपण जे काही माझ्यासंबंधाने व्यवधान घेतलेले आहे, ते कुठल्याही परिस्थितीत मी निश्चितपणे पूर्ण करीनच करीन.''

कृष्णाच्या बोलण्याने संतुष्ट झालेले सांदिपनी आपल्या शय्येवर उठून बसले आणि चरणाशी उभ्या असलेल्या कृष्णाकडे प्रेमळ दृष्टीने पाहू लागले. त्यांनी हाताच्या खुणेनेच कृष्णाला खाली बसावयास सांगितले असता, कृष्ण अत्यंत आदरपूर्वक सांदिपनींच्या चरणाशी नम्रभावाने आपले हात जोडून बसला. सांदिपनींनी थोडेसे पुढे वाकून कृष्णाच्या मस्तकावर थोपटल्यासारखे केले आणि प्रेमाने त्याचे मुख कुरवाळले. सांदिपनींनी थोडा वेळ आपले नेत्र मिटून घेतले आणि पुन्हा नेत्र उघडून ते कृष्णाशी भावपूर्ण वाणीने बोलू लागले.

''हे कृष्णा, तुझ्या भक्तिभावाने तू मला अत्यंत प्रिय होऊन राहिला आहेस. गुरूशिष्य नात्याचे रहस्य व खरे वर्म तू ओळखलेस आणि तसे संबंध तू माझ्याशी राखलेस याचे मला अत्यंत कौतुक वाटते. त्या संबंधाची परिणती म्हणूनच तू माझ्याशी एकरूप होऊन राहिला आहेस आणि त्यामुळेच तुझा प्रेमभाव, तुझी सेवा, तुझे वागणे-बोलणे, तुझ्या सर्व कृती, एवढेच नव्हे, तर तुझे सर्व अस्तित्वच मला नित्य आनंदाचा अनुभव आणून देते आणि सदैव स्वानंदात रमणाऱ्या मला बाह्यांगानेही प्रगट होऊन, तोच आनंद बाहेरही अनुभवण्यासाठी प्रवृत्त करते. म्हणूनच माझे अंतःकरणही पूर्णपणाने केवळ तुझ्यापाशीच प्रगट होते आणि केवळ तूच ते जाणू शकतोस. एवढेच नव्हे, तर माझ्या अंतःकरणातील भावाशी समरसही तूच होऊ शकतोस. म्हणूनच माझ्याही अंतःकरणात तुझ्याविषयीचे संकल्पही तेवढ्याच सहजतेने निर्माण होतात.

हे कृष्णा, असेच गेले काही दिवस माझ्या अंतःकरणात अचानकपणे तुझ्याविषयीचे व्यवधान निर्माण झाले आणि ईश्वरी नियतीनुसार घडणाऱ्या तुझ्या पुढील जीवनासंबंधीचे संकेत तेथे स्फुरू लागले. माझ्या सहवासातील तुझा काळ आता पूर्ण झाला आहे. त्यामुळे या आश्रमातील तुझ्या वास्तव्याचेही कारण आता संपले आहे. तुझ्या पुढील जीवनाची सुरुवात होण्याचीही हीच वेळ आहे. तुझा जन्म हा राजघराण्यातील आहे आणि म्हणूनच तुझ्या पुढील जीवनाचे सूत्रही नियतीने आधीच ठरवलेले आहे. त्यानुसार तुला राज्यकर्मे ही करावीच लागणार आहेत. तेच तुझ्या जीवनातील प्रमुख कर्तव्यकर्म राहणार आहे. तेव्हा त्यासाठी तुझे आता त्वरित मथुरेला जाणे घडणे अत्यंत आवश्यक आहे.





माझे तुला असलेले शुभाशीर्वाद तर तुला आधीच फळलेले आहेत आणि तुझ्या फलद्रूप अवस्थेमुळेच तुझ्याकडून प्रजेच्या हिताच्या गोष्टी सहजपणे घडत रहातील. एवढेच नव्हे, तर सर्वसामान्यांच्या उद्धाराचे व कल्याणाचे कार्यही तुझ्याकडून अखंडपणे घडत राहील हाच ईश्वरी नियतीतील संकेत आहे. त्याची जाणीव आता तुझ्याही ठिकाणी निश्चितपणे झालेली असणारच. कारण माझ्या अंतरातील भाव तुझ्याही अंतरात निर्माण झालेले असणारच, एवढी आपली अंतःकरणे एकरूप झालेली आहेत. फक्त आपल्या अंतरातील भावाला शब्दरूप मी दिले, एवढेच!''

सांदिपनींचे बोलणे अचानक थांबले. कारण त्यांचा कंठ कृष्णप्रेमाने दाटून आला. वाणीचा ओघ थांबल्यावर त्यांच्या ठिकाणच्या दाटून आलेल्या प्रेमभावाने नेत्रांचा मार्ग स्वीकारला आणि त्याद्वारे सांदिपनींचा प्रेमभाव हळूहळू वाहू लागला. कृष्णाचीही अवस्था सांदिपनींच्या अवस्थेपेक्षा काही वेगळी राहिलेली नव्हती. त्याच्या ठिकाणी असलेला सांदिपनींविषयीचा प्रेमभक्तिभाव तर नेत्रांद्वारे आधीपासूनच वहायला लागलेला होता. सांदिपनी व कृष्ण हे दोघेही बराच वेळ अशा भावपूर्ण, निःशब्द अवस्थेत होते. काळ जणू काही थांबलाच आहे असेच वाटत होते. परंतु स्थळ, काळ व वेळ याची पूर्ण जाणीव असलेले सांदिपनी पूर्णपणे भानावर होते. त्यामुळे सांदिपनींनी त्यांच्या चरणाशी नतमस्तक होऊन बसलेल्या कृष्णाचे मस्तक अत्यंत प्रेमाने हळुवारपणे थोपटले आणि त्यांच्या वाणीचा अचानक थांबलेला ओघ पुन्हा तेवढ्याच अचानकपणे सुरूही झाला.

''हे कृष्णा, तुझ्या पुढील जीवनात ईश्वरी नियतीनुसार जे काही अद्‌भुत कार्य घडणार आहे, त्यासंबंधी मी तुला काहीही मार्गदर्शन करण्याची मुळीच आवश्यकता नाही. तुझ्याठायीच्या स्वयंप्रेरणेनुसारच तुझे जीवन सहजपणे जगणे घडेल आणि त्यातूनच सहजपणे परमेश्वरी कार्यही घडत राहीलच. परंतु माझ्या अंतःकरणाला जाणवणारी बाह्य परिस्थिती आणि त्यावर घडणारे माझ्या अंतरातील चिंतन मात्र मी तुला मोकळेपणाने प्रगट करून सांगतो. तसे पाहिले तर माझा या आश्रमाच्या बाहेरील जगाशी व व्यवहाराशी फारसा संबंध मुळात आधी नव्हताच आणि आता तर संबंध अजिबातच उरलेला नाही. त्यामुळे बाह्य परिस्थितीची मला काहीच जाणीव नाही असे वाटेल. परंतु तसे नसून बाह्य परिस्थितीची मला पूर्ण जाण आहे. एक तर या आश्रमात आलेले साधक हे बाह्य जगातूनच येथे आलेले आहेत आणि तेही भिन्न भिन्न प्रदेशातून व भिन्न भिन्न परिस्थितीतून आलेले आहेत. त्यांच्यावरील संस्कारही त्यामुळे वेगळे वेगळे आहेत आणि ते त्यांच्या वागण्या-बोलण्यातून सहजपणे प्रगटही होत असतात. त्यामुळेच त्यांचे मातापिता व कुटुंब यांच्यावरील संस्कारांची पातळी ताबडतोबच लक्षात येते.

हे कृष्णा, या आश्रमात सध्या अनेक शिष्य असूनही शिष्यभावाने असणारे शिष्य अभावानेच आहेत, ही वस्तुस्थिती आहे आणि त्याला त्यांच्यावर आतापर्यंत झालेले कुटुंबातील व कुळातील संस्कार हेच बऱ्याच अंशाने कारणीभूत आहेत. ठरावीक काळ विद्यार्जन करून अनेक प्रकारचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे आणि त्यानंतर आपापल्या घरी परत जाऊन मिळालेल्या विद्येचा उपयोग अर्थार्जनासाठी करावा, एवढाच मर्यादित हेतू आज सर्व शिष्यांच्याठायी आहे. आत्मविद्याप्राप्तीची तळमळ कोणाच्याही ठिकाणी नाही, मग आत्मानुभवाचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. याचा दोष केवळ त्या शिष्यांच्याकडे जात नाही, तर त्यांच्यावर झालेल्या संस्कारांना आणि त्या संस्कारांना कारणीभूत असलेल्या आजच्या सामाजिक स्थितीलाही तेवढाच नव्हे, तर जास्तच जातो.

या समाजाला ज्यांनी योग्य संस्कारांचे वळण लावायचे ते राज्यकर्तेच आज भ्रष्ट होऊ लागलेले आहेत, ही वस्तुस्थिती नाकबूल करता येणार नाही. भाग्याने मिळालेल्या राज्यासनाचा मूळ परमेश्वरी हेतू, जो सामान्य प्रजेचे रक्षण व कल्याण करणे, तो पूर्णतः विसरला गेला आहे आणि राजसत्तेचा उपयोग केवळ विषयसुख उपभोगण्यासाठीच केला जात आहे. विषयसुखाधीन झाल्यामुळे अनेक राजे आज मनाने व तनानेही दुर्बल तर झालेले आहेतच, परंतु त्याची परिणती त्यांच्या ठिकाणची विषयासक्ती वाढण्यातच झालेली आहे. सत्त्वगुणाचा लोप झाल्यामुळे राजांच्या ठायीची सत्त्वशील वृत्तीही पूर्णपणे लयाला गेलेली आहे. एवढेच नव्हे, तर कुठल्याही मार्गाने विषयसुख प्राप्त करून घेण्याच्या वृत्तीमुळे अनेक राजे उन्मत्त बनलेले आहेत. स्त्रियांकडेही केवळ विषयसुखाची वस्तू म्हणूनच पाहिले जात असून, त्यांच्या प्राप्तीच्या वासनेमुळे सर्व नीतिनियम बाजूला ठेवले जात आहेत. राज्यकर्त्यांच्याच अशा नैतिक अधःपतनामुळे समाजाच्याही ऱ्हासाला सुरुवात झालेली असून, अधर्माला वाढण्यासाठी पूर्ण वाव मिळालेला आहे आणि तसा अधर्म हा फोफावतही आहे.

हे कृष्णा, काळानुसार घडणाऱ्या गोष्टींना राजा हाच कारणीभूत ठरतो हे सत्यच आहे. कारण 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानुसार सामान्य प्रजा राजालाच अनुसरत असते. प्रजेची जर अधोगती झाली तर त्या प्रजेला राजाच वाचवू शकतो. परंतु जर राजाचीच अधोगती झाली तर मात्र प्रजेचीही अधोगती सुरू होते आणि मग त्यांना परमेश्वरसुद्धा वाचवू शकत नाही. कारण परमेश्वराच्या नियतीनुसार कर्माप्रमाणेच सर्व फळे सर्वांनाच भोगावी लागतात. सध्या राजधर्माचाच लोप होत असल्यामुळे समाजधर्म व कुटुंबधर्म यांना आधारच राहिलेला नाही. व्यक्तिगत सुख व स्वार्थ बळावल्यामुळे कुटुंबा-कुटुंबात व पर्यायाने सर्व समाजातच विस्कळीतपणा आलेला आहे. कोणीच कोणाला जुमानेनासे झाल्यामुळे सर्व सुसंस्कारही विस्मृतीच्या गर्तेत लयाला गेले आहेत. बाह्यांगाचे





धर्माचरणही हळूहळू नष्ट होत चालले असून, जे काही उरले आहे तो केवळ देखावाच आहे. अशा परिस्थितीत आत्मधर्मालाच ग्लानी आल्यासारखे दिसत असून, अधर्माने आपले डोके चांगलेच वर काढलेले आहे.

हे कृष्णा, पण म्हणून सर्वच काही संपलेले नाही. या नैराश्याच्या वातावरणात अजूनही काही आशेचे किरण निश्चितपणे राहिलेले आहेत. सदाचारी व सत्प्रवृत्त असे सज्जन आजही समाजात आहेत. परंतु त्यांचा सज्जनपणा हा त्यांचा दुर्बलपणा व दोष ठरत आहे. लोकाश्रय व राजाश्रय यांच्या अभावामुळे त्यांचा या काळात निभाव लागणे कठीण होऊन राहिलेले आहे. तसेच काही सत्प्रवृत्तीचे राजेही अजून प्रयत्नपूर्वक तग धरून आहेत. परंतु ते दुर्बल व असंघटित असल्यामुळे, संघटित अशा दुष्प्रवृत्तीच्या राजकारण्यांपुढे निष्प्रभ ठरत आहेत. तेव्हा अधोगतीला जाणाऱ्या राजधर्माचेच मुळात पुनरुत्थान झाल्याशिवाय सज्जनांच्या सदाचाराला व धर्माचरणाला संरक्षण मिळणार नाही आणि ते सबलही होणार नाहीत. सज्जनांची सबलता हीच आत्मधर्माच्या जागृतीला कारणीभूत व साहाय्यभूत होऊ शकेल.

कृष्णा, तुला आता कोणाच्याही व कोणत्याही मार्गदर्शनाची आवश्यकता राहिलेलीच नाही. सर्व काही तू जाणतोसच. फक्त मी माझे अंतःकरण तुझ्याकडे मोकळे केले इतकेच! खरे म्हणजे ते तसे अगदी सहजपणे झालेच. ते तुला जरी मार्गदर्शक ठरले नाही तरी प्रेरक निश्चितच होईल याची मला निश्चितपणे खात्री आहे. माझे शुभाशीर्वाद नित्य तुझ्या पाठीशी आहेतच. सर्वश्रेष्ठ व अत्यंत शुभकारक असे धर्मकार्य तुझ्या जीवनातून सहजपणे घडणार आहे हे मी जाणून आहे. कारण तीच परमेश्वराची नियती आहे आणि तोच परमेश्वराचा संकेतही आहे.''

सांदिपनींच्या अंतःकरणातील सर्व भाव मोकळे व प्रगट करणारी त्यांची वाणी निःशब्द व शांत झाली. सांदिपनी असे किती वेळ बोलत होते याची गणती करता येणे शक्यच नव्हते. कारण अंतःकरणापासून भरभरून बोलणारे सांदिपनी आणि सर्व भान हरपून भक्तिभावाने श्रवण करणारा कृष्ण, यांच्यासाठी तर काळाची गती थांबल्यासारखीच झाली होती. सांदिपनींच्या आत्मचिंतनपर बोलण्याने कृष्णाच्या अंतःकरणाचा पूर्ण ठाव घेतला होता आणि त्याच्या परिणामाने कृष्णाच्या सर्व अंतःकरणालाच व्यापलेले होते. एवढेच नव्हे, तर तो त्या परिणामाचा पूर्णपणे व कायमचा होऊन राहिलेला होता. सांदिपनींचे आत्मचिंतन हेच कृष्णाच्या जीवनाला आता प्रेरक होते आणि त्याच्या हृदयात ठसलेली सांदिपनींची प्रेमळ मूर्ती हेच कृष्णासाठी आता कायमचे प्रेरणास्थान होऊन राहिलेले होते. तेच त्याचे ध्येय ठरले होते आणि तोच त्याचा ध्यासही होऊन राहिला होता. त्याच कृतनिश्चयाने कृष्ण भारावल्यासारखा उठून उभा राहिला आणि त्याने

सांदिपनींच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांना साष्टांग प्रणिपात केला. कृष्णाच्या पाठीवरून व मस्तकावरून प्रेमळपणाने आपला हात फिरवीत सांदिपनींनी कृष्णाला वर उठवले आणि त्याला प्रेमपूर्वक दृढालिंगनच दिले. सद्‌गुरू व सत्‌शिष्य यांचे प्रेमाचे मीलन व भक्तीचा संगम यांचा तो सोहळा अभूतपूर्व व परमानंदाचाच होता.

*****



# कृष्णाचा गुरूगृहाला निरोप

हे लक्ष्मी, सांदिपनी व कृष्ण यांच्यातील तो अत्यंत भावपूर्ण व आनंददायी असा प्रसंग केव्हाही संपणे अगदी बाह्यांगानेसुध्दा शक्यच वाटत नव्हते. परंतु बाह्य काळाच्या गतीनुसार रात्र मात्र संपली होती आणि सूर्योदयाची चाहूल देणारी पहाट उजाडत होती. सूर्याची प्रकाशकिरणे प्रत्यक्ष प्रगट होण्याच्या आधीचा, सूर्याचा परावर्तित प्रकाश नानाविध छटांनी हळूहळू पसरू लागला होता. मंगलमय व उत्साहाचे वातावरण सर्व आसमंतात निर्माण होऊन सर्वत्र जाग आल्याच्या खुणा दिसू लागल्या होत्या. त्याची पहिली प्रचिती सांदिपनींच्या पत्नीच्या आगमनाने आली. अत्यंत प्रसन्न व सुहास्य मुद्रेने सांदिपनींच्या पत्नीने सांदिपनींच्या शयनकक्षात प्रवेश केला. सांदिपनी व कृष्ण यांच्यातील भावपूर्ण मीलनाचे दृश्य पाहून तिचेही डोळे भरून आले आणि तिला तर धन्यच झाल्यासारखे वाटले. सांदिपनींच्या मुखमार्जनासाठी गरम पाण्याने भरून आणलेले उदकपात्र तिने आवाज न करता हळूच खाली ठेवले आणि ती तशीच माघारी वळणार तोच सांदिपनींनी तिला हाताच्या खुणेने थांबवले. चकित मुद्रेने पहाणा-या आपल्या पत्नीच्या जवळ सांदिपनी कृष्णाला घेऊन गेले आणि तिला म्हणाले,

“अहो, या कृष्णाचे येथील वास्तव्य आता पूर्ण झाले आहे. कारण त्यामागील त्याचा हेतू सफल  झाला आहे. आता कृष्णाला त्याच्या घरी, त्याच्या कुटुंबीयात व त्याच्या राज्यात परत जायला हवे. स्वतःचे जीवन जगण्याचे बळ तर कृष्णाच्या ठिकाणी आधीपासूनच आहे. पण कृष्णाला येथे राहून त्याच्या पुढील जीवनाची दिशा कळली आणि ध्येयही मिळाले. कृष्णाकडून जनकल्याणाचे कार्य तर त्याच्या स्वभावानुसार घडत राहीलच. पण त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे सद्धर्माची स्थापना करून अधर्माचे उच्चाटन करण्याचे अलौकिक कार्यही कृष्णाकडून घडणार आहे. तेव्हा आता कृष्णाला आपल्याकडे या आश्रमात थांबवून ठेवणे उचित नाही. मी जाणून आहे की कृष्ण माझ्यासारखाच तुम्हालाही प्रिय आहे. किंबहुना माझ्यापेक्षा तो तुमचा

जरा जास्तच लाडका आहे आणि कृष्ण आहेच तसा! नम्रता, सेवाभाव, प्रेमळता, बुद्धिमत्ता अशा दैवी गुणांनी युक्त असलेला कृष्ण हा कोणालाही प्रियच होऊन रहाणार आहे. त्यामुळेच आश्रमातील सर्वांचाच तो अत्यंत आवडता होऊन राहिलेला आहे. आता कृष्णाला निरोप देताना आपणा सर्वांच्याच मनाला निश्चितच कष्ट होणार आहेत. परंतु अत्यंत प्रेमाने आपण त्याला निरोप द्यायचा आहे हे लक्षात ठेवा आणि भावनेच्या आवेगाला आवर घालून कृष्णाच्या निघण्याच्या तयारीला सुरूवात करा. कारण सर्व प्रातर्विधी व आन्हिक पूर्ण करून लगेचच कृष्णाला निघण्यासाठी प्रस्थान ठेवायचे आहे.”

सांदिपनींचे स्पष्ट व निर्णायक बोलणे ऐकून त्यांची पत्नी तर स्तंभित होऊन जागच्या जागीच उभी राहिली. आश्चर्यचकित होण्यालाही तिला अवधी मिळालाच नाही, एवढे सांदिपनींचे बोलणे नि:संदिग्ध्, वेगवान व तिच्यासाठी अकल्पित होते. ती तशी भांबावलेल्या अवस्थेत असतानाच कृष्णाने पुढे होऊन, वाकून गुरूपत्नीच्या पदांना स्पर्श् करून नमस्कार केला. त्या प्रेमस्पर्शाने सांदिपनींची पत्नी भानावर आली आणि कृष्णाला तिने एकदम आपल्या कुशीतच घेतले. नेत्रातून मोकळया होणा-या अश्रुधारांनी तिचे मन हलके होता होता अधिकच भरून आले आणि ती मुसमुसून स्फुंदू लागली. सांदिपनींच्या ठायीचेही सर्व भाव त्यांच्या नेत्रांत दाटून आले होते. पण त्यांच्याठायी असलेल्या सहज संयमाने त्यांनी स्वत:ला सावरले होते. भावपूर्ण झालेल्या अवस्थेतच सांदिपनी पुढे झाले आणि त्यांनी कृष्णाला आपल्या जवळ घेतले. कृष्णाच्या मस्तकावर व पाठीवर थोपटून त्यांनी कृष्णाकडे प्रेमभरे पाहिले असता, त्यांच्या नेत्रांतील खूण कृष्णाच्या लक्षात आली आणि तो लगेच सांदिपनींच्या पर्णकुटीच्या बाहेर निघाला. सांदिपनींनीही आपल्या पत्नीचा हात हळुवारपणे आपल्या हातात घेतला आणि तिला घेऊन ते पर्णकुटीच्या आतल्या भागात गेले.

थोडया वेळाने सांदिपनी क्षिप्रा नदीवर स्नानास जाण्यासाठी आपल्या पर्णकुटीच्या बाहेर आले तर कृष्ण तेथे उभाच होता. सांदिपनींच्या पर्णकुटीतून बाहेर आल्यावर स्वत:च्या पर्णकुटीत कृष्ण जेवढया त्वरेने गेला





तेवढयाच त्वरेने आपले प्रातर्विधी व स्नान उरकून पुन्हा आलासुध्दा आणि आपल्या सेवाभावाने सांदिपनींच्या चरणी सादर झालासुध्दा! कृष्णाला पाहून सांदिपनींनी मंदस्मित केले असता कृष्णाने पुढे होऊन सांदिपनींच्या हातातील कमंडलू आपल्या एका हातात घेतला आणि दुस-या हाताने सांदिपनींनी प्रेमाने पुढे केलेला हात धरला. नदीच्या वाटेने जात असताना सांदिपनी व कृष्ण एकमेकांशी आज काहीच बोलत नव्हते. जणू विशेष असे काही घडले नव्हते आणि जे काही पुढे घडणार होते, त्यातही विशेष असे काही नव्हतेच. नदीवर आल्यावर सांदिपनींनी स्नान केले आणि सूर्यदेवतेला अर्घ्यदान केले. त्यांची सूर्योपासना होईपर्यंत कृष्णाने सांदिपनींची सर्व वस्त्रे धुवून ठेवली. सूर्योपासना संपल्यावरती नदीच्या प्रवाहातून बाहेर आलेल्या सांदिपनींचे ओले चरण कृष्णाने आपल्या हातातील धूत वस्त्राने पुसून निर्जल केले आणि त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून भक्तिभावाने कृष्ण सांदिपनींचे दर्शन घेता झाला. सांदिपनींनी प्रेमाने कृष्णाला उठवून त्याच्या मस्तकावर हात ठेवला आणि कृष्णाचा हात आपल्या हातात घेवून पुन्हा, वाटेत काहीही न बोलता ते उभयता आश्रमाच्या दिशेने अगदी सावकाशपणे एकेक पाऊल टाकीत चालू लागले.

आश्रमात आल्यावर सांदिपनींना त्यांच्या पर्णकुटीपर्यंत कृष्ण घेऊन आला आणि त्यांच्या अनुज्ञेने स्वत:च्या पर्णकुटीकडे गेला. मथुरेला परत निघण्याविषयी कृष्णाने भल्या पहाटेच बलरामाला सांगितले होते. त्यामुळे अर्थातच सुदाम्यालाही ते कळलेच होते. एवढेच नव्हे, तर आश्रमातील इतर शिष्यांच्याही कानापर्यंत ती वार्ता जाऊन पोहोचली होती. बलराम त्याच्या स्वभावाप्रमाणे धीरगंभीरच होता. सांदिपनींच्यासह गेलेला कृष्ण परत येईपर्यंत बलरामाने तर त्याची व कृष्णाची वैयक्तिक वस्त्रे व सामान यांची बांधबांधही करून ठेवली होती. सुदामा मात्र या अचानक घडत असलेल्या गोष्टीने चकित तर झाला होताच परंतु त्याहीपेक्षा जास्त व्याकूळच झाला होता. कृष्णाच्या व बलरामाच्याही व्यक्तिगत प्रेमाने नेहमीच सुखावणारा सुदामा, त्यांच्या वियोगाची कल्पनाही सहन करू शकत नव्हता. आश्रमातील इतरानांही कृष्ण आश्रमातून परत आपल्या घरी जात आहे हे ऐकून धक्काच बसल्यासारखे झाले होते. तसे पाहिले तर कृष्णाचे त्या आश्रमातील वास्तव्य

काही जास्त काळाचे झाले नव्हते. परंतु आपल्या विनम्र, मोकळया व लाघवी स्वभावाने कृष्ण सर्वांचाच आवडता होऊन राहिला होता. त्यामुळे कृष्ण आश्रमातून जाणार या विचारानेही सर्वांच्या मनात एक प्रकारची उदासीनता भरून राहिली होती.

काहीजणांना तर सांदिपनींनी कृष्णाला घरी परतण्यासाठी एवढया लवकर आज्ञा कशी केली याचेच नवल वाटत होते. कारण काळाच्या गणितानुसार विचार केला तर एवढया कमी काळात कृष्णाने सर्व ज्ञान कसे काय प्राप्त करून घेतले, असाच विचार त्या सर्वांच्या मनात येत होता. कृष्ण अत्यंत बुध्दिमान आहे आणि त्याची आकलनशक्तीही तीव्र आहे हे सर्वांनाच माहीत होते. तरीही फार अल्प काळातच कृष्णाने सर्व ज्ञान सांदिपनींकडून प्राप्त करून घेतले याचेच काहींना कौतुक, तर काहीजणांना थोडीशी असूयाही वाटत होती. परंतु कृष्णाकडून घडलेली सद्‌गुरूभक्ती मात्र कोणाच्याच लक्षात आलेली नव्हती. अनन्यसाधारण अशा भक्तीभावाने कृष्णाने आपले सद्‌गुरू सांदिपनी यांचीच मूर्ती स्वत:च्या अंत:करणात अधिष्ठित केलेली होती आणि तेच कृष्णाचे आध्यात्मिक अधिष्ठान झालेले होते, हे मात्र कोणालाच कळले नव्हते. कारण विद्यार्जन करीत आश्रमात सेवाभावाने व निष्ठेने रहावे एवढयापुरतीच बाकीच्यांची शिष्यभावाविषयीची कल्पना मर्यादित होती. परंतु काहीजणांना मात्र कृष्णाचे विशेषपण जरी कळले नव्हते तरी त्याचे वेगळेपण निश्चितच लक्षात आले होते आणि ते कृष्णाकडे आदराच्या दृष्टीने पहात असत. एक गोष्ट मात्र निश्चित होती, की या ना त्या कारणाने असेल पण कृष्ण सर्वांच्याच प्रेमाचा होऊन राहिलेला होता. कृष्ण व सांदिपनी यांची आश्रमात नित्य वावरणारी जोडी पाहून सर्वांचेच नेत्र तृप्त होत असत आणि त्यांना एका वेगळयाच प्रकारच्या आनंदाचा अनुभव येत असे. त्यामुळे 'आता कृष्णाच्या विरहित सांदिपनींना पहावे लागणार, तर त्यात काहीतरी कमतरताच जाणवणार' या विचारानेच सर्वजण बेचैन झाले, पण काही न बोलताच स्वस्थ बसून राहिले होते.

हे लक्ष्मी, थोडया वेळातच कृष्णही बलरामासह सांदिपनींच्या पर्णकुटीकडे निघाला. त्यांच्या मागोमागच सुदामाही रडवेल्या व केविलवाण्या चेह-याने एकेक पाऊल मोठया मुश्कीलीने टाकीत होता. पर्णकुटीपाशी आल्यावर कृष्ण व बलराम आतमध्ये सांदिपनीच्या दर्शनासाठी गेले, तर सुदामा बाहेरच थांबून राहिला. पर्णकुटीत प्रवेश केल्याबरोबर आसनस्थ व ध्यानस्थ बसलेली सांदिपनींची अत्यंत तेजस्वी पण शांत मुद्रा असलेली मूर्ती कृष्णाने पाहिली मात्र, त्याचे अंत:करण सांदिपनींच्या माहात्म्याच्या जाणिवेने व त्यांच्यावरील व्यक्तिगत प्रेमाने अत्यंत भरून आले. त्याच भक्तीभावाने कृष्ण आपले दोन्ही हात जोडून सांदिपनींच्या सन्मुख व चरणाशी नम्रभावाने बसून राहिला. बलरामही नम्रपणे हात जोडून थोडासा बाजूलाच, पण उभाच राहिला. कृष्णाच्या भावपूर्ण अवस्थेमुळे त्या मंगलमय व शुभदायी वातावरणात पडलेली भर सांदिपनींच्या अत्यंत संवेदनशील असलेल्या अंत:करणाला जाणवली आणि त्यांनी अत्यंत सहजपणे आपले नेत्र उघडले. सन्मुख बसलेल्या कृष्णाला पाहून त्यांचे नेत्रही अश्रुंनी दाटले आणि त्यांच्या मुखावर मंदस्मित झळकले. कृष्णानेही लगेचच उठून आपल्याबरोबर आणलेली सुगंधित पुष्पमाळा सांदिपनींच्या कंठात घातली आणि त्यांचे दोन्ही चरण आपल्या हातांच्या ओंजळीत धरून त्यांच्यावर आपले मस्तक हळुवारपणे ठेवले. सांदिपनींनी प्रेमाने कृष्णाचे मस्तक कुरवाळून थोपटले आणि त्याला अलगदपणे वर उठवले. कृष्णाचे अश्रुपूर्ण झालेले नेत्र सांदिपनींनी स्वहस्ते पुसले आणि त्याला आपल्या कुशीत घेतले. थोडया वेळाने कृष्णाला आपल्या हृदयाशी धरुन सांदिपनी तसेच उठून उभे राहिले.

ते भावपूर्ण दृश्य पाहून बलरामही एकदम भावनाविवशच झाला आणि पुढे होऊन त्यानेही सांदिपनींच्या चरणांवर आपले मस्तक ठेवले. सांदिपनींनी बलरामालाही उठवून आपल्या जवळ घेतले. कुणाच्याही मुखातून एकही शब्द बाहेर येत नव्हता. परंतु ती नि:शब्द अवस्थाच शब्दातीत भावाचा अनुभव पूर्णपणे प्रगट करीत होती. सांगण्यासारखे अगदी पुष्कळ होते, तरीही सांदिपनी व कृष्ण या उभयतांना काहीही सांगायचे नव्हते आणि काही

ऐकायचेही नव्हते. सांदिपनींच्या हृदयीचे कृष्णाच्या हृदयीचे झाले होते आणि कृष्णाच्या हृदयी पूर्णपणे सांदिपनीच व्यापून राहिले होते. तेवढयात तेथे सांदिपनींच्या पत्नीने प्रवेश केला आणि समोरील ते भावपूर्ण दृश्य पाहून तर तिच्या मनीचे बांध पूर्णपणे फुटले आणि नेत्रांव्दारे मुक्तपणे वाहू लागले. तिच्या स्फुंदून स्फुंदून रडण्यामुळे सांदिपनी भानावर आले आणि त्यांनी कृष्णालाही भानावर आणून व त्याचे लक्ष वेधून आपल्या पत्नीकडे निर्देश केला.

भावनाविवश झालेल्या आपल्या गुरूपत्नीला पाहताच कृष्ण तिच्याजवळ गेला आणि त्याने तिला वाकून नमस्कार केला. सांदिपनींच्या पत्नीनेही कृष्णाला वात्सल्य भावाने आपल्या जवळ घेतले आणि अस्पष्ट आवाजात एवढेच म्हणाली, ”अरे कृष्णा, तुझे जेव्हा या आश्रमात येणे झाले ना, तेव्हा मला तर माझा मृत पावलेला मुलगाच परत आला असेच जाणवले. त्यामुळे तुला पहाताक्षणीच माझ्या ठिकाणचा एवढया काळाचा दाटून राहिलेला वात्सल्यभाव मोकळा झाला. तुझे येथे येणे होण्याच्या आधी माझ्या मनात एक तीव्र इच्छा अगदी खोलवर होती, की काहीतरी चमत्कार व्हावा आणि क्षिप्रा नदीच्या प्रवाहात वाहून गेलेला माझा पुत्र मला परत मिळावा. अशी काहीतरी ईश्वरी शक्ती माझ्या पतीदेवांकडून प्रगट व्हावी की माझ्या पुत्राची माझी पुनर्भेट व्हावी. परंतु माझी ती इच्छा एक वेडी आशाच ठरली. कारण अशी इच्छा ना कधी माझ्या पतीदेवांच्या मनात आली, ना कधी ईश्वरी आत्मशक्ती त्यांच्याकडून या कारणासाठी प्रगट झाली. परंतु तुझ्यारूपाने, तुझ्या वागण्या-बोलण्याने, एवढेच नव्हे, तर तुझ्या केवळ अस्तित्वानेही मला नेहमीच पुत्रप्रेमाचाच अनुभव आला. माझ्या वात्सल्यभावाची तू पूर्ती केलीस खरी, परंतु माझी तृप्ती काही झाली नाही. असे असतानाच तू मला आता सोडून चालला आहेस आणि मला पुन्हा विरहाच्या दु:खात ठेवीत आहेस. मला माहीत आहे की मी तुझी खरी माता नाही. तुझी खरी माता देवकीच आहे. परंतु माझा तुझ्यावर थोडातरी हक्क आहेच की नाही? तू गेल्यावर मी कोणाकडे पाहून समाधान मानायचे?



कृष्णा, माझ्याही भावनांचा थोडातरी विचार करशील की नाही? खरे तर भावनेच्या भरात का असेना, पण तुझ्याकडे तर मी असेच मागणार होते की एक तर माझा पुत्र काहीही करून मला परत आणून दे किंवा तूच माझ्याकडे कायमचा राहा."

डोळयातून अश्रू वहात असतानाही सांदिपनींची पत्नी बोलण्याचा प्रयत्न करीत होती. त्यामुळे तिच्या मुखातून अस्पष्ट शब्द बाहेर येतच राहिले. परंतु शेवटी तिच्या भावनेचा आवेग एवढा वाढला की शब्दांनाही तिच्या मुखातून बाहेर पडणे अशक्यच झाले. तिचे मन व त्यातील प्रेमाची भावना पूर्णपणे जाणणारा कृष्णही त्याच भावनेने आपल्या गुरूमातेशी सांत्वपर बोल बोलू लागला,

"हे माते, तुझ्या सर्व भावना मी समजू शकतो आणि त्यांचा अत्यंत आदरही करतो. आम्हाला जसे सांदिपनींसारखे महात्मे सदगुरू म्हणून परमभाग्याने लाभले, तेवढीच तुझ्यासारखी वात्सल्यभावाची मूर्ती अशी गुरूपत्नी आम्हाला मिळाली हेसुद्धा आमचे भाग्यच आहे. तुझ्या प्रेमळ व्यक्तिमत्त्वामुळेच आम्हा सर्व शिष्यांचे या आश्रमातील वास्तव्य हे अत्यंत सुखाचे व स्वास्थ्याचे होत असते हे अगदी खरे आहे. त्यामुळेच कोणालाही आपल्या घराची व मातापित्यांची आठवण होऊन कधीही व्याकुळता येतच नाही. याचे सर्व श्रेय केवळ तुझ्याकडेच आहे. या लाभलेल्या मन:स्वाथ्यामुळेच सद्गुरूंकडून आम्हाला लाभत असलेल्या अनेकविध ज्ञानाकडे व साधनांकडे आमचे लक्ष लागू शकते आणि अभ्यास करणे घडू शकते.

हे माते, तुझे असे प्रेमळ व निर्मळ व्यक्तिमत्त्व हे केवळ सांदिपनींच्या सहवासामुळे व संस्कारांमुळेच घडलेले आहे, हे तुही जाणूनच आहेस. आपल्या पतीला त्याच्या जीवनात व कार्यात सर्वस्वाने साथ दिल्यामुळेच, तुझे जीवनही त्यांच्या जीवनापासून जराही वेगळे राहिलेले नाही. सांदिपनींचे माहात्म्यही तू पूर्णपणे जाणून आहेस. त्यांनीही तुला सर्व ज्ञान दिलेच आहे

आणि त्या ज्ञानानेच तू मनाने सबळही झालेली आहेस. काळाच्या ओघात काळाच्या स्वाधीन झालेली व्यक्ती पुन्हा परत येऊ शकतच नाही हे तूही जाणून आहेस. परमेश्वराच्या नियतीचा तर तसा नियमच आहे आणि या नियमाला कोणाचाही, अगदी महात्म्यांचाही अपवाद होऊ शकत नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे असा अपवाद व्हावा किंवा करावा अशी अगदी पुसटशी इच्छा सुध्दा त्या महात्म्यांच्याठायी उद्भवणे संभवतच नाही. कारण त्यांची आत्मशक्ती ही परमेश्वराच्या व्यापक शक्तीचा एक अंशात्मक भाग असल्याची जाणीव त्यांना असते आणि त्यांच्या सर्व इच्छाही परमेश्वराच्या नियतीतच सामावल्या गेलेल्या असतात. नाहीतर, तुझी भावना व दु:ख जाणून सदगुरूनाथांनी तुमच्या पुत्राला केव्हाच परत नसते का आणले? आणि जे त्यांच्याकडून घडले नाही ते माझ्याकडून घडणे शक्यच नाही.

त्याचप्रमाणे एका व्यक्तीची जागा दुसरा घेऊ शकत नाही हेसुद्धा खरेच आहे. तेव्हा जरी तू माझ्याकडे पुत्रवत् पहात असलीस तरी मी तुझा पुत्र नाही हे सत्यच आहे. तसे पाहिले तर मी देवकीचा पुत्र असूनही माझा मायेने सांभाळ केला आणि मला प्रेमाने वाढवले, ते यशोदामातेनेच! तरीही जवळ जवळ बारा वर्षे यशोदेचे वात्सल्यप्रेम अनुभवूनही मला गोकूळ सोडून माझ्या मातापित्यांकडे त्यांच्या प्रेमासाठी व त्यांच्या प्रेमामुळे परतावेच लागले. त्याचप्रमाणे हे माते, एवढे दिवस तुझे वात्सल्यप्रेम अनुभवूनही मला येथे यापुढे राहणे शक्य होणार नाही हेच वास्तव आहे. कारण माझे खरे मातापिता असलेले वसुदेव, देवकी यांच्याकडेच जाणे मला आवश्यक आहे. हीच जीवनातील वास्तविकता आहे आणि ती स्वीकारावीच लागते. दुर्बल मनाच्या व्यक्तींना ती वास्तविकता स्वीकारताना अतोनात क्लेश होतात, परंतु सबल मनाच्या व्यक्ती अशा वास्तविकतेचा केवळ विनातक्रारच नव्हे, तर शांतपणे स्वीकार करतात. त्यांचे मन विचलित तर होत नाहीच, पण त्यांची आनंदाची अवस्थाही अबाधित राहते हे महत्वाचे.





हे माते, माझ्या रूपाने तुला तुझ्या ठायीच्या वात्सल्यप्रेमाचा अनुभव घेता आला असेल, तर त्यात कौतुक माझे नसून तो तुझ्या वात्सल्याचाच महिमा आहे. परंतु विनम्रभावाने मला तुला एकच विनंती करावीशी वाटते, की आता तुला लाभलेल्या या तृप्तीच्या भावातच तू कायमची रहा आणि मनामध्ये कुठल्याही प्रकारची कमतरता मुळीच ठेवू नकोस. नाहीतर, माझ्या वियोगाने पुन्हा मनामध्ये दुःख करीत बसशील आणि सद्गुरूनाथांच्या सहवासात सहजपणे मिळत असलेल्या आनंदाला विनाकारण मुकशील. सद्गुरू सांदिपनींवरील तुझे प्रेम व श्रद्धा हीच तुझ्या उपयोगाला येणार आहे आणि तुझ्या सर्व भावांची पूर्ती झाल्याचा आनंदही तुला त्यांच्याच ठायी अनुभवता येणार आहे, याची खात्री बाळगून रहा. आता मला आनंदाने निरोप दे आणि तोही पुन्हा कधी न भेटण्यासाठी!”

असे म्हणत असतानाच कृष्णाने वाकून सांदिपनींच्या पत्नीला पुन्हा एकदा नमस्कार केला असता, तिने त्याला आपल्या दोन्ही हातांनी उठवून आपल्या कुशीत घेतले. कृष्णाच्या मस्तकावरती हात फिरवून तिने त्याचे मुख प्रेमाने कुरवाळले. त्यानंतर सांदिपनींच्या पत्नीने कृष्णाच्या हनुवटीला धरून त्याचे मुख हळूच वर केले आणि त्याच्याकडे एकटक नजरेने पाहू लागली. आताही तिच्या नेत्रात अश्रू होते, पण ते दुर्बलतेचे नव्हते, तर दाटलेल्या प्रेमाचे होते आणि तिच्या मुखावरून कृष्णाचे कौतुक व स्नेह अगदी ओसंडून वाहत होता. तिच्या मोकळ्या झालेल्या व प्रेमाने भरलेल्या मनाच्या अवस्थेचेच ते द्योतक होते. मनाच्या या हलक्या फुलक्या अवस्थेतच ती कृष्णाकडे पाहून प्रसन्न मुद्रेने व मोकळेपणाने हसली. कृष्णानेही तेवढ्याच मोकळेपणाने हसून प्रतिसाद दिला आणि तो पुन्हा सांदिपनींच्या जवळ आला.

कृष्णाचे वागणे व बोलणे लक्षपूर्वक पाहणाऱ्या व ऐकणाऱ्या सांदिपनींच्या ठायीही कृष्णाविषयीचा कौतुकभाव व प्रेम दाटून आले होते. त्यांनी काहीही न बोलता कृष्णाच्या पाठीवर थोडेसे थोपटल्यासारखे केले आणि त्याच्या मस्तकावरती आपला कृपाहस्त ठेवला. ‘कल्याणमस्तु!

शुभंभवतु!! शुभास्तेसन्तु पंथानः!!!’ एवढेच आशीर्वादपर शब्द सांदिपनींच्या मुखातून सहजपणे बाहेर आले. कृष्णाने सांदिपनींचा हात प्रेमाने व नम्रतेने आपल्या हातात घेऊन तो आपल्या मिटलेल्या नेत्रांना लावला आणि आपल्या सर्वच मुखावरून हळुवारपणे फिरवला. सांदिपनींची प्रेमळ, प्रसन्न व तेजस्वी मूर्ती कृष्णाने आपल्या नेत्रात प्रेमभरे साठवून घेतली आणि तो पुन्हा मागे वळून न बघता पर्णकुटीच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडला. त्याच्या मागोमाग बलरामानेही सांदिपनींच्या पत्नीला नम्रभावाने वाकून नमस्कार केला आणि तो सांदिपनींच्या जवळ आला. त्यांच्या चरणांवरती मस्तक ठेवून नमस्कार करीत असताना सांदिपनींनी बलरामाला उठवले आणि त्याच्या मस्तकावर आपला हात ठेवीत ते त्याला एवढेच म्हणाले,

“अरे बलरामा, तुलाही माझे पूर्ण आशीर्वाद आहेतच. तुझा स्वभाव मूलतःच गंभीर व अबोल हे मी जाणून आहे. परंतु कृष्णाच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभा राहण्याचा तुझा भाव मात्र मला अत्यंत कौतुकास्पदच वाटतो. कारण वयाने कृष्णापेक्षा मोठा असूनही तू नेहमीच कृष्णाला पूरक अशी दुय्यम भूमिका घेतोस, जी घेणे हे खरे तर कठीणच आहे. कृष्णाचे माहात्म्य तू जाणत असल्याचेच हे लक्षण आहे हे निश्चित. कृष्णाच्या पुढील जीवनातही तू असाच खंबीरपणे त्याच्या पाठीशी राहशील याची मला खात्री आहे. कृष्णाचे सर्वच जीवन तुझ्या स्वभावामुळे तुला मानवेल किंवा पटेल असे नाही. परंतु कृष्णाला नेहमी अशीच साथ देत रहा आणि कृष्णाकडून पुढे घडणाऱ्या जनकल्याणाच्या कार्याला साहाय्यभूत होत रहा. एवढेच आशीर्वाद मी तुला प्रेमपूर्वक देत आहे.”

सांदिपनींच्या बोलण्यावर बलरामाने आपले मस्तक लववून ‘आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे’ असेच सूचित केले आणि तोही सांदिपनींच्या पर्णकुटीच्या बाहेर आला, तर तेथे सर्व आश्रमवासीय आधीच जमा झालेले होते. कृष्णाच्या वावरण्याने एक प्रकारचे चैतन्य एवढे दिवस ज्या आश्रमात खेळत होते, तेथे आज उदासीनतेचे वातावरण पसरलेले दिसत होते. खरे तर,

त्या आश्रमातील चैतन्याचा मूळ स्त्रोत सांदिपनींच्या ठायीच होता. त्यांच्या अस्तित्वामुळेच त्या ठिकाणी मूळ परमेश्वरी चैतन्य प्रगट होते. पण त्यांचे माहात्म्य पूर्णपणे न जाणल्यामुळेच सर्वजण त्याविषयी अनभिज्ञ होते. कृष्णाच्या आश्रमातील वास्तव्याने, म्हणजे त्याचे रूप, गुण, बोलणे, वागणे यामुळे मात्र ते चैतन्य आश्रमवासीयांना जाणवू लागले होते आणि आवडूही लागले होते. सगुण अवतार चरित्रांचे हेच तर माहात्म्य व वैशिष्ट्य असते. त्यांचे केवळ अस्तित्वमात्रच सर्व परिसरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण करते. त्यामुळे सामान्यजनही अगदी भारून जातात आणि त्यांच्या ठायीच्या सत्प्रवृत्ती व सद्गुण जागे होतात.

***

हे लक्ष्मी, पण खरा कावराबावरा झाला होता आणि रडकुंडीला आला होता, तो सुदामा! एवढे दिवस कृष्णाकडून अनेक अंगाने प्रेम अनुभवण्याची ज्याला सवयच जडली होती, अशा सुदाम्याला एकदमच एकाकी व निराधार वाटू लागले होते. त्यामुळे कृष्णाला सांदिपनींच्या पर्णकुटीच्या बाहेर आलेला पाहताच सुदाम्याने पुढे धावतच जाऊन कृष्णाला धरले आणि त्याच्या कुशीत शिरून तो मुसमुसून मुसमुसून रडू लागला. कृष्णही सुदाम्याच्या मस्तकावरून व पाठीवरून प्रेमाने हळुवार हात फिरवीत त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होता खरा, परंतु सुदामा शांत होण्याचे काही लक्षण दिसत नव्हते. तेवढ्यातच बलरामही जेव्हा तेथे आला तेव्हा तर सुदाम्याला अधिकच भरून आले. पुढे होऊन बलरामही सुदाम्याला सावरण्याचा प्रयत्न करू लागला आणि मोठ्या कष्टाने त्याने सुदाम्याला बरेचसे शांत केले. केविलवाण्या चेहऱ्याने कृष्णाकडे पाहणारा सुदामा काहीही बोलण्याच्या अवस्थेतच नव्हता. मग कृष्णानेच सुदाम्याशी अत्यंत शांत स्वरात बोलण्यास सुरूवात केली,

“अरे सुदाम्या, तुला वाईट वाटणे अगदी साहजिकच आहे. कारण एवढे दिवस आपण प्रेमाने एकत्र राहिल्यानंतर आता दुरावा सहन करणे खरेच कठीण आहे, हे मीही समजू शकतो. माझ्याही ठिकाणी तशीच भावना आहे. परंतु ज्या प्रेमाने आपण एकमेकांशी जोडले गेलो आहोत ते प्रेममूळ आपल्या सद्‌गुरूंचे आहे, हीच महत्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. त्यांनी आपल्या सर्वांना त्यांच्या ठायीच्या सहज ईश्वरी प्रेमाने त्यांच्याशी जोडून घेतले म्हणूनच तर आपण सर्व एकमेकांशी जोडले गेलो हे खरेच आहे. आपल्या सद्‌गुरूंच्या अंतःकरणातील प्रेमस्वरूप अवस्था हेच आपल्याठायीच्या प्रेमाचे मूळ आहे. त्यांच्या प्रेमामुळेच आपल्याठायी प्रेम आहे हे आपल्या लक्षात आले की मग ते प्रेमही केवळ आपल्या सद्‌गुरूंसाठीच आहे हे आपल्या ध्यानात यायला जराही वेळ लागायचा नाही. पण आपले सद्‌गुरू सांदिपनी यांच्या अनुभवाची तर अनेक अंगे प्रगट आहेत. त्यामुळे आपल्या सद्‌गुरूंवरील आपले प्रेमही एकांगी न राहता तेही अनेक अंगाने विस्तारित पावते. आपण सर्व शिष्यही आपल्या सद्‌गुरूंचीच अविभाज्य अशी अंगे आहोत आणि त्यांच्या हृदयाला कायमची जोडलेली आहोत. खरे तर, त्यांच्या हृदयाठायी स्फुरून आलेली अशीच आपण त्यांची अंगे आहोत. आपण एकेक शिष्य म्हणजे त्यांच्या हृदयातील एकेक लहरच होय. तेच आपले खरे अस्तित्व आहे आणि या भावानेच आपलेही एकमेकांवर प्रेम आहे. फक्त या प्रेमाच्या मुळाची जाणीव मात्र आपल्याला नित्य हवी.

हे सुदाम्या, तू माझा परममित्र आहेस. तुझी मैत्री मी कधीही विसरणे शक्यच नाही. परंतु आपले खरे स्नेही आपले सद्‌गुरू आहेत हे लक्षात ठेव. तेच सदैव आपल्या आत्महिताची चिंता वहात असतात. आपले आत्मकल्याण व्हावे हा त्यांचा केवळ संकल्पच नाही, तर त्यांच्याठायी तसा ध्यास नित्यच असतो. त्यांच्या ध्यासाची पूर्ती करण्यासाठी प्रयत्न मात्र आपल्यालाच करायला हवेत. त्यासाठी आपल्या मनाला प्रयत्नपूर्वक सद्‌गुरूंच्या संगतीत ठेवले पाहिजे. मनाला असा सद्‌गुरूंचा संग नित्य जडण्यासाठी त्यांचाच सततचा सहवास आणि त्यांचीच सेवा आपल्याकडून घडावयास हवी. तरच

त्यांचे आपल्यावरील प्रेम त्यांना अनुभवता येईल आणि आपल्यालाही त्यांचे आपल्यावरील प्रेम अनुभवण्याची संधी प्राप्त होईल.”

आपल्या सद्‌गुरूंचे माहात्म्य व थोरवी याचे भक्तिभावाने व स्वानुभवाने वर्णन करता करता केवळ कृष्णच भारावून गेला असे नव्हे, तर सर्वच जण त्या भावाने भारित झाले आणि तेथील सर्व वातावरणच भारून गेल्यासारखे झाले. पण प्रभावित झाला तो मात्र फक्त सुदामा! आज कृष्णाचे वेगळेच रूप त्याच्या दृष्टीस आले आणि आपले सद्‌गुरू सांदिपनी यांच्याकडे पहाण्याची खरी दृष्टी त्याला लाभली. त्याच्या मुखावरील दुःखाचे केविलवाणे भाव कुठच्या कुठे विरून गेले आणि ती जागा आता शांतीने घेतली. केवळ त्याच्या मनाचे पूर्ण समाधान झाले होते असे नव्हे, तर कृष्णाच्या बोलण्याचा निश्चयात्मक परिणाम सुदाम्यावर झाला होता आणि तो त्याच्या मुखावर स्पष्टपणे दिसत होता. सुदाम्याने कृष्णाकडे पाहून मंदस्मित केले आणि कृष्णाचा हात हातात घेण्यासाठी म्हणून तो हळूच पुढे आला असता, कृष्णाने त्याला आपल्या जवळ घेऊन प्रेमभराने दृढ आलिंगन दिले. सुदाम्याच्या सर्वांगातून आनंदाची एक लहर खेळली आणि त्याचे अंग नि अंग रोमांचित झाले. कृष्णाने सुदाम्याला आपल्यापासून हळूवारपणे दूर केले असता सुदामा बलरामाच्याजवळ गेला. बलरामाने प्रेमाने सुदाम्याच्या पाठीवर थोपटून त्याला प्रोत्साहित केले आणि तो कृष्णाच्या शेजारी येऊन उभा राहिला. कृष्ण व बलराम यांनी सर्व आश्रमवासीयांना हात जोडून अभिवादन केले आणि प्रेमभराने त्यांचा निरोप घेतला.

तेवढ्यात सांदिपनींची पत्नी आतून बाहेर आली आणि तिने कृष्ण व बलराम यांच्या हातावर शुभशकुनाचे दही ठेवले. उभयतांनी गुरूपत्नीकडे प्रेमपूर्ण नजरेने पहात त्या दह्याचे सेवन केले आणि तिला नम्रपणाने वाकून नमस्कार केला. पुढच्याच क्षणी कृष्ण व बलराम एकमेकांचे हात हातात घेऊन तेथून निघून एकेक पाऊल हळूहळू टाकीत चालू लागले. त्यांच्या मागोमाग थोडे अंतर ठेवून सुदामाही त्यांच्या नकळतच चालत राहिला. आश्रमाच्या प्रवेशद्वाराशी आल्यावर मात्र कृष्ण व बलराम यांनी सुदाम्याला तेथेच थांबवून निरोप देण्यास सांगितले. सुदाम्यालाही त्याची मर्यादा लक्षात

आली आणि त्याने त्या उभयतांना प्रेमाने हात जोडून वंदन केले आणि तो तेथेच थांबला. कृष्ण व बलराम मात्र जराही मागे वळून न बघता आधी हळूहळू, पण मग वेग घेत चालत राहिले. त्यांची मूर्ती अस्पष्ट होता होता अगदी दिसेनाशी होईपर्यंत सुदामा तेथेच थांबून राहिला होता. कृष्ण व बलराम यांची मूर्ती पूर्णपणे दृष्टीआड झाल्यावरच सुदामा तेथून मागे वळला आणि एकेक पाऊल हळूहळू पण निश्चयात्मक भावाने टाकीत, आपल्या पर्णकुटीपर्यंत येऊन पोहोचला. पर्णकुटीत शिरल्यावर कृष्ण व बलराम यांच्याविना असलेली ती पर्णकुटी सुदाम्याला एकदम एकाकी व रिकामी जाणवू लागली आणि एवढा वेळ आवरून धरलेले त्याचे सर्व भाव त्याच्या नेत्रांद्वारे मोकळेपणाने वाहू लागले. पण आत्ताचे त्याचे अश्रू मात्र केवळ भावनात्मक व दुर्बलतेचे नव्हते, तर त्यामध्ये कृष्णप्रेम व सांदिपनींचे माहात्म्य पूर्णपणे भरून राहिलेले होते.”

एवढा वेळ आवेगाने बोलणाऱ्या नारदाच्या वाणीचा वेग अचानक थांबला, तो काही त्याची वाणी थकली म्हणून खचितच नव्हे. पण त्याच्या अंतःकरणाची भावपूर्ण अवस्थाच एवढी शिगेला पोहोचली की त्याला शब्दांचाही भारच जाणवू लागला आणि म्हणूनच शब्दांकन करणेही त्याला जडच जाऊ लागले. नारदाची झालेली ही भारित अवस्था लक्ष्मीला लगेचच जाणवली. कारण तिच्याही मनाची अवस्था तेवढीच भावपूर्ण झालेली होती. परंतु त्याही अवस्थेत तिची श्रवणातुरता कायमच होती. पण लक्ष्मीने श्रवण करायचे तर नारदाने बोलणे आवश्यक होते आणि आता नारदाचे बोलणे पुढे चालू रहायचे, तर त्याला त्याकरिता पुन्हा उद्युक्त करण्यासाठी म्हणून लक्ष्मीने आता त्याच्याशी बोलणे अत्यावश्यक झालेले होते. पण लक्ष्मीसुद्धा श्रवणाने उत्कट झालेला तिचा भाव मोकळा करून व्यक्त करण्यासाठी तेवढीच आतुर झालेली होती हे महत्वाचे. कारण तेच तर लक्ष्मीकडून घडत असलेल्या श्रवणभक्तीचे लक्षण होते. त्यामुळेच नारदाचे बोलणे थांबणे आणि लक्ष्मीचे बोलणे सुरू होणे, यामध्ये वेळेचे काहीच अंतर पडले नाही. जणू एखाद्या वाद्यातून निघणारे सूर वादन थांबल्यावर लयाला जातात न

जातात, तोच तेच सूर, त्याच लयीत दुसऱ्या वाद्याच्या वादनातून घुमू लागावेत तसेच झाले. सगुण प्रेमभक्तीचे नारदाने घुमवलेले नाद व सूर आता लक्ष्मीच्या मुखातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडू लागले आणि नारायणाच्या सगुण प्रेमभक्तीचे मंगल व आनंददायी असे सुमधुर गायन चालूच राहिले. सांदिपनींच्या आश्रमात घडलेल्या भावपूर्ण प्रसंगांच्या मालिकेने भावपूर्ण झालेल्या लक्ष्मीच्या मुखातून शब्दांचा प्रवाह प्रगट होऊ लागला. त्याला मग तिचाही नाईलाजच झालेला होता.

"अरे नारदा, कृष्णाकडून घडलेल्या सद्‌गुरूभक्तीचे वर्णन करण्याच्या भरात तू भक्तीचे केवढेतरी माहात्म्य प्रगट करून राहिला आहेस. त्याला पारावारच नाही हे अगदी खरेच आहे. सगुण प्रेमाने सतत वाहणाऱ्या भक्तीप्रवाहाचे पात्र नुसतेच रूंदावत रहात नाही, तर ते अधिकाधिक सखोल व म्हणूनच गहन होत राहते. त्याचीच परिणती आनंदाच्या सागराला मिळूनही वहात राहण्याच्या अनुभूतीत सहजपणे होते, हे मूलभूत व त्रिकालाबाधित सत्यच तुझ्या मुखातून साकार होत आहे.

प्रेममूळ व भक्तीचे आनंदफळ याची सांगड तर अद्‌भुतच आहे आणि तूही अगदी यथार्थपणे ती प्रगट करून दाखवित आहेस. ईश्वरी प्रेमाचे मूळ सद्‌गुरूंच्या प्रेमस्वरूप अंतःकरणाच्या ठायी असते आणि त्या मुळापासून प्राप्त झालेल्या प्रेमरसाच्या पूर्ण सेवनाने सत्शिष्य हाच प्रेमरसाने परिपूर्ण झालेल्या फळासारखाच सद्भक्त होऊन राहतो. म्हणजेच सत्शिष्याच्या अंतःकरणाची अवस्थासुद्धा सद्‌गुरूंच्या अंतःकरणासारखी प्रेमस्वरूप होऊन राहते. त्यामुळेच त्या सद्भक्ताकडूनही ईश्वरी प्रेम सर्वांसाठीच सहजपणे प्रगट होत राहते, ज्याप्रमाणे सूर्याचा प्रकाश, फुलांचा सुगंध, साखरेची गोडी आणि फळांचा रस हा सर्वांसाठी सारखाच प्रगट व उपलब्ध असतो. अर्थात् सर्वांनाच त्याचा सारखा लाभ होतोच असेही नाही. ते पुन्हा ज्याच्या त्याच्या भाग्यावर व भावावरही अवलंबून आहेच ना! परंतु ज्यांच्या मनाला त्या ईश्वरी प्रेमाचा स्पर्श झाला, एवढेच नव्हे, तर त्या प्रेमाने मन भरून ते प्रेम अनुभवण्याचा एकीएक छंद नव्हे, तर ध्यासच ज्यांना लागला ते मात्र अत्यंत

भाग्यवंत ठरले. कारण त्या प्रेमध्यासानेच त्यांच्याकडून प्रत्यक्ष सगुण सद्‌गुरूंचीच भक्ती घडली आणि तेही प्रेमस्वरूप होऊन स्वानंदाचा अनुभव घेते झाले. हा मूळ सत्यसिद्धांतच अनेक सद्भक्तांच्या अनुभवाने व त्यांच्या चरित्राद्वारे सिद्ध होऊन राहिला आहे.

हे नारदा, तुझ्या कृष्णकथेचा प्रेमप्रवाह जेव्हा सुदाम्यापर्यंत येऊन पोहोचला तेव्हा तर अगदी कमालच झाली. मला तरी ते अनपेक्षितच होते. परंतु सामान्यांच्या अपेक्षेच्या पलीकडे घडणे हा तर ईश्वरी नियतीचा जणू अलिखित नियमच आहे. जे महानुभवी महात्मे असतात ते निरपेक्ष असल्यामुळे कशाचीच अपेक्षा करीत नाहीत आणि म्हणूनच ईश्वरी नियतीत काहीही घडले तरी त्या महात्म्यांना मात्र ते अनपेक्षित नसतेच. हेच तर त्या महात्म्यांच्या ईश्वरी अनुभवाचे लक्षण व माहात्म्य आहे. तरीही कृष्णाने अनुभवलेले सांदिपनींचे ईश्वरी प्रेम ज्या सुदाम्याला कृष्णाकडून सहजपणे मिळत होते, त्या सुदाम्याला कृष्णाने त्या प्रेमाचे मूळ दाखवले, हा मात्र कृष्णाच्या सदगुरूविषयीच्या भक्तिभावाचा अगदी कळसच झाला असेच म्हणावे लागेल. खरे तर, सांदिपनींचे ईश्वरी प्रेम प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी सुदाम्यालाही होती. परंतु सुदाम्याला त्याच्या स्वभावामुळे ती साधता आली नाही असेच मला जाणवते. तरीही सुदाम्याच्या भाग्याने सुदाम्याला ते प्रेम कृष्णाच्या द्वारा मिळाले. त्याला ते कळले नसेल, पण कृष्णाने सुदाम्याला त्या प्रेमाच्या मुळाची जाणीव मात्र करून दिली आणि सुदाम्याला सांदिपनींकडे वळवले. सांदिपनींविषयीच्या भक्तिभावामुळे कृष्णाकडून अगदी सहजपणे ते घडले. आता त्या कळलेल्या प्रेमाने सुदामा सांदिपनींकडे वळला की नाही हेच जाणून घेण्याची अतीव आतुरता माझ्या ठिकाणी लागून राहिलेली आहे. कारण त्या प्रेमाची एकदा का जाणीव झाली की सुदाम्यालाही स्वस्थ बसणे शक्यच झाले नसणार. त्याच्या मनालाही ते प्रेम अस्वस्थ करून ठेवणार याची मला अगदी खात्री आहे आणि सांदिपनी मात्र त्यांच्या सहजवृत्तीने स्वस्थचित्तच असणार. तेव्हा कृपा करून मला ते सर्व सर्व अगदी विस्ताराने वर्णन करून सांगावेस अशीच तुला प्रेमपूर्वक अगदी प्रार्थनाच करते. तिचा स्वीकार करून मला उपकृत करावेस अशी पुन्हा एकदा विनंती.”





लक्ष्मीचे भक्तिभावाचे बोलणे नारदाला संतुष्ट करते झाले. कारण श्रवणाने लक्ष्मीचे मन केवळ भावनात्मक झालेले नसून, त्याठिकाणी लक्ष्मीकडून मननही घडत आहे आणि त्यामुळेच लक्ष्मीचे बोलणेही विचारपूर्वक घडत आहे, हे नारदाच्या लक्षात आले. त्यातून लक्ष्मीच्या बुद्धीचा निश्चय आणि तिच्या चित्ताला जडत असलेला ध्यासच दिसत होता. नारदाला उत्साहित व उत्तेजित करून बोलते करण्यासाठी एवढे कारण पुरेसे होते. नारदाच्या अंतरातील स्वानुभवाचे गुज मग त्याच्या बोलण्यातून सहजतेने प्रकट होऊ लागले.

“हे लक्ष्मी, तुझे श्रवण व मनन खरेच भक्तिभावाने होत आहे आणि म्हणूनच तुझ्या मनातील विचारांची दिशाही योग्यच आहे. सगुण ईश्वरी प्रेम अनुभवण्याची संधी फारच थोड्या भाग्यवंतांना मिळते हे खरेच आहे. त्या प्रेमातून ईश्वराची सगुण भक्ती करण्याचा पराक्रम करणारे तर दुर्मिळच असतात. त्यातूनही भक्तिभावाने ईश्वराशी ऐक्य पावून त्याचेच भक्त होऊन राहणारा तर अत्यंत विरळाच! पण असे अनेक भक्त या सृष्टीच्या इतिहासात होऊन ईश्वरचरणी विलीन झाले हीसुद्धा वस्तुस्थितीच आहे. त्या भक्तांनीच खऱ्या अर्थाने ईश्वरी प्रेम अनुभवले. त्यांच्यामुळेच ते ईश्वरी प्रेम अनुभवण्याची संधी अनेकांना उपलब्ध होत राहिली आणि त्यांच्याद्वारेच ईश्वरी प्रेमाची लागण अनेकांना लागत राहिली. अशा या प्रेमाच्या लावालावीमुळेच एकाहून एक अद्‌भुत व श्रेष्ठ असे भक्त, कठीण व खडतर काळाच्या प्रवाहातही शारीरिक कष्ट व मनाचे क्लेश यांची जराही पर्वा न करता, प्रेमाने घडत राहिले आणि म्हणूनच सगुण प्रेमभक्तीचा आनंददायी मार्गही त्यांच्या जीवनातून प्रगट होत राहिला. असो.

हे लक्ष्मी, ईश्वरी प्रेमाची अशीच लागण कृष्णामुळे सुदाम्याला लागली. त्याला जरी मनाची थोडी अस्वस्थता जाणवत होती, तरीही कृष्णाने दाखवलेला सद्‌गुरूचरणी जाण्याचा मार्ग सुदाम्याला दिसल्यामुळे सुदामा तसा निश्चिंतही झाला होता. आता फक्त प्रयत्नाचा महत्वाचा भाग सुदाम्यासाठी राहिला होता आणि ते प्रयत्न त्याच्या ठिकाणी निर्माण

झालेल्या कृष्णप्रेमामुळे आणि सांदिपनींच्या माहात्म्याच्या जाणीवेमुळे अगदी सहजपणे घडणार होते. त्याची खात्री सुदाम्याच्या ठायी पूर्णपणे होती. म्हणूनच सुदामा रात्रभर आपल्या पर्णकुटीत डोळे मिटून नुसताच पडला होता. त्याला झोप लागणे तर शक्यच नव्हते. त्याचे मन केवळ पहाट होण्याचीच वाट पहात असावे. कारण भल्या पहाटेच, जागेच असलेले सुदाम्याचे तनही एकदम उठले आणि आपले सर्व आन्हिक उरकून सांदिपनींच्या पर्णकुटीकडे सहजपणे चालू लागलेही.

• • •

हे लक्ष्मी, रात्रभर शांतपणे पहुडलेले आणि आपल्याठायीच आत्मरत असलेले सांदिपनी, पहाटेच्याही बराच काळ आधी देहभानावर आले आणि नेहमीप्रमाणेच नित्यक्रम करण्यासाठी सावध झाले. आपल्या पर्णकुटीच्या बाहेर सांदिपनी आले मात्र, त्या काळोखातही तेथे हात जोडून उभा असलेला सुदामा त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला आणि सांदिपनींना नवलयुक्त आनंद झाला. सर्व परिसरात अत्यंत गारवा असूनही तेथे नम्रभावाने उभ्या असलेल्या सुदाम्याला पाहून सांदिपनींच्या मनाला कौतुक वाटले आणि समाधानही झाले. त्यांनी सुदाम्याकडे पाहून मंदस्मित केले असता तेच सांदिपनींचे अनुमोदन आहे असे जाणून सुदामा पटकन पुढे झाला आणि गरम पाण्याने भरलेला गडू आपल्या हातात घेऊन त्यातील पाणी सांदिपनींच्या हातावर ओतू लागला. सांदिपनींनी त्याला हातानेच खूण करून थांबवले आणि त्याच्या हातातील गडू आपल्या हातात घेतला. गडूतील पाणी आपल्या हातात हळूहळू घेत सांदिपनींनी आपले मुखमार्जन पूर्ण केले असता, सुदाम्याने लागलीच तेथे ठेवलेले धूत वस्त्र आपल्या हातात घेतले आणि सांदिपनींचे चरण पुसण्यासाठी तो पुढे वाकला. सांदिपनींनी सुदाम्याला पुन्हा थांबवले आणि ते धूत वस्त्र स्वतःच्या हातात घेऊन स्वतःच आपले पाय पुसू लागले. सुदाम्याला थोडेसे भांबावल्यासारखे झाले. ‘आपली सेवा

आपल्या सद्गुरूंना नको आहे, की त्यांना ती मानवत नाही आहे' या विचाराने क्षणभर सुदाम्याच्या मनात शिरकाव केला खरा, परंतु पुढल्याच क्षणाला त्याने तो विचार मनातून झटकन झटकून टाकला आणि तो आपल्या सेवाभावाने तत्पर व सावध होऊन राहिला.

त्यानंतर सांदिपनी जेव्हा स्नानासाठी क्षिप्रा नदीच्या काठी जाण्यास निघाले तेव्हाही त्यांच्याबरोबर जावे असा विचारही सुदाम्याच्या मनात आला होताच. परंतु तसे करण्याचे वा सांदिपनींना तसे विचारण्याचेही धैर्य सुदाम्याला झाले नाही. सुदामा केवळ हात जोडून पर्णकुटीच्या दारापाशी उभा राहिला होता. सांदिपनी येण्याची खूण करतील या अपेक्षेने थांबलेल्या सुदाम्याचा अपेक्षाभंगच झाला. कारण आत्मनादात मग्न असलेल्या सांदिपनींनी सुदाम्याकडे बघितल्या न बघितल्यासारखे केले आणि त्वरेने ते आपल्या मार्गाने निघूनही गेले. सुदाम्याच्या नेत्रांत किंचित पाणीही आले. परंतु लगेचच आपले डोळे त्याने हळूच पुसून घेतले आणि तो तेथेच थांबून राहिला. त्याला वाईट तर निश्चितच वाटलेले होते. परंतु काय करावे हेही त्याला कळत व सुचत नव्हते. वाट पहात राहणे एवढेच त्याच्या हातात होते आणि तेवढेच तो श्रद्धेने करीत होता.

हे लक्ष्मी, सुदाम्याप्रमाणे तुझ्याही मनात एखादे वेळेस प्रश्न येण्याची शक्यता आहे की सांदिपनींना सुदाम्याची सेवा न घ्यावी, असे का वाटत असावे? ते सुदाम्यावर नाराज होते की काय? परंतु तू सुद्धा हे नक्की जाणून आहेस की सांदिपनींच्या विशुद्ध अंतःकरणात असा नकारात्मक भाव तर संभवतच नाही आणि तेथे तरतम भावही असू शकत नाही. मग तरीही सुदाम्याची सेवा स्वीकारण्यासाठी सांदिपनींना काय मानसिक अडचण येत असेल बरे? हा प्रश्न शिल्लक राहतोच.

तर हे लक्ष्मी, या प्रश्नाचे उत्तर असे आहे, की सांदिपनींसारखे महात्मे जे सदैव आत्मरतीचा अनुभव घेत असतात, ते देहभानावर आधी जास्त नसतातच आणि जे काही किंवा जेव्हा कधी देहभानावर असतात, तेव्हा

त्यांचे ते देहभान त्यांच्यापुरतेच सीमित असते. त्यामुळे त्यांच्याकडूनच त्यांच्या देहाची काळजी सहजपणे घेतली जात असते. देहात वास्तव्य करून असलेल्या आत्मदेवाच्या जाणिवेने जणू काही स्वतःच्या देहाची सेवा त्यांच्या स्वतःकडूनच घडत असते, असेच म्हणावे लागेल. म्हणूनच ते स्वतःच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी असतात व दिसतातही. त्यामुळे बाह्यांगाने जर कोणीतरी एकदम काहीतरी, अगदी सेवा म्हणून सुद्धा, त्यांच्यासाठी करू लागला तर त्यांचे मन ती सेवा स्वीकारण्याच्या अवस्थेतच नसते. त्यामुळेच बाह्यकृतीचा स्वीकारही त्यांच्याकडून घडू शकत नाही. अचानकपणे जर कोणी एकदम त्यांच्यासाठी प्रेमाने म्हणूनही का होईना, पण काहीतरी कृती करून त्यांच्या मनाच्या अवस्थेत घुसू लागला, तर त्यांचे मनही व्यथित होतेच आणि मग त्यांच्या मनाची व्यथा एखाद्या उत्स्फूर्त कृतीने वा शब्दाने त्यांच्याकडून व्यक्तही होते. त्यांच्या त्या प्रतिक्रियेमागील त्यांची मनःस्थिती जर लक्षात आली नाही, तर मग त्यांची सेवा करू पाहणाराही नाराज होतो किंवा एखादे वेळेस रागवूही शकतो. कोणाच्या ठिकाणी नैराश्य येऊ शकते किंवा अश्रद्धाही निर्माण होऊ शकते हे अगदी खरे आहे. पण त्यासाठी त्या महात्म्यांचाही इलाजच नसतो. त्यांच्या आत्मरतीच्या अवस्थेला जराही बाधित न करता, त्यांच्या मनाकडून योग्य इंद्रियांच्या द्वारा देहानुषंगिक योग्य कृती एवढ्या नकळतपणे घडते, की खुद्द त्यांच्याही ते लक्षातच येत नाही.

हे लक्ष्मी, दुसऱ्याची सेवा करायची तर त्यासाठी आधी त्याचे मन जाणून घ्यावयास हवे. कारण तरच त्याने दुसऱ्याच्या मनाला बरे वाटेल. नाहीतर ती सेवा म्हणजे निव्वळ एक काम होईल आणि ज्याच्यासाठी ते करायचे त्याला व करणाऱ्यालाही मनावरती ते एक ओझेच होऊन राहील. आता दुसऱ्याचे मन जाणावयाचे तर त्याच्यावरती आधी आपले प्रेमच हवे; असे प्रेम निर्माण होण्यासाठी सहवासच हवा आणि सहवासात दुसऱ्याचे प्रेम आधी आपण केवढेतरी अनुभवावयास हवे. त्यासाठी तो दुसरा हा आपल्या जीवनात प्रथम स्थानावर असावयास हवा आणि त्यानंतर दुसऱ्या





स्थानावरती आपण स्वतः असावयास हवे. अर्थात् सांसारिकांच्या व्यावहारिक जीवनात असा अनुभव घेता येणे शक्यच नाही. तशी अपेक्षा करणेही चुकीचे ठरेल आणि अपेक्षाभंगाच्या दुःखास ते आमंत्रण देण्यासारखेच होईल.

अशा प्रेमाचा अनुभव घेणे आणि अशी प्रेमसेवा घडणे हे तर केवळ महात्म्यांच्या संबंधातच योग्य आहे. तेही त्या महात्म्यांच्या प्रेमस्वरूप अवस्थेमुळेच शक्य होते हेसुद्धा लक्षात ठेवावयास हवे. अशा महात्म्यांचा सहवास प्राप्त होणे हे दुर्मिळच आणि म्हणूनच परमभाग्याचे आहे. त्या महात्म्यांना अनन्यभावे शरण गेल्यानंतर कृपावंत होऊन त्यांनी जर गुरू-शिष्य असे प्रेमाचे नाते जोडले, तरच त्यांच्या सहवासाची संधी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळेच त्या महात्म्यांच्या ईश्वरी प्रेमाचा अनुभव घेणेही शक्य होते आणि त्यांच्याविषयी प्रेम निर्माण होण्याची शक्यताही वाढते. त्या प्रेमातून त्या महात्म्यांची प्रत्यक्ष सेवा करण्याची संधी मिळणे मात्र, त्या महात्म्यांच्या आंतरिक अवस्थेवर आणि त्यांच्या वृत्तीवरच अवलंबून आहे हे मात्र अगदी खरे आहे. केवळ त्यांच्यावरील प्रेमाने युक्त राहून सेवेसाठी तत्पर होऊन राहणे एवढेच शिष्याच्या स्वाधीन असते. तेथे दुसरा कोणताही नियम व इलाज नाहीच.

म्हणूनच खऱ्या शिष्यभावाची सद्गुरूंच्या सहवासात नेहमीच कसोटी लागत असते. सद्गुरू मुद्दामहून काही कसोटी घेत नसतात. प्रेमाने व श्रद्धेने जो शिष्य त्या कसोटीला पुरेपूर उतरतो तोच सत्शिष्य ठरतो. त्याच्याकडूनच सद्गुरूंची भक्ती घडत राहते आणि तोच सद्भक्त होऊन राहतो. सद्गुरूंशी पूर्णपणे ऐक्य पावूनही, केवळ आपल्या सद्गुरूंचा भक्त हेच व एवढेच त्याचे अस्तित्व मात्र शिल्लक उरते."

नारदाच्या मुखातून भक्तीचे माहात्म्य व रहस्य श्रवण करताना लक्ष्मीला आनंद तर निश्चितच होत होता. पण तो आनंद केवळ माहात्म्याच्या श्रवणाचा होता. खऱ्या भक्तीचे रहस्य जाणता जाणता लक्ष्मी मात्र अधिकाधिक गंभीरच होत होती. तिचे हे गांभीर्य नारदाच्या लक्षात आले आणि त्याला त्यामुळे समाधानच वाटले. कारण श्रवण केलेला विषय लक्ष्मी

गंभीरतेने घेत असल्याचेच ते लक्षण होते. त्यामुळे नारदानेही आपले बोलणे थोडा वेळ आवरुन घेतले आणि तो लक्ष्मीकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहात राहिला. नारदाच्या पहाण्यातील भाव लक्ष्मीनेही ओळखले आणि तिनेही गंभीरपणे बोलावयास सुरुवात केली. त्यामुळे साहजिकच लक्ष्मीच्या बोलण्याचाही सूर धीरगंभीर व हळुवार असाच लागला होता.

"हे नारदा, सगुणभक्तीचे माहात्म्य प्रगट करीत असतानाच तुझ्याकडून त्याचे जे रहस्य प्रगट होत आहे, ते तर मला अधिकच विचार करायला व त्यामुळेच अत्यंत गंभीर व्हायलाही भागच पाडीत आहे. तसे बघायला गेले तर सगुण भक्तीचा मार्ग स्पष्ट व सरळ आहे, कारण तो प्रत्यक्ष दोन व्यक्तींमधील संबंधांचा आहे. त्यातील पहिली व मुख्य व्यक्ती म्हणजे, ज्यांच्या रूपाने या नारायणाचे प्रेमस्वरूप अंतःकरणच व्यक्त झालेले आहे असे नारायणाशी ऐक्य पावलेले थोर महात्मे आणि दुसरी व्यक्ती म्हणजे, परमभाग्याने त्या महात्म्यांच्या सहवासात येऊन त्यांच्या प्रेमाला प्राप्त झालेली व पात्र ठरलेली भाग्यवान व्यक्ती. त्यामध्ये महात्म्यांच्या अंतःकरणाची अवस्था हीच प्रमाणभूत आहे हे तर खरेच आहे. परंतु त्यांची ती अवस्था पूर्णपणे जाणणे केवळ कठीणच नव्हे, तर जवळ जवळ अशक्यच वाटते. कारण मनाच्या कल्पनेने किंवा बुद्धीच्या तर्काने तर त्या महात्म्यांची अवस्था जाणता येणे केव्हाही शक्यच नाही. बरे, जरी कधीतरी त्यांची अवस्था त्यांच्याकडूनच उत्स्फूर्तपणे प्रगट झाली, तरी ती कळणे वा त्याचा स्वीकार करणे हे सामान्य व्यक्तींना जमणारच नाही. त्याच्यासाठी त्या महात्म्यांविषयी केवढा तरी भक्तिभावच हवा.

आपल्या भक्तिभावाचा अनुभव घेण्यासाठी केवळ महात्म्यांच्या प्रेमाने व त्यांच्या माहात्म्याच्या जाणिवेने युक्त होऊन राहणेच पुरेसे नाही. त्यासाठी त्या महात्म्यांच्या अंतःकरणाच्या अवस्थेचाही विचार आधी करणे केवळ अत्यंत आवश्यकच आहे असे नाही, तर तेच अत्यंत महत्वाचे आहे. कारण ज्या महात्म्यांना आपला प्रेमभाव भक्तिभावाने अर्पण करायचा, त्यांची मनःस्थिती

तो भाव स्वीकारण्याची आहे की नाही, याचा विचार आधी व प्रामुख्याने हवा. नाहीतर आपल्या भावाची त्यांच्यावरती एक प्रकारे जबरदस्तीच केल्यासारखे होईल आणि जेथे प्रेम आहे तेथे तर कोणत्याही प्रकारची सक्ती ही संभवतच नाही. त्या प्रेमापोटी तर केवळ प्रेमाची विनंती किंवा फार तर थोडाफार आग्रह एवढेच शक्य आहे. त्यातूनही आपल्या प्रेमाच्या एखाद्या विशिष्ट कृतीचा, एखाद्या विशिष्ट वेळी त्या महात्म्यांनी स्वीकार केला नाही, तर तो आपल्या भावाला नकार नसून केवळ त्या वेळेस त्या कृतीचा अस्वीकार आहे, एवढा त्यांच्या विषयीचा विश्वास आपल्या ठिकाणी हवा. त्यासाठीच त्या महात्म्यांच्या माहात्म्याची पूर्ण जाणीव आपल्या ठिकाणी जागृतच हवी. कारण त्यामुळेच त्या महात्म्यांच्या अंतःकरणातील प्रेमस्वरूप अवस्थेबद्दलची आपली खात्री अढळ राहील आणि आपली त्यांच्यावरील श्रद्धाही निश्चल राहील. होय ना, नारदा?

म्हणूनच या माहात्म्याच्या जाणिवेला त्या महात्म्यांवरील व्यक्तिगत प्रेमाचीही जोड आपल्याठायी हवी. नाहीतर, आपले मन घडलेल्या प्रसंगाने नाराज होऊन राहील. एवढेच नव्हे, तर ते मन नाउमेदही होऊ शकेल. त्यावेळी त्या महात्म्यांची प्रेमस्वरूप अवस्था प्रगट होण्याची वाट पहात आणि त्यांच्यावरील आपल्या प्रेमाने युक्त होऊन राहणेच अत्यंत आवश्यक असते. कारण तरच, जेव्हा त्या महात्म्यांची अंतर्मुखता सरून प्रेमपूर्ण अवस्था पुन्हा प्रगट होईल, तेव्हा त्यांच्या प्रेमाचा स्वीकार करण्याची आणि त्यांच्या मनाला सुखविणारी अशी कृती करण्याची आपल्या मनाची अवस्था टिकून राहील.

अर्थात्, हे सर्व विचार व बोलणे केवळ तात्विक व शास्त्रीय झाले. ते बुद्धीला कळले व पटले तरी मन तसे वळणे व मनाची तशी समजूत होणे कठीणच आहे आणि तेच मला या सुदाम्याच्या प्रसंगातून समजून घ्यायचे आहे. कारण तसा प्रत्यक्ष प्रसंग तर सुदाम्यासाठीच घडत होता. त्याचा सेवाभाव स्वीकारण्याची सांदिपनींची मनाची अवस्था नव्हती. तेव्हा सुदामा

निराश झाला की काय? त्याचा भाव तर डळमळीत झाला नाही ना? आपल्या मनातील श्रद्धा त्याने कशी बरे टिकवून ठेवली असेल? मनाचा उत्साह राखून सेवेसाठीची तत्परता सुदाम्याने कशी सांभाळली असेल बरे? हे सर्व जाणून घेण्यासाठीच माझे मन आतुर व म्हणूनच श्रवणासाठीही तत्पर झालेले आहे. तेव्हा नारदा, कृपा करून माझ्यासाठी तुझ्या वाणीचा ओघ पुन्हा प्रगट कर ना रे!"

लक्ष्मीच्या बोलण्यातील व्याकुळता नारदाला जाणवली. जणू काही लक्ष्मीच सुदाम्याच्या भावाने युक्त झाल्यासारखी बोलत व दिसत होती आणि तेच तर तिच्याकडून घडत असलेल्या श्रवणभक्तीचे लक्षण होते. कारण म्हणूनच तर पुढील कथाभागाच्या श्रवणाचा पूर्ण आनंद घेणे लक्ष्मीला शक्य होणार होते. श्रवणभक्तीचे हे गुज जाणून असलेल्या नारदाला म्हणूनच समाधान वाटले आणि त्याच्या वाणीचा बाह्यांगाने थांबल्यासारखा दिसणारा ओघ लागलीच पुन्हा प्रगट होऊ लागलाही.

"हे लक्ष्मी, महात्म्यांवरील व्यक्तिगत प्रेम व त्यांच्या माहात्म्याची पूर्ण जाणीव यांच्या संयोगानेच भक्तिभाव निर्माण होतो हे तुझे म्हणणे अगदी यथार्थ आहे. फक्त असा संयोग होण्यासाठी योगच यावयास हवा आणि असा योग जुळून येण्यासाठी धीरच धरावयास हवा. त्यानंतर आलेला योग साधण्यासाठी सावधानता व तत्परता हवी आणि ज्याच्याठायी भक्तिभावाचे मूळ असलेली प्रेमाची आर्तता निर्माण झाली, त्याच्याच ठिकाणी ही सावधानता व तत्परता सहजतेने असते. कारण त्याच्या प्रेमार्ततेची पूर्ती करून घेण्यासाठी त्यालाच या सर्व गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते, त्याची ती आत्यंतिक व आंतरिक जरूरीच असते. अशीच अवस्था सुदाम्याची होऊन राहिलेली होती. त्याच्या ठिकाणी कृष्णाच्या अनुभवलेल्या प्रेमाचे नित्य स्मरण होते, जे त्याला नित्य आर्त व आतुर ठेवीत होते आणि त्याच्या ठिकाणी कृष्णाने सांगितलेली सांदिपनींच्या माहात्म्याची जाण व खात्री होती, जी त्या सुदाम्याला सदैव सावध व तत्पर राखीत होती. त्यामुळेच





सांदिपनींनी जेव्हा सुदाम्याच्या सेवेचा स्वीकार केला नाही, तेव्हा सुदाम्याला सुरुवातीला साहजिकच वाईट तर निश्चितच वाटले. पण तो निराश मात्र नक्कीच झाला नाही. कारण सेवाभावाची आंतरिक जरुरी मुळात सुदाम्याची होती. त्यामुळे सेवेच्या संधीसाठी जेवढा वेळ वाट पहावी लागली असती तेवढा वेळ थांबण्यासाठी सुदाम्याची मानसिक तयारी आधीच झालेली होती.

हे लक्ष्मी, सुदाम्याने सांदिपनींच्या सेवेसाठी तत्पर राहण्याचा आपला निश्चय व नित्यनेम कायम ठेवला. भल्या पहाटे उठून व आपले सर्व प्रातर्विधी भराभर उरकून सुदामा सांदिपनींच्या पर्णकुटीच्या बाहेर येऊन, त्यांच्या दृष्टिक्षेपाची वाट पाहत उभा राहत असे. त्याची तेथील उपस्थिती सांदिपनींच्या लक्षात येवो न येवो, सुदामा मात्र आपला नित्यनेम प्रेमाने राखीत होता. सांदिपनींचा नित्यक्रमही त्यांच्याकडून अगदी सहजतेने घडत होता. तसे पाहिले तर कृष्ण आश्रमात येण्याच्या आधी सांदिपनी स्वतःच स्वतःची सर्व कर्मे अगदी सहजपणे करीत असत. त्यानंतर कृष्णाचा भक्तिभाव ओळखून सांदिपनी त्याच्या सेवाभावाचा स्वीकार करीत होते आणि आता कृष्णाचे आश्रमातून जाणे घडल्यानंतर, पुन्हा तेवढ्याच सहजतेने सांदिपनी आपले व्यक्तिगत जीवन जगू लागले. या तिन्ही वेगळ्या वेगळ्या परिस्थितीतील सांदिपनींची सहजताच त्यांच्या आत्मानुभवाचे लक्षण होते. ही सहजता जी त्यांच्या बाह्य कृतीत दिसत होती, ती मुळातच त्यांच्या आंतरिक सहजवृत्तीमध्ये होती आणि ही सहजवृत्ती त्यांच्या आत्मानुभूतीमध्ये होती.

• • •

# सुदाम्याची सद्गुरूसेवा

हे लक्ष्मी, परंतु सुदाम्याच्या धीर वृत्तीचे फळ हळूहळू त्याला मिळायला लागलेच. त्याची उपस्थिती सांदिपनींच्या लक्षात येऊ लागली. सुदाम्याच्या नजरेतील व्याकुळतेच्या भावाची नोंद सांदिपनींच्या ठिकाणी आपसूकच होऊ लागली आणि सुदाम्याचा सेवाभावही सांदिपनींना जाणवू लागला. त्याचीच परिणती म्हणजे सांदिपनींच्या प्रेमळ अंतःकरणात एक प्रेमाची उर्मी अचानकपणे उठली आणि त्यांच्या नेत्रातून सुदाम्याविषयीचा प्रेमभाव साकार होऊ लागला. अशाच एका दिवशी पहाटे सुदाम्याकडे प्रेमळ नजरेने पाहत सांदिपनींनी मंदहास्य केले आणि हाताच्या खुणेने त्याला आपल्या जवळ बोलावले. मनातून सुखावलेला सुदामा हळुवारपणे एकेक पाऊल टाकीत सांदिपनींच्या जवळ येऊन व आपले दोन्ही हात जोडून नम्र भावाने उभा राहिला. सांदिपनींनी आपला हात सुदाम्याच्या मस्तकावर ठेवला आणि हलकेच थोपटले. सांदिपनींच्या त्या प्रेमळ स्पर्शाने सुदाम्याच्या सर्वांगातून एक प्रेमाची लहरच उठल्यासारखे त्याला जाणवले आणि त्या दैवदुर्लभ अनुभवाने तो अत्यंत भारावून गेला. नेत्र मिटून व भारावलेल्या अवस्थेत सुदामा तेथे तसाच उभा राहिला असता सांदिपनींच्या प्रेमळ शब्दाने थोडासा देहभानावर आला.

“अरे सुदाम्या, येथे काय करीत आहेस? कशासाठी असा उभा आहेस? कृष्ण आश्रमातून निघून गेल्यापासून तू साहजिकच थोडासा उदास झाला असणारच. कारण त्याची व तुझी खास मैत्री व विशेष स्नेह होता हे मला ठाऊक आहे. परंतु असा उदास होऊन राहू नकोस. आपला नित्य क्रम व नित्य उपासना मात्र चालूच ठेव, म्हणजे हळूहळू तुझी मनःस्थिती पूर्वपदावर येईल. तुझे मन पुन्हा मोकळे होईल. मग तुझ्याकडून विद्यार्जन अगदी मनःपूर्वक घडू लागेल आणि त्याचा आनंद तुला अनुभवता येईल.”

सांदिपनींच्या प्रेमळ वचनांनी सुदाम्याला अधिकच भरून आले. पण त्याने स्वतःला प्रयत्नपूर्वक सावरले आणि पुढे होऊन सांदिपनींच्या

चरणांवरती आपले मस्तक ठेवले. अचानक आलेला त्याचा भावनावेग पाहून सांदिपनीसुद्धा थोडेसे चकित झाले. पण त्यांनी सुदाम्याला आपल्या दोन्ही हातांनी उठवले आणि आपल्या कुशीत घेतले. मग तर सुदाम्याला त्याचा भावनावेग आवरणे शक्यच झाले नाही आणि आवश्यकही वाटले नाही. शेवटी बऱ्याच वेळानंतर व सांदिपनींनी बराच प्रयत्न केल्यानंतर सुदामा हळूहळू शांत झाला. त्याने आपले अश्रूंनी वाहणारे डोळे हळूच पुसले. तो स्वतःहूनच सांदिपनींपासून थोडा दूर झाला आणि हात जोडून अभिवादन करीत हळुवार सुरात बोलू लागला.

“अहो गुरूवर्य, आज माझे भाग्य खऱ्या अर्थाने उदयाला आले असेच मला जाणवत आहे. आपला प्रेमळ कृपाकटाक्ष व स्पर्श मला लाभला ही आपली माझ्यावरील अत्यंत कृपाच आहे. याच आपल्या कृपेला मी पात्र व्हावे एवढीच इच्छा आता माझ्या मनात शिल्लक राहिली आहे आणि त्यामुळेच माझे मन आर्त झालेले आहे. कृष्ण आता आश्रमात नाही म्हणून माझ्या ठिकाणी व्याकुळता निश्चितच आहे. परंतु कोणत्याही प्रकारची उदासीनता नाही, तर एक प्रकारची अस्वस्थता आहे आणि याला कारण एक प्रकारे कृष्णच आहे. कृष्णाचा व माझा आत्यंतिक स्नेह होता हे खरेच आहे. पण ती मैत्री व तो स्नेह कृष्णामुळेच होता. त्याच्या स्वभावानुसार कृष्णानेच पुढाकार घेऊन माझ्याशी मैत्री जुळवली. त्यामुळेच त्याच्या प्रेमाचा लाभ मला झाला आणि मला कृष्णाला जवळून पाहता आले. त्याची जवळीकताही मला त्याच्या माझ्यावरील प्रेमामुळेच मिळाली. कृष्ण तर सतत आपल्याच सहवासात असे आणि आपल्याच सेवेचा ध्यास त्याच्या ठिकाणी नित्य असे. कृष्णाच्या वागण्या-बोलण्यातून मला ते नेहमीच जाणवत असे. अर्थातच मला त्याचे महत्व त्यावेळेस अजिबात जाणवत नसे. उलट मला त्याचे नवलच वाटे. इतर कोणीही आपली अशी व्यक्तिगत सेवा करताना दिसत नसताना कृष्ण हे सर्व का व कशासाठी करीत आहे, असाच एक प्रश्न नेहमीच माझ्या मनात घर करून राहत असे.

अहो गुरूनाथ, परंतु कृष्णाचे वेगळेपण व विशेषत्व मला कळले ते मात्र बलरामाकडूनच. माझ्या मनातील विचार ओळखून बलरामच माझ्याशी

आपणहूनच बोलत असे. तेव्हा मग मला थोडे थोडे कळत असे. पण जेव्हा बलरामाने मला कृष्णाच्या गोकुळातील जीवनाविषयी सांगितले तेव्हा मात्र कृष्णाकडे पाहण्याची माझी दृष्टीच बदलली. 'कृष्णाने गोकुळात केलेल्या आनंददायी अशा अनेक प्रेमलीला, कृष्णावर व त्याच्या निमित्ताने सर्व गोकुळावरही आलेले कठीण प्रसंग, त्या सर्व कठीण प्रसंगांवर कृष्णाने प्रयत्नपूर्वक केलेली मात, कृष्णाचे राधेवरील प्रेम व राधेची कृष्णावरील प्रेमभक्ती, त्यामधील अनयाची भूमिका व त्याला झालेला पश्चात्ताप आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे भक्तिभावाने कृष्णाशी एकरूप होऊन राहिलेली राधा' अशा अनेक गोष्टी बलरामाने मला समग्र वर्णन करून सांगितल्या. त्या ऐकून आधी मी चकितच झालो खरा, परंतु नंतर मात्र माझ्या ठिकाणी कृष्णाविषयी विशेषच प्रेम निर्माण झाले. बरे, एवढे विशेष जीवन जगूनही कृष्णाठायी कधीही अहंकाराचा कणही दिसला नाही. तो तर नेहमीच व सर्वांशीच अगदी नम्रतेने व मोकळेपणाने वागत असे आणि मुख्य म्हणजे आपल्या चरणी सदैव सेवाभावाने राहत असे. त्यामुळे माझे कृष्णाकडे पाहणे हे नेहमी मानसिक आधारासाठी व प्रेमासाठी तर असेच, परंतु त्याहूनही एक आदर्श म्हणूनच मी नेहमी कृष्णाकडे पाहत असे.

अहो गुरूनाथ, एक सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाकडे पाहता पाहता माझी तुमच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलत गेली. कारण मला आदर्शवत असलेला कृष्ण हा तर सदैव तुमच्या माहात्म्याने युक्त होऊन, सदैव तुमच्याच स्मरणात, तुमच्याच ध्यासात व प्रत्यक्ष तुमचीच भक्ती करताना दिसत असे. त्यामुळेच मलाही तुमचे माहात्म्य हळूहळू लक्षात येऊ लागले. परंतु तरीही तुमच्याजवळ येण्याची वा तुमच्याशी प्रेमाने मनमोकळेपणाने बोलण्याची मला हिंमतच होत नसे. कारण माझ्या मनातील दोषांची जाणीव मला निश्चितच आतून आहे आणि ती जाणीवच मला तुमच्यापासून सदैव दूर ठेवीत आली. त्यामुळे मी फक्त कृष्णाच्या भावाचे कौतुकच करीत राहिलो. पण प्रत्यक्ष तशी कृती करण्याचे धाडस मात्र मला कधी जमलेच नाही.

कृष्ण आश्रमातून निघत असताना साहजिकच मी व्याकूळ झालो. परंतु कृष्ण मात्र त्याच्या माझ्यावरील प्रेमाला व मैत्रीला जागला आणि जाण्यापूर्वी तुमचे माहात्म्य व थोरवी मला सांगून गेला. कृष्णाच्या ठिकाणी अनुभवाला येणारी प्रेमळता, विनयशीलता इत्यादी सर्व सद्‍गुणांचे मूळ आपल्या ठायी आहे आणि आपल्याच कृपेचे ते फळ आहे असे कृष्णाने मला अगदी स्पष्टपणे सांगितले. एवढेच नव्हे, तर आपल्या अंतःकरणातील प्रेमस्वरूपाची जाणीव कृष्णानेच मला करून दिली आणि आपल्या प्रेमानेच माझ्या मनाची शुद्धता होऊन त्याचे दुर्बलत्व नाहीसे होईल, असे अगदी खात्रीपूर्वक सांगितले. माझ्या आत्महिताच्या मार्गाचे मूळ आपल्या चरणीच आहे आणि आपल्या कृपेनेच माझे आत्महित साधणार आहे हे गुज कृष्णाने मला प्रेमाने सांगितले, ही तर कृष्णाची माझ्यावरील कृपाच आहे.

अहो गुरूराव, आपले माहात्म्य मी प्रत्यक्ष ओळखू शकलो नाही याबद्दल मला आपल्या क्षमेस पात्र करावे. परंतु कृष्णाच्या सांगण्यामुळे का होईना, मला आपले माहात्म्य आता पूर्णपणे लक्षात आलेले आहे आणि आपले माहात्म्य जाणणे हेच तर सर्व साधनांचे व नित्य उपासनेचे फळ आहे. आपले माहात्म्य न जाणता केवळ आपण दिलेली साधनेच करीत राहणे हा तर वेळेचा नुसता अपव्ययच आहे, एवढेच नाही तर ते नुसती बाह्य कर्मांची ओझी वाहणे आहे. बरे, आपले माहात्म्य जाणायचे तर ते केवळ आपल्या सहवासातच शक्य होणार आहे आणि आपल्या सहवासातच सर्व साधनांचे साध्य साधले जाईल याची मला पूर्ण खात्री आहे. म्हणूनच आता आपल्या चरणांची नित्य सेवा करणे हाच माझा एकमेव निश्चय झालेला आहे.

मला ठाऊक आहे की केवळ कृष्ण करीत होता म्हणून मी आपल्यासाठी काही करणे हे शक्यच नाही. कृष्णाचे बाह्य अनुकरण मलाच काय, दुसऱ्या कोणालाही करता येणे शक्य नाही आणि तसे मी करणार नाही. पण माझ्या परीने मला जमेल तशी आणि आपल्याला हवी तशी सेवा माझ्याकडून घडावी, अशी तीव्र इच्छा मात्र माझ्या ठिकाणी निश्चितपणाने आहे. अशी

आपली सेवा करता करताच मी आपल्या सहवासातील प्रेमाला पात्र होईन. त्या प्रेमानेच माझ्याही मनाची शुद्धी होईल आणि माझ्या अंतःकरणात केवळ आपलेच प्रेम भरलेले राहील, याचा मला पूर्ण विश्वास आहे. आपल्या अंतःकरणात मला निश्चितपणे स्थान आहे याची मला खात्री आहे. तेव्हा आपली सेवा करण्याची संधी आपण मला देऊन माझ्यावर कृपा करावी आणि मला कायमचे उपकृत करून ठेवावे, अशी अगदी नम्रपणे आपल्या चरणी प्रार्थना करतो."

आतापर्यंत आश्रमात राहूनही सुदामा प्रत्यक्ष सांदिपनींशी दोन वाक्यांपेक्षा जास्त कधीही बोलला नव्हता. परंतु आज अचानक सुदाम्याच्या मनात एवढी तळमळ निर्माण झाली की त्याचे मन पूर्णपणे मोकळे होऊन शांत होईपर्यंत, सुदाम्याचे बोलणे थांबूच शकले नाही. पण एवढा वेळ आवेगाने बोलणारा सुदामा प्रेमाने कंठ दाटून आल्यामुळे अचानक बोलायचा थांबला. कारण त्याच्या मुखातून शब्द बाहेर येणेच अशक्य झाले. पण शब्दांची जागा अश्रूंनी घेतली आणि सुदाम्याचा दाटलेला भाव त्याच्या नेत्रांतूनच मोकळा होऊन वाहू लागला. सुदाम्याची ती भावपूर्ण अवस्था पाहून सांदिपनीही भावपूर्ण झाले. सुदाम्याच्या जवळ जाऊन त्यांनी त्याला आपल्या अगदी जवळ असे कुशीत घेतले आणि त्याच्या मस्तकावर बराच वेळ ते थोपटीत राहिले. थोड्या वेळाने सांदिपनींनीच सुदाम्याला आपल्यापासून दूर केले आणि त्याच्याकडे स्मितहास्य नजरेने पाहत आपल्या हातातील कमंडलू त्याच्या हातात दिला. सुदाम्याच्या मुखावरही समाधानाचे भाव झळकले आणि तो मोकळेपणाने हसलाही. परंतु लगेचच सावध होऊन तत्परतेने सुदामा क्षिप्रा नदीच्या तटी जाण्यास निघालेल्या सांदिपनींच्या पाठोपाठ, योग्य अंतर ठेवून चालू लागला.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने सुदाम्याच्या निष्ठेचे व त्याच्या तपश्चर्येचेच फळ त्याला मिळाले. कारण ज्या धीराने व चिकाटीने तो सांदिपनींशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न करीत होता ती एक तपश्चर्याच होती. म्हणूनच तर सांदिपनी कृपावंत झाले आणि त्यांनी सुदाम्याला त्याच्या तपश्चर्येचे फळ

दिले. मग मिळालेल्या संधीचा पूर्ण लाभ उठवण्यात सुदामासुद्धा जराही कमी पडला नाही. सतत सांदिपनींच्या व्यक्तिगत सहवासात राहून सांदिपनींची हर तऱ्हेने सेवा करून त्यांना संतोष देण्याच्याच प्रयत्नात सुदामा असे. अर्थात सांदिपनींचे मन जाणून त्यांची सेवा करावयास सुदाम्याला वेळ लागलाच. त्या प्रयत्नात कधी सांदिपनींची नाराजी किंवा कधी त्यांचा दुरावाही सुदाम्याला जाणवत असे. परंतु जराही नाउमेद वा निरूत्साही न होता सुदाम्याने त्याचा सेवाभाव कायम राखला. सांदिपनींचे बाह्यांगाचे व्यक्तिमत्व जसे जसे सुदाम्याला आकलन होऊ लागले, तसे तसे त्यांची सेवा करणे सुदाम्याला सहज व सुलभ होऊ लागले आणि जसे जसे सांदिपनींचे व्यक्तिमत्व सुदाम्याला आवडू लागले तसे तसे त्यांची सेवा करणे हे सुदाम्यालाही प्रिय होऊ लागले. सांदिपनींच्या व्यक्तिमत्वाशी जवळीकता साधली गेल्यावरती सांदिपनींचे प्रेमस्वरूप अंतःकरण सुदाम्याला जाणवू लागले आणि त्या प्रेमाचा त्याला लाभही होऊ लागला. सांदिपनींचे ते ईश्वरीप्रेम म्हणजे आत्मप्रेम अनुभवता अनुभवता ते प्रेम सुदाम्याच्या मनातून आत शिरून व बुद्धीलाही पार करून त्याच्या चित्ताचा ठाव केव्हा घेते झाले, हे तर सुदाम्यालाही कळले नाही. पण त्या प्रेमाचा एकीएक ध्यास सुदाम्याच्या चित्तामध्ये लागून राहिला होता, एवढे मात्र निश्चितच. त्या ध्यासामुळेच सुदाम्याचे मन नेहमी सांदिपनींच्या प्रेमाने भरून वाही आणि त्या प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी आर्त होऊन राही. सुदाम्याच्या सेवाभावाला प्रेमभावाची जोड मिळाली आणि त्याच्या ठायी सांदिपनींविषयी एकीएक भक्तिभावच जडून राहिला.”

नारदाच्या बोलण्याचा लक्ष्मीला होणारा आनंद लक्ष्मीच्या मुखावरती अगदी स्पष्टपणे दिसत होता आणि तो पाहून नारदाला मनोमनी होणारे समाधान त्याच्याही मुखावर तेवढ्याच स्पष्टपणे दिसत होते. लक्ष्मीला तिचा आनंद व्यक्त करण्याची संधी मिळावी या हेतूने नारदाने आपले बोलणे हेतुपुरस्सर थांबवले. नारदाचा तो हेतू लक्ष्मीनेही ओळखला आणि तिने तिचा आनंद व्यक्त करावयास सुरूवातच केली.

"हे नारदा, सुदाम्याला त्याच्या तपश्चर्येचे फळ मिळाले हे ऐकून मलाच एवढा आनंद होत आहे, मग सुदाम्याला किती बरे आनंद झाला असेल, या विचारानेच माझा आनंद आणखीनच वाढत आहे. कारण सद्‌गुरूकृपेशिवाय इतर सर्व साधने व प्रयत्न हे तर फुकटच आहेत. तो प्रयत्न म्हणजे सुद्धा एक व्यर्थ खटाटोपच आहे. सद्‌गुरूकृपा प्राप्त होण्यासाठी आधी त्यांच्या मनाला प्रसन्न करावयास हवे आणि त्यासाठी त्याची सुरूवात सेवेनेच करणे आवश्यक आहे हे अगदी खरेच आहे. कारण सेवेमुळेच त्यांच्या मनाशी जवळीकता साधणे शक्य होऊ शकते. परंतु सेवेचा स्वीकार करण्यासाठी त्यांच्या मनाची तशी अवस्था तर हवी! पण त्याचे निश्चित असे काहीच गणित व सूत्र दिसत नाही आणि त्यामुळेच सद्‌गुरूंची सेवा करून त्यांना प्रसन्न करणे हे कठीण तर आहेच, परंतु त्याचबरोबर ते आव्हानात्मकही आहे. ते आव्हान स्वीकारण्यातच मनाची खरी कसोटी लागते आणि मनाचा कस वाढत राहतो. अशा कसदार मनाकडूनच खरा पराक्रम घडतो. त्यामुळेच मनाच्या ठिकाणी धीर, संयम, सावधानता व तत्परता अशा गुणांची वृद्धी होत रहाते. मुख्य म्हणजे हे सर्व सद्‌गुरूंच्या प्रेमापोटी घडत असल्यामुळे, त्याचा मनावर कोणत्याही प्रकारचा ताण न येता ती प्रक्रिया केवळ सुसह्यच नव्हे, तर आनंदाचीही होते हे महत्वाचे आहे. होय ना?

हे नारदा, पण या सद्‌गुरूंच्या सेवेची संधी सुदाम्याने पूर्णपणे साधली की नाही हे मला तरी जास्त महत्वाचे वाटते. कारण संधी मिळणे हे जसे भाग्याने घडते, तसे त्या संधीचा पूर्णपणे लाभ उठवणे हे मात्र अत्यंत पराक्रमानेच घडू शकते हे खरेच आहे. तेव्हा सुदाम्याचा सेवाभाव हा सांदिपनींना पूर्ण समाधान देऊ शकला ना? आणि सुदाम्याला त्या सेवेचे फळ सांदिपनींकडून काय व कसे मिळाले? खरेच हे सर्व जाणून घेणे माझ्यासाठी आता अत्यंत आवश्यक होऊन राहिलेले आहे. कारण त्याशिवाय माझ्या मनाचे खरे समाधान होणे शक्यच नाही. तेव्हा नारदा, माझ्या मनाचे पूर्ण समाधान करणे हे आता केवळ तुझ्याच हातात, म्हणजे तुझ्या मनातच आहे

आणि तुझ्या मनात तेच आहे जे तुझ्या अंतःकरणातच आहे, ते म्हणजे या नारायणाच्या प्रेमरसाने भरलेल्या सगुण चरित्राचे गायन करण्याची सतत उठणारी आणि अनिवार होणारी अशी ऊर्मी. होय ना?"

लक्ष्मीच्या बोलण्यामुळे तोष पावलेल्या नारदाने मंदस्मित केले. क्षणभरच थांबून नारदाने बोलायला सुरूवात केली.

“हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबरच आहे. कारण सद्गुरूंची सेवा ही सद्गुरूंच्या भक्तीची सुरूवात आहे हे सत्यच आहे. पण ती पहिली पायरी आहे हेही लक्षात ठेवावयास हवे. ‘सेवेतून जवळीक, जवळीकतेतून प्रेम, प्रेमातून श्रद्धा, श्रद्धेतून निष्ठा, निष्ठेतून त्याग, त्यागातून भक्ती, भक्तीतून ऐक्य आणि ऐक्यातून आनंदाचा अनुभव’ अशा या सद्गुरूंच्या अंतःकरणापर्यंत पोहोचून तेथे ऐक्य पावणाऱ्या एकापेक्षा एक वरच्या पायऱ्या आहेत. त्या पायऱ्यांवरून वर चढता चढताच ऐक्याच्या अनुभवाचा आनंददायी कळस गाठता येतो. अर्थात एवढी वाटचाल सर्वांनाच झेपते असे नाही. कारण एवढे मनोबळ सर्वांच्याच ठायी असते असेही नाही.

एखाद्याच्या मनाठायी प्रेम पूर्णपणे असते. परंतु संसाराचे वैराग्य नसेल तर त्याचे मन केवळ प्रेमाच्या सुखातच अडकून राहते. त्यातून वर उठण्याचे बळ त्या मनाच्या ठिकाणी नसते. कारण केवळ सुखामुळे मन कमकुवतच होऊन राहिलेले असते. एखाद्याच्या बुद्धीला ज्ञान होऊन त्याला सर्व गोष्टी आकलनही होतात. परंतु त्या ज्ञानाचा निश्चय न झाल्यामुळे, बुद्धी केवळ शब्दज्ञानाची ओझी वाहत राहते आणि त्यामुळे अहंकाराने जडही होऊन राहते. अशी ही देहबुद्धी भक्तीमार्गाच्या वाटचालीसाठी मनाला प्रेरित तर करू शकतच नाही, पण उलट त्या मनाला अटकावच करते. काही वेळा एखाद्याचे मन प्रेमाने पूर्ण भरलेले असते आणि त्याच्या बुद्धीचा पूर्ण निश्चयही झालेला असतो. परंतु चित्ताच्या ठिकाणी संसाराची अनेक सुप्त व्यवधानेही शिल्लक असतात. त्यामुळे त्या चित्ताच्या ठिकाणी सद्गुरूंच्या अंतःकरणाशी ऐक्य पावण्याचा ध्यास लागू शकत नाही. त्यामुळे भक्तीची सर्वश्रेष्ठ ऐक्याची अवस्था त्याला साधता येत नाही.

पण हे लक्ष्मी, सद्‌गुरूंच्यामुळे ज्याच्या मनाठायी ईश्वरी प्रेम, बुद्धीच्या ठायी ईश्वरी अस्तित्वाच्या सत्याचा निश्चय आणि चित्ताच्या ठिकाणी ईश्वरी अनुभव घेण्याचा ध्यास असेल, त्याच्याच ठिकाणी विभक्ती जाणवल्यामुळे मुक्तीची खरी आर्तता निर्माण होते. त्याच्याचकडून ऐक्यभावाची भक्ती घडते आणि तोच ऐक्यत्वाच्या आनंददायी अनुभवाला पावतो. भक्तीमार्गाच्या सोपानाची ही पायरी पायरीने घडणारी वाटचाल आणि त्यातून गाठलेला भक्तीभावाचा कळस हे सर्व केवळ, सद्‌गुरूंच्या भक्तीनेच आणि त्यांच्या कृपेमुळेच शक्य होते, हे मात्र सनातन सत्य आहे.

हे लक्ष्मी, सांदिपनींच्या कृपेने सुदाम्याला अशी सुवर्णसंधी मिळाली होती हे खरेच आहे. आता मिळालेल्या त्या संधीचे सोने करणे ही जबाबदारी फक्त सुदाम्याची होती आणि त्यासाठी त्याचे मन सज्ज झालेले होते. सुदाम्याच्या मनात आता फक्त सांदिपनींचीच प्रतिमा ठसलेली होती आणि त्यांचेच ध्यान व व्यवधान सुदाम्याच्या ठिकाणी कायमचे असे. त्यामुळे सुदाम्याकडून सांदिपनींच्या बाह्य जीवनाशी जवळीकता सहजपणे होऊ लागली. पहाटे जाग आल्यापासून ते रात्री शारीरिक विश्रांतीसाठी पहुडण्यापर्यंत, सुदाम्याच्या मनात सांदिपनींशिवाय दुसरे कोणतेही विचार नसतच. मूलतः शरीराने दुर्बल असलेल्या सुदाम्याला तर शारीरिक अशक्तता वा अस्वस्थताही आता अजिबात जाणवेनाशी झाली. याचे केवळ इतरांनाच नव्हे, तर त्याचे त्यालाही नवल वाटू लागले. सांदिपनींच्या प्रेमाने त्याच्या मनाने घेतलेले बळ जणू सुदाम्याच्या शरीरालाही मिळाले होते. त्यामुळे पूर्वी थोडासा सुस्त वाटणारा सुदामा आता अतिशय चपळ व जलद हालचाली करताना दिसत असे. सुदाम्यामध्ये झालेल्या या बदलाचे सर्वांनाच नवल व कौतुक वाटले. परंतु सुदामा मात्र या कौतुकाने खुश न होता अधिक सावध झाला आणि सांदिपनींच्या सेवेसाठी अधिकच तत्पर झाला.

हे लक्ष्मी, सांदिपनींच्या नित्यक्रमानुसार सुदाम्याचा नित्यक्रम झाला. त्याला त्याचा वेगळा असा नित्यक्रम राहिलाच नाही. सांदिपनींच्या व्यक्तिगत सेवेतच सुदामा पूर्णपणे रमला. सांदिपनींना जाग येण्याच्या

आधीच भल्या पहाटे उठून सुदामा त्यांच्या पर्णकुटीच्या बाहेर उभा असे. तेव्हापासून मग सांदिपनींचे मुखमार्जन असो, नदीवर स्नानासाठी जाणे असो, यज्ञशाळेमध्ये जाऊन यज्ञ करणे असो, पाठशाळेमध्ये जाऊन वेदांचे पठण व अध्ययन करणे असो, सर्व शिष्यांबरोबर ज्ञानार्जन करणे वा चर्चा करून संवाद करणे असो, या प्रत्येकवेळी सुदामा सांदिपनींच्या बरोबर राही. बाह्यांगाने सांदिपनींना सर्वतोपरी सहाय्यभूत होता होता, सुदाम्याचे मनही त्यात हळूहळू रमले. सांदिपनींच्या स्वानुभवातून प्रगटणारी अनेक बाह्यांगे व आविष्कार पाहता पाहता, त्यांचे माहात्म्य व थोरवी सुदाम्याला अधिकाधिक जाणवू लागली. त्यांच्या स्मरणाने रात्रीच्या वेळी एकांतात असताना सुदाम्याचे मन वारंवार भरून येई. सांदिपनींकडून प्रगट होणारे ज्ञान आकलन होण्याची तेवढी क्षमता वा कुवत सुदाम्याच्या बुद्धीच्या ठिकाणी जरी नव्हती, तरी सांदिपनींचे सांगणे व त्यांच्याकडून प्रगट होत असलेले ईश्वराचे माहात्म्य सत्य आहे, एवढा निश्चय मात्र सुदाम्याच्या ठिकाणी निश्चितपणे होता. परंतु असा अनुभव घेण्याची तळमळ मात्र सुदाम्याच्या मनात निर्माण झाली नाही. मग तसा ध्यास त्याच्या चित्ताच्या ठिकाणी लागणे हे तर दूरच राहिले. परंतु सांदिपनींविषयीचे प्रेम व श्रद्धा मात्र सुदाम्याच्या ठिकाणी पुरेपूर भरून राहिलेली होती.

हे लक्ष्मी, परंतु सर्वात महत्वाची व नवलाईची गोष्ट म्हणजे एकांतात असताना कधीतरी अचानकपणे सुदाम्याच्या मनातील कृष्णप्रेमाच्या अनुभवलेल्या स्मृती जाग्या होत. मनाला मोहविणारे कृष्णाचे सुंदर मुखकमल, त्याची प्रेमळ दृष्टी व हास्य, त्याचे प्रेमाचे शब्द, हे सर्व ज्यामध्ये एकवटलेले आहे असे कृष्णाचे रूप व व्यक्तिमत्व सुदाम्याच्या मनात साकार होई आणि मग तर सुदाम्याचे देहभानच हरवून जाई. पण त्याचवेळेस त्याला कृष्णाने सांगितलेल्या सांदिपनींच्या माहात्म्याचेही स्मरण होई आणि त्याचे अंतःकरण भरून येई. सांदिपनींच्याच चरणी राहण्यामध्ये आपले हित आहे हा सुदाम्याचा निश्चय कायम होई आणि त्यांचीच सेवा करीत राहण्याचा सुदाम्याचा उत्साह वाढत राही. परंतु सांदिपनींच्या चरणी राहूनही आपल्या

मनाच्या आत कुठेतरी कृष्णप्रेमाची प्रतिमा खोलवर ठसलेली आहे याची जाणीव त्याला होत असे. त्याचे सुदाम्याला नवलही वाटे, तर काही वेळेला ‘हे योग्य आहे किंवा नाही’ असा विचारही त्याच्या मनाला थोडेसे अस्वस्थ करीत असे. परंतु सुदाम्याचाही नाइलाजच होत असे. त्याच्या मनाची अशी स्थिती होती खरी आणि त्या स्थितीशी सुदामा अत्यंत प्रामाणिक राहत असे. आपली मनःस्थिती आपले सद्गुरू सांदिपनी निश्चितपणे जाणून आहेत, याची सुदाम्याला खात्री होती. आपले काही चुकत असल्यास सांदिपनी आपल्याला तसे सांगून निश्चितपणे मार्गदर्शन करतील याचा विश्वासही सुदाम्याच्याठायी पूर्णपणे होता.

. . .

हे लक्ष्मी, असाच काही काळ गेला. एक दिवस रात्रीच्या शांत समयी सांदिपनी आपल्या पर्णकुटीत विश्रांती घेत पहुडले होते आणि सुदामा काहीही न बोलता शांतपणे सांदिपनींचे चरण हळुवारतेने चुरत होता. अचानक सांदिपनींनी आपले नेत्र उघडले. सुदाम्याकडे पाहून त्यांनी मंदस्मित केले आणि सांदिपनी आपल्या शय्येवर उठून बसते झाले. समोर हात जोडून उभे राहिलेल्या सुदाम्याला त्यांनी हातानेच बसण्याची खूण केली. सुदामा नम्रभावाने सांदिपनींच्या चरणांशी बसला असता, सांदिपनींनी शांत व धीरगंभीर सुरात सुदाम्याशी बोलण्यास सुरूवात केली,

“अरे सुदाम्या, तुझ्या या सेवेने मी तुझ्यावर प्रसन्न आहे. मी जाणून आहे की माझी सेवा सुरूवातीला तू कृष्णाच्या सांगण्यावरून करावयास सुरूवात केलीस. परंतु आता तुझ्याही ठिकाणी हळूहळू सेवाभाव निर्माण झाला आहे, हेही मला निश्चितपणे जाणवत आहे आणि त्याचाच मला अत्यंत संतोष वाटत आहे. या तुझ्या सेवाभावानेच माझ्या ठिकाणी तुझे व्यवधान तू लावून ठेवले आहेस आणि त्यामुळेच तुझ्या पुढील जीवनाविषयीचे विचारही आताशा

माझ्या मनात सातत्याने येऊ लागले आहेत. तू तुझे व्यक्तिगत जीवन पूर्णपणे विसरला आहेस हे मला ठाऊक आहे. पण त्याचमुळे मला मात्र तुझे पुढील सर्व जीवन दिसत आहे, जे प्रत्येकाप्रमाणे जगायचे आहे तुझे तुलाच. पण ते जीवन जगण्यासाठीचे कारण जर लक्षात आले तरच जीवन आनंददायी होते. मुळात जीवन जगून आनंद मिळवायचा नसून आनंदाने जीवन जगायचे आहे, हे महत्वाचे सूत्र लक्षात ठेव. त्यासाठी आधी तो आनंद प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. खरा आनंद हा ईश्वराच्या प्राप्तीनेच होत असतो, हेच मुलभूत सत्य आहे आणि तो ईश्वर तर प्रत्येकाच्याच हृदयात आत्म्याच्या रूपाने वास्तव्य करून असतो. त्या ईश्वराचा आपल्या हृदयात अनुभव घेणे हीच ईश्वराची प्राप्ती आणि त्या ईश्वराच्या भक्तीतच नित्य आनंदाचा अनुभव आहे.

हे सुदाम्या, त्या ईश्वरासंबंधीचे ज्ञान आतापर्यंत तू माझ्या सहवासात, माझ्या मुखातून प्रगट होताना बरेच वेळा श्रवण केलेले आहेस. त्यातील किती तुला शब्दाने कळले आणि शब्दातीत ज्ञान तू किती जाणलेस हे मला माहित नाही. परंतु त्या ज्ञानाचा अनुभव तुला तुझ्या हृदयातच घ्यायचा आहे. कारण तो अनुभव तेथेच घेता येणे शक्य आहे आणि त्यासाठी आधी तसा ध्यास चित्ताच्या ठायी निर्माण होणे आवश्यक आहे. चित्ताच्या ठायी सुद्धा ध्यास तेव्हाच लागू शकतो, जेव्हा मन फक्त ईश्वरी प्रेमाने पूर्णपणे भरलेले राहते आणि बुद्धीच्या ठायी केवळ ईश्वरी अस्तित्वाचाच निश्चय होऊन राहतो. पण या दोन्ही गोष्टी वाटतात तेवढ्या निश्चितच सोप्या नाहीत. एकतर ईश्वर हा तत्वतः निर्गुण निराकार आहे. त्यामुळे त्याच्या प्रेमाचा अनुभव घेणे व त्यातून त्याच्याविषयी प्रेम निर्माण होणे हे तेव्हाच शक्य होते, जेव्हा तो ईश्वर सगुण रूपाने साकार होऊन प्रगट होतो. दुसरे म्हणजे केवळ ‘ईश्वराचे अस्तित्व सत्य आहे’ एवढाच निश्चय होणे पुरेसे नाही, तर या ‘संसाराचे अस्तित्व हे मिथ्याच आहे’ असाही निश्चय होणे अत्यंत आवश्यक असते. कारण नाहीतर या संसाराविषयी पुन्हा पुन्हा मोह व आसक्ती निर्माण होत राहील. त्यामुळे ईश्वराविषयीच्या प्रेमाचा मनाला विसर पडेल आणि ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचा बुद्धीचा निश्चयही ढळला जाईल.

हे सुदाम्या, यापुढील आयुष्यात तुला गृहस्थाश्रमात प्रवेश करायचा आहे. विवाह करून मुलाबाळांसह संसार थाटायचा आहे. तुझ्या प्रकृती स्वभावानुसार हे सर्व करणे तुझ्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. परंतु संसार हे साध्य न ठेवता साधन म्हणून करशील, तरच या संसारात राहूनही ईश्वराची भक्ती करणे तुला शक्य होईल. ईश्वराच्या भक्तीतच तुला आनंदाचा अनुभव येईल आणि ईश्वराच्या प्राप्तीचा भक्तीमार्ग तुला सापडेल. त्यासाठीच ही भक्तीची वाट आधी निश्चित कर आणि मगच संसाराचा थाट मांड. म्हणजे मग संसार हा तुझ्या भक्तीमार्गाच्या आड न येता, तो जोडच ठरेल. भक्तीमार्गामुळेच संसाराला शोभा येईल आणि संसारामुळेच भक्तीमार्गाचे सौंदर्य खुलून व उठून दिसेल. या संसाररूपी तळयातील जल जर भक्तीच्या मळयासाठी उपयोगात आणशील, तरच तो भक्तीचा मळा एक दिवस नक्कीच फुलाफळांनी बहरून येईल आणि त्यातील सुगंध व सुरस यांचा आस्वाद तू जीवनात नित्यच अनुभवत राहशील.

हे सुदाम्या, संसारात राहून ईश्वराची भक्ती घडणे ही साधी व सोपी गोष्ट नसली, तरी ती शक्य मात्र निश्चितच आहे. परंतु त्यासाठी या संसाराच्या बंधनात न अडकणे मात्र अत्यंत आवश्यक आहे. या संसाराचे बंधन खरे तर या मनालाच आहे आणि तेही मानवी मनाने स्वतःच्या कल्पनेनेच मानलेले आहे. संसारामध्ये कर्तव्यकर्मे ही करावयास लागतातच, ती तर क्रमप्राप्तच आहेत. परंतु ‘प्रत्येकाचे जीवन हे ईश्वरी सत्तेत ज्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार घडत असते’ याचेच विस्मरण जेव्हा होते, तेव्हा कर्तव्यकर्माची सीमारेषा ओलांडून मन मोहाच्या क्षेत्रात प्रवेश करते. या मोहामुळेच मन संसाराच्या बंधनात पडते आणि सुखाच्या कल्पना करून, अनुभव मात्र अनन्वित दुःखाचा घेते. या कर्तव्यकर्माची पूर्तता तर कधी होत नाहीच, उलट त्याचा घोळ मात्र नित्य वाढत राहतो आणि जीवाची सतत तळमळ होत राहते. परंतु त्यातून सुटण्याचा मार्गच न मिळाल्यामुळे

सर्वसामान्य जीव अगतिक होऊन या संसाराच्या बंधनातच कायमचे अडकून राहतात.

हे सुदाम्या, कित्येक जणांना तर या संसाराच्या बंधनाची जाणीवसुदधा होत नाही, एवढे ते मूढ असतात. संसार करणे हेच जीवन आहे अशा भ्रामक समजुतीने, जीवनभर संसारातील सुखदुःखाच्या झोक्यावर हेलकावे घेत बसतात आणि एक दिवस मृत्यूमुखी पडून काळाच्या प्रवाहात नष्टही होऊन जातात. त्यांचे जीवन व जनावरांचे जीवन यात काहीच फरक रहात नाही. पण काहीजणांना स्वतःच्या वेगळया अस्तित्वाची जाण येते आणि ते अस्तित्व निश्चित काय व कशासाठी आहे हे जाणून घेण्याची इच्छा निर्माण होते. तेव्हाच या संसाराचे मनाला असलेले बंधन त्यांना जाणवते, एवढेच नव्हे, तर या बंधनातून सुटण्याची तीव्र इच्छाही त्यांच्या ठिकाणी भाग्यानेच निर्माण होते. अशाच वेळी जर स्वधर्माची ओळख झाली आणि स्वधर्माचरणाचे महत्व लक्षात आले, तर मात्र स्वतःच्या उन्नतीचा मार्ग सापडतो. त्या मार्गाने पुढे जाऊन स्वतःची प्रगती साधण्याचा निश्चय होणे मात्र अत्यंत आवश्यक असते. कारण त्यामुळेच कर्तव्यकर्माच्या मोहातून सुटण्याचे बळ येते आणि स्वधर्मप्राप्तीचा ध्यास लागतो. आता मानव जन्मातील स्वधर्म कोणता आहे? तर स्वतःच्या आत्मस्वरूपाचा अनुभव घेऊन त्या आत्मधर्मानेच राहणे, हाच तो स्वधर्म! या स्वधर्माची ओळख व ज्ञान सद्गुरूंकडूनच होते. परंतु त्याचा निश्चय करून त्याच्या अनुभवाचा ध्यास मात्र ज्याचा त्यालाच धरावा लागतो.

हे सुदाम्या, शब्दाने ज्ञान झाले व बाह्यांगाने साधन दीर्घकाळ करीत राहिले, म्हणजे आत्मप्राप्तीच्या दिशेने वाटचाल घडते असे नाही. ती अवस्था तर शब्दज्ञानरूपी वाळूमध्ये बाह्यसाधनरूपी नांगर टाकून राहिलेल्या एखाद्या जहाजाच्या स्थितीसारखीच आहे. त्याठिकाणी बाह्यकृतींची वल्ही चालवण्याचा कितीही जरी देखावा केला, तरी अनेक प्रयत्न करूनही ते जहाज किनारा सोडून अनुभवाच्या दिशेने एक तसूभरही सरकूच शकत नाही. कारण

त्या कृतींच्या मुळाशी, मुळात प्रेमजलाचाच पूर्णपणे अभाव असतो आणि तेथे वैराग्याचे अस्तित्वसुद्धा अंशमात्रही नसते. तेव्हा केवळ शब्दज्ञानाने किंवा केवळ बाह्यसाधने करून आत्मप्राप्तीचा अनुभव येत नाही, तर त्यासाठी भक्तिभावाचीच नितांत आवश्यकता असते, हे अत्यंत खरे आहे. या भक्तिभावाची निर्मितीही केवळ प्रेमातूनच होते हेही निर्विवादच आहे.

हे सुदाम्या, या दृष्टीने तू अत्यंत भाग्यवान आहेस हे लक्षात ठेव. कारण असे ईश्वरी प्रेम तुला कृष्णाच्या रूपाने प्रत्यक्ष अनुभवावयास मिळालेले आहे. पण तुला ते प्रेम एवढया सहज व सुलभतेने मिळाले, की तुला त्याचे खरे माहात्म्य त्या वेळेस जाणवलेही नसेल. कारण कृष्णाच्या मोकळेपणाच्या सहज स्वभावानुसार तुला त्याचे प्रेम मिळत होते. त्यामध्ये तुझे काहीही प्रयत्न नव्हते, तर ते कृष्णाचेच विशेषत्व होते. त्यानंतर बलरामाकडून तुला कृष्णाचे गोकुळातील विशेष जीवन ऐकावयास मिळाले. पण त्यातील कृष्णाचे असामान्यत्व तुझ्या लक्षात आले का? आश्रमातून निघून जाताना कृष्णाने तुला माझे माहात्म्य सांगितले आणि त्यानुसार कृष्णाच्या वचनावर श्रद्धा ठेवून तू माझ्या चरणी सेवाभावाने आलास. पण तुझ्या मनात प्रेम मात्र कृष्णाविषयीच राहिले आणि त्याचेच मला कौतुक वाटते. म्हणूनच तुझे कृष्णप्रेम ओळखूनच, मी तुला माझ्या सहवासाची व सेवेची संधी दिली आणि तूही अत्यंत प्रामाणिकपणे त्या संधीचा उपयोग केलास. तुझ्या या सेवेने संतुष्ट होऊनच मी तुला तुझ्या जीवनकल्याणाचा व आत्महिताचा मार्ग दाखवीत आहे. माझ्या सहवासात राहून तुझ्याकडून कर्ममार्गाचे आचरण योग्य प्रकारे घडत राहिले आणि ज्ञानमार्गाचे संस्कारही तुझ्यावर शब्दांच्या रूपाने होत राहिले. परंतु कृष्णाचे प्रेमच तुला या संसाराच्या सागरातून तारून नेऊ शकेल आणि कृष्णाच्या भक्तिनेच तुला आनंदाचा अनुभव, तुझ्या अंतरात घेता येईल.

हे सुदाम्या, कृष्णप्रेमाचे व कृष्णभक्तीचे माहात्म्य तुझ्या ठायी ठसावे, म्हणूनच तुला मी कृष्णचरित्राचे रहस्य प्रगट करून सांगत आहे. हा कृष्ण





सामान्य तर नाहीच, पण नुसता असामान्यच नाही, तर तो साक्षात परमेश्वराचा, म्हणजे या सर्व विश्वाच्या मुळाशी असलेल्या आदिनारायणाचाच अवतार आहे. त्यामुळेच कृष्णाचे जीवनही अवतारचरित्रच आहे. आता अवतारचरित्र म्हणजे तरी काय हेच गुज मला तुझ्यासाठी उलगडून दाखवायचे आहे, त्याचे नीट लक्षपूर्वक श्रवण कर.

अवतार म्हणजे परमेश्वराचे मानवदेहाने प्रगटणे असले, तरी ते तेवढयापुरतेच मर्यादित नाही. कारण तसे पहायला गेले, तर सर्व मानवांच्या रूपाने एकीएक तो परमेश्वरच प्रगट झालेला आहे आणि सर्वच मानवांच्या ठायी आत्म्याच्या रूपाने अंशमात्र म्हणून राहिलेला आहे. त्या आत्म्यालाच ‘ईश्वर’ असेही संबोधले जाते. परंतु सर्वच मानवांना त्यांच्याठायीच्या ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीवच काय, पण माहितीही नसते. अवतार म्हणजे 'मानवी देहात ईश्वरी अनुभव घेणे' असे म्हटले तर या सृष्टीत असे अनेक ऋषी व महात्मे होऊन गेले, ज्यांनी त्यांच्याठायीच्या ईश्वराच्या अस्तित्वाचा अनुभव घेतला आणि त्याच्याशी ऐक्य पावून राहिले. परंतु त्यांचा अनुभव हा त्यांच्यापुरताच सीमित राहिला आणि सामान्य जन त्यांच्या जवळ जाऊन न पोहोचल्यामुळे, सामान्यांना त्या अनुभवाचा प्रत्यक्ष उपयोग होऊ शकला नाही. सामान्यांच्या ठिकाणी अशा महात्म्यांविषयी अतिशय आदर जरूर राहिला, परंतु त्यांच्या अंतःकरणातील प्रेमस्वरूपाच्या प्रेमाचा लाभ सामान्यांना मिळू शकला नाही. अशा महात्म्यांची दिव्य जीवन चरित्रे अत्यंत वंदनीय व पूजनीयही असतात. परंतु तरीही त्यांना अवतारचरित्रे म्हणता येत नाही, हे मात्र सत्य आहे.

हे सुदाम्या, अवतारांचे वेगळेपण व वैशिष्टय हे त्यांच्या एका विशिष्ट हेतूने व कारणाने प्रगट होण्यात आणि आपल्या जीवन चरित्रामधून तो हेतू साध्य करण्यामध्ये आहे. आता हा हेतू व कारण व्यापक परमेश्वराच्या ठिकाणी कसे काय संभवते व कसे काय निर्माण होते असे म्हणशील, तर त्या

व्यापक परमेश्वराच्या ठिकाणी म्हणजेच ज्याला 'नारायण' म्हणून संबोधले जाते त्या नारायणाच्या ठिकाणी, अकस्मात व अकारण अशी उर्मी निर्माण होते. त्यालाच त्या नारायणाची लीला असे म्हटले जाते. त्या लीलेमध्ये सहजता असते व मुख्य म्हणजे त्यात व त्यामुळे आनंद असतो. या सृष्टीच्या इतिहासात जेव्हा जेव्हा असुर व दैत्य मातले व माजले, त्या त्या वेळी परमेश्वराचे अवतार या सृष्टीत सहजपणे प्रगट झाले आणि त्या राक्षसी वृत्तीच्या दैत्यांचा वध करून पुन्हा परमेश्वराच्या व्यापक स्वरूपात तेवढयाच सहजतेने लगेच विलीनही झाले. परंतु त्रेतायुगात मात्र, रामरूपाने अवतरलेल्या त्या नारायणाकडून विशेष चरित्र प्रगट झाले. रावण, कुंभकर्ण अशा अनेक राक्षसांचा वध तर श्रीरामाकडून झालाच, पण त्याहीपेक्षा विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे आत्मधर्माची जागृती व अनुभव आणून देणाऱ्या सद्गुरू-सत्शिष्य परंपरेचा होऊ पाहणारा लोप श्रीरामाने थोपवून धरला. स्वतः सद्गुरूंना शरण जाऊन त्यांच्याकडून आत्मज्ञान प्राप्त करून घेतले आणि स्वतःच्याच ठायी त्या आत्मधर्माची जाणीव अनुभवली. त्या आत्मधर्माच्या बळावर सर्वच जीवन पराक्रमाने जगून आत्मानंदात रमण्याचा अनुभव घेतला.

हे सुदाम्या, सध्या द्वापार युगात तोच नारायण कृष्णाच्या रूपाने अवतरलेला आहे. गोकुळात असताना अगदी लहानपणीच त्याच्याकडून गोकुळाच्या रक्षणासाठी अनेक राक्षसांचा वध घडला. त्यानंतर तर, ज्या कंसाने कृष्णाला ठार मारण्यासाठी म्हणून ते सर्व राक्षस पाठवले होते, त्या कंसाचाच वध कृष्णाने स्वतः मथुरेत येऊन स्वहस्ते केला. परंतु कृष्णाचे चरित्र व जीवनकार्य तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही, हेच या कृष्णावताराचे वैशिष्ट्य आहे. कृष्णाचा जन्म, त्याच्याकडून घडणारे कार्य हे साधेसुधे नसून, कृष्णाच्या रूपाने त्या परमेश्वराचे दिव्य रूपच प्रगट झालेले आहे. सत्य धर्माची स्थापना करणारे कृष्णाचे सर्वच जीवन हे निर्भयतेचे व पराक्रमाचे असून आदर्शवत् आहे. प्रबळ होऊन माजलेल्या अधर्माचे उच्चाटन करण्यासाठी

आणि लुप्तप्राय झालेल्या स्वधर्माला आधार व रक्षण देण्यासाठी, कृष्णरूपाने मानुष वेषात साक्षात परमेश्वरच अवतरलेला आहे.

हे सुदाम्या, हा कृष्ण म्हणजे आत्मशक्तीचा जणू सागरच आहे आणि षड्गुण ऐश्वर्यासह प्रगटलेले परमेश्वराचे अत्यंत सुंदर व मनोहारी असे सगुण रूप आहे. आपले सर्व वैभव हा स्वतः तर भोगतोच, पण आपल्या सर्व प्रेमीजनांना अत्यंत उदारपणे त्या वैभवात सामील करून घेतो. या कृष्णासारखा उदार व परोपकारी असा सर्व विश्वात एकीएक तोच आहे. सज्जन, पण दुर्बल असलेले लोक व अबला अशा स्त्रियांचा कृष्ण हा नेहमीच कैवारी आहे. दीन व अनाथांचा नाथ होणारा हा कृष्ण सर्वांवरतीच सदैव प्रेमाचा जणू वर्षावच करीत असतो. एवढेच नव्हे, तर लहान, तरूण व वृद्ध अशा सर्व स्तरातील स्त्रीपुरूषांच्या जीवनात, कृष्ण हा त्यांचा सखा होऊन राहतो. ज्याच्या अंतःकरणात सर्वांविषयीचे प्रेम भरून राहिलेले आहे असा हा कृष्ण, भक्तांच्या संकटात स्वतःहून धावून जातो आणि त्यांना रक्षण देऊन सर्व संकटांतून मुक्त करतो. एवढेच नव्हे, तर त्या भक्तांना प्रवृत्त करून त्यांच्याकडून सद्धर्माचे कार्य करवून घेतो. भक्तप्रेमाने भक्तांच्या कल्याणासाठी हा कृष्ण स्वतःचा देह नित्य झिजवत असतो. अशा या कृष्णाच्या प्रेमाने व केवळ नामाने सुद्धा, मनात प्रेमाच्या लहरींवरती लहरी निर्माण होतात आणि देहभान हरवले जाऊन मन कृष्णाठायी पूर्णपणे तल्लीन होऊन राहते.

हे सुदाम्या, या कृष्णाचे एवढे माहात्म्य असूनही तो माझ्या चरणी शरण आला आणि सद्गुरूभक्तीचा सत्य भक्तीमार्ग, स्वतःच्या आचरणाने त्याने सर्व जगासमोरच प्रगट करून दाखवला. त्यामुळे गुरूशिष्य परंपरेने प्रगटणाऱ्या आत्मधर्माला पुन्हा चालना मिळाली. म्हणूनच कृष्णाचा अवतार हा विशेष ठरला आहे. त्याच्या जीवनचरित्रामुळे, कृष्ण हा या सृष्टीच्या इतिहासात 'पूर्णावतार' म्हणूनच प्रसिद्ध होऊन रहाणार आहे. कृष्णाचे हे माहात्म्य जाणून जर तू त्याचे रात्रंदिवस प्रेमाने स्मरण करत राहशील, तरच

संसारात राहूनही तुझे मन संसाराच्या मोहामध्ये गुंतून अडकणार नाही. कृष्णप्रेमामुळे तुझ्या मनाच्या ठायी वैराग्य सहजपणे येईल. कृष्णप्रेमामध्ये आसक्त झालेल्या तुझ्याठायी या संसाराची अनासक्ती अगदी सहजपणे राहील आणि तुझ्या ठिकाणच्या संसारभावाचे निःशेष निर्मूलन होऊन त्याचा लवलेशही शिल्लक राहणार नाही. प्रेमाने मनात भरलेली कृष्णाची प्रतिमाच तुला सदैव प्रेमभावाने युक्त करून ठेवील आणि तुझ्या चित्तात कृष्णाचाच ध्यास लागून त्याच्याविषयीचा भक्तिभाव निर्माण होईल. या कृष्णावरील भक्तिभावामुळेच तुझ्या चित्ताची पूर्ण शुद्धी होऊन ते पूर्ण निर्मळ व प्रेमळ होईल आणि एक दिवस प्रत्यक्ष कृष्णाचीच मूर्ती तुझ्या हृदयात साकार होऊन स्थापित झालेली आहे, असा आनंददायी अनुभव तुझा होऊन राहील. तेव्हाच माझ्याकडून प्राप्त झालेल्या शब्दज्ञानाची परिणती तुझ्या स्वानुभवाची होईल आणि तुला आत्मप्रचिती येईल. या दिव्य स्वानंदाच्या अनुभवाने तुझे सर्व अंतर्बाह्य जीवनच कृष्णाच्या प्रेमभक्तीने व आनंदाने भरून वाहत राहील.”

सांदिपनींच्या प्रेमस्वरूप अंतःकरणातून कृष्णाविषयीचे प्रेममाहात्म्य असे कितीतरी वेळ भरभरून वाहत होते आणि त्याच्या वर्षावात सुदामा अगदी चिंब भिजून नहात होता. भारलेल्या अवस्थेतील सुदामा कितीतरी काळ तसाच स्वस्थ बसून राहिला होता. पण नंतर तो स्वतःहूनच देहभानावर आला आणि त्याने अत्यंत कृतज्ञतेने सांदिपनींच्या चरणांवर आपले मस्तक ठेवले. सांदिपनींनीही अत्यंत प्रेमाने सुदाम्याच्या मस्तकावरून आपला हात फिरवला आणि त्याच्या पाठीवर थोपटले. सांदिपनींच्या त्या प्रेमळ व आश्वासक स्पर्शाने सुदाम्याने स्वतःला सावरले आणि त्याच्या मनाने उभारी घेतली. सुदामा उठून उभा राहिला आणि हात जोडून सांदिपनींच्या नेत्रांमध्ये पहात राहिला. सांदिपनींच्या नजरेतील संकेत सुदाम्याने ओळखला आणि काहीही न बोलता तो सावकाश पावलाने सांदिपनींच्या पर्णकुटीच्या बाहेर आला.

काही काळ गेला असेल नसेल तोच पुन्हा सुदाम्याचे आगमन सांदिपनींच्याकडे झाले. त्याने आपले मोजकेच असलेले सामान बांधून आपल्या बरोबर आणले होते. त्याहीपेक्षा सुदाम्याने आपल्याबरोबर पानातून अनेक रंगीबेरंगी व सुवासिक फुले आणली होती. आपले सामान बाहेरच ठेवून

सुदामा आतमध्ये गेला आणि हातातील सर्व फुले त्याने सांदिपनींच्या चरणांवर वाहिली. सुदाम्याने पुन्हा मनोभावे सांदिपनींना साष्टांग नमस्कार केला आणि त्यांचे दर्शन घेतले. सुदाम्याच्या भावाने प्रसन्न झालेल्या सांदिपनींनी सुहास्य मुद्रेने आपले दोन्ही हात उंचावून सुदाम्याला आशीर्वाद देऊन त्याला शुभचिंतन केले. भारावलेल्या जड पावलांनी तेथून सुदामा निघाला आणि सांदिपनींच्या पत्नीच्या भेटीस गेला. सुदाम्याने गुरूपत्नीस वाकून नमस्कार केला आणि तिचा निरोप मागितला. सांदिपनींची पत्नी तर आधी चकितच झाली आणि भांबावलीच. त्यामागील सांदिपनींची इच्छा तिने लागलीच ओळखली. पण सुदाम्याला निरोप देताना मात्र तिचे डोळे पाणावले आणि तिने वात्सल्यभावाने सुदाम्याला आपल्या कुशीत घेतले. तेव्हा मात्र एवढा वेळ सुदाम्याने आवरून धरलेल्या त्याच्या भावनांचा बांध फुटला आणि तो हमसून हमसून रडू लागला.

थोड्या वेळाने भावनेचा आवेग ओसरल्यावर सुदामा गुरूपत्नीपासून दूर झाला. त्याने पुन्हा सांदिपनींच्या पत्नीला दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि तो जाण्यासाठी वळला. तोच सांदिपनींच्या पत्नीने सुदाम्याला हाताच्या खूणेनेच थांबण्याची सूचना केली. आतमध्ये जाऊन ती लागलीच पुन्हा बाहेर आली आणि तिने सुदाम्याच्या उजव्या हातावर थोडेसे दही ठेवले. सुदाम्याचे डोळे पुन्हा एकदा अश्रूंनी डबडबले आणि त्याने त्या अवस्थेतच त्या दह्याचे सेवन केले. सांदिपनींच्या पत्नीने सुदाम्याला प्रवासात बरोबर नेण्यासाठी म्हणून शिदोरी दिली. सुदामा अधिकच भारावला आणि ती शिदोरी हातात घेऊन अत्यंत जड अंतःकरणाने, जड पावले टाकीत तेथून त्वरित निघाला. बाहेर आल्यावर सुदाम्याने आश्रमातील सर्व सहाध्यायांचा प्रेमाने व हसतमुखाने निरोप घेतला. सर्वांच्या प्रेमभावनेचा व शुभेच्छांचा सुदाम्याने नम्रतापूर्वक स्वीकार केला आणि आश्रमाच्या परिसरातून बाहेर पडून स्वतःच्या नगरीच्या दिशेने वाटचाल करू लागला.”

बोलता बोलता नारदाच्या बोलण्याचा वेग थोडासा मंदावल्यासारखा झाला आणि त्याचे शब्दोच्चारही हळुवार होत राहिले. पण भावपूर्ण होऊन राहिलेल्या लक्ष्मीला मात्र काही न बोलता स्वस्थ बसणे अशक्य होऊ लागले. तिच्या मनाचाही अत्यंत नाईलाजच झाला आणि तिच्या मुखातून शब्दांचा

प्रवाह बाहेर येऊ लागला. लक्ष्मी अगदी उत्स्फूर्तपणे नारदाला उद्देशून बोलू लागली,

"अरे नारदा, तुझी तर अगदी कमालच आहे. सगुण भक्तिमार्गातील एकेक गुज जे तू अलगदपणे प्रगट करीत आहेस ना, त्याला तर तोडच नाही. या भक्तिभावाचे एकेक नवनवीन पैलू जे तू दाखवीत आहेस, ते पाहून मन तर मंत्रमुग्ध होतेच, पण ते जाणून बुद्धी मात्र दिङ्मूढच होऊन राहते. खरोखरीच हा भक्तिभाव बुद्धीच्या तर्काच्याही पलीकडेच आहे, हे तर सत्यच आहे. पण त्या भक्तिभावाचे मूळ असलेले ईश्वरी प्रेम मात्र खरेच मनोहारी व चित्ताकर्षक आहे हेही खरेच आहे. भक्तिभाव म्हणजे तर त्या ईश्वरी प्रेमाचेच रूपांतर आहे. म्हणूनच तो भावही अत्यंत हळुवार, मधुर व सबळ आहे आणि त्याठायीच असलेला अनुभवही अत्यंत आनंददायी असाच आहे.

हे नारदा, सुदाम्याच्या मनातील झालेली स्थित्यंतरे म्हणजे तर एक चमत्कार आहेच. परंतु त्याहीपेक्षा त्याच्या भावाची झालेली जडणघडण ही अत्यंत कौतुकास्पद अशीच आहे आणि त्यासाठी आधी कृष्ण व मग सांदिपनी यांची भूमिका हीच मला खरी अभ्यसनीय वाटते. आधी कृष्णाने सुदाम्याशी प्रेमाने जवळीकता साधली आणि त्याला सांदिपनींचे सद्गुरूमाहात्म्य सांगून सांदिपनींच्या जवळ जावयास सांगितले. सुदाम्याने श्रद्धाभावाने व सेवाभावाने सांदिपनींशी जवळीकता साधली, तर सांदिपनींनी सुदाम्याला सत्यज्ञान सांगून त्याचा अनुभव घेण्यासाठी मात्र, त्याला भक्तिभावाने कृष्णाच्या जवळ जावयास सांगितले; हे सर्वच खरोखरी अत्यंत अद्भुत असेच आहे. ईश्वरी अनुभवाचे महत्वाचे असलेले लक्षण म्हणजे, त्याची जाणीव व निरहंकारीत्व, हेच सांदिपनी व कृष्ण यांच्या रूपाने साकार झाले असल्याचीच ही खात्री आहे. कृष्णाने सांदिपनींच्या रूपाने सद्गुरू शरणागतीचे महत्व सांगावे, तर सांदिपनींनी आत्मज्ञानाचा स्वानुभव होण्यासाठी आवश्यक असलेल्या सगुण प्रेमभक्तिसाठी, कृष्णरूपाने





प्रगटलेल्या परमेश्वराच्या अवताराचे महत्व सांगावे. खरेच, हे सर्वच अलौकिक आहे आणि त्याहीपेक्षा हे नारदा, या सर्वांचे यथार्थ वर्णन तुझ्याकडून स्वानुभवाने घडावे, हाही म्हणावा तर एक चमत्कारच आहे. पण जाणावा तर तो तुझ्या स्वानुभवाचाच आविष्कार आहे हे अगदी नक्की!

• • •

हे नारदा, आता एक महत्त्वाची गोष्ट सांगावयास व ऐकावयास शिल्लक राहिली आहे आणि ती म्हणजे सुदाम्याने प्रत्यक्ष कृष्णाची भक्ती करून सांदिपनींनी दिलेल्या आत्मज्ञानाचा स्वानुभव कसा घेतला? त्याने तसा स्वानुभव घेतला असणार याची मला पक्की खात्री आहे. फक्त ते कसे घडले हे जाणून घेण्याची मात्र अतिशय उत्कंठाच माझ्याठायी आहे आणि तशी ती असणे साहजिकच आहे, नाही का? कारण पुढे कृष्ण व सुदामा यांची बाह्य जीवने तर नक्कीच वेगवेगळी व वेगवेगळया ठिकाणी घडली असणार. मग सुदाम्याठायी कृष्णाच्या भक्तीचा ध्यास कसा काय कायम राहिला आणि सुदाम्याने त्याची पूर्ती तरी कशी काय केली? बरे, कृष्णाने तरी सुदाम्याच्या भक्तिभावाचा स्वीकार कसा केला? आणि मुख्य म्हणजे सुदाम्याच्या या कृष्णभक्तिचे जे फळ म्हणजे आनंदाचा स्वानुभव, तो सुदाम्याने कसा अनुभवला? हे सर्व जाणून घेण्याची मला अतिशय आतुरताच नव्हे, तर आवश्यकताच आहे. कारण त्याचे श्रवणच माझाही भक्तिभाव उत्कट होण्यासाठी केवढेतरी साहाय्यभूत होऊन रहाणार आहे. तेव्हा नारदा, तू आता पुढील कथाभाग मला त्वरीत सांगण्याचे कर बरे!”

लक्ष्मीच्या बोलण्याने संतुष्ट होऊन नारदाने कौतुकाने मान डोलावली आणि आपल्या सहजसुंदर व मधुर वाणीने तो बोलू लागला.

“हे लक्ष्मी, तुझी उत्कंठता व आतुरता अगदी साहजिक व योग्यच आहे. कारण सर्व ज्ञान शब्दाने बोलून, ऐकून व जाणून झाल्यानंतर त्याची परिणती प्रत्यक्ष अनुभवात झाली की नाही, हेच अत्यंत महत्वाचे आहे. आनंदाचा स्वानुभव हेच भक्तिभावाचे फळ आहे आणि त्या स्वानंदातच भक्तिभावाची यशस्विता व सार्थकता आहे हे निश्चितच! त्यामुळेच हे सर्व तपशीलवार जाणून घेण्याची तुझ्या मनाची आवश्यकता ही मला कौतुकास्पद वाटते. कृष्ण व सुदामा यांची जीवनेही बाह्यांगाने वेगवेगळी असणार हे तुझे म्हणणे बरोबरच आहे आणि वस्तुस्थितीही अगदी तशीच होती. तेव्हा यातून सुदाम्याने काय व कसा मार्ग काढला आणि त्याने आपला कृष्णध्यास कायम राखून, शेवटी त्या ध्यासाची पूर्ती कशी साधली हाच तर इतिहास आहे. तो इतिहासच जाणून व समजून घ्यायचा आहे. कारण तोच मनाला अत्यंत सुखविणारा व बुद्धीला बोधप्रदही आहे.

हे लक्ष्मी, कृष्ण व सुदामा यांची प्रत्यक्ष भेट होण्याआधी बराच काळ निघून जावा लागला. सांदिपनींच्या आश्रमातून निघाल्यानंतर सुदामा काही लगेचच व थेट कृष्णाच्या भेटीस गेला नाही. तो आधी आपल्या आईवडिलांच्या घरी गेला. त्यानंतर सांदिपनींच्या मार्गदर्शनानुसार सुदाम्याने यथावकाश विवाह करून गृहस्थाश्रमात प्रवेश केला आणि आपल्या मुलाबाळांसह तो सुखाने संसार करू लागला. सांदिपनींनी दिलेल्या बोधाचे व कृष्णाने दिलेल्या प्रेमाचे स्मरण व जागृती सुदाम्याच्या ठिकाणी अगदी सहजपणे होती. त्यामुळे संसारात अनेक सुखदुःखाचे प्रसंग येऊनही सुदामा त्यामध्ये गुंतला नाही किंवा डगमगलाही नाही. परंतु निर्धन अवस्थेमुळे संसारात मुळातच दुःख व नैराश्याचेच प्रसंग जास्त होते. त्यामुळे बाह्य परिस्थिती ही नेहमीच ताण-तणावाची व संकटात्मकच असे. तरीही सुदामा मात्र शांत मनाने, धीराने व धैर्याने सर्व परिस्थितीला सामोरा जात असे. पण संसाराचा थोडासा व तात्काळ परिणाम मात्र सुदाम्यावर निश्चितच होत असे. परंतु त्या संसाराची मात मात्र सुदाम्यावर कधीही झाली नाही. तरीही सुदाम्याच्या मनात एक प्रकारची उदासीनता मात्र नेहमीच असे.

हे लक्ष्मी, सुदाम्याचे मन संसारात रमणे तर शक्यच नव्हते. परंतु त्याचबरोबर कृष्णप्रेमाची पूर्ती व सांदिपनींच्या बोधाची अनुभूती होत नसल्यामुळे त्याला आनंदाचा अनुभवही येऊ शकत नव्हता. त्यामुळे सुदाम्याच्या अंतर्मनातील अस्वस्थता व असमाधानता कायमच असे. अर्थात् बाह्यांगाने तशी ती कोणाच्या लक्षात येत नसली तरी सुदाम्याला मात्र ती नित्य जाणवत असे. 'कृष्णाची प्रत्यक्ष भेटी हाच त्याच्यावरील एकमेव उपाय आहे' हेही सुदामा जाणून होता. परंतु बाह्य परिस्थितीतून काय व कसा मार्ग काढावा हेच त्याला सुचत नसे. वाढत्या संसाराच्या वाढत्या व्यापामुळे सुदामा बाह्यांगाने अधिकाधिक अडकतच गेला. त्यातून सुटण्याचा काहीच मार्ग दिसत नसल्यामुळे काहीतरी उपाय सापडेल अशी आशा धरून, सुदामा फक्त व्याकुळतेने वाट पहात राहिला. सुदाम्याच्या या प्रतीक्षेचे व तपश्चर्येचे फळ त्याला निश्चितच मिळाले. पण त्यासाठी दीर्घ काळ मात्र जावा लागला.

हे लक्ष्मी, या दीर्घ काळामध्ये कृष्णाचे जीवनही केवढ्यातरी वेगाने, पुढे केवळ जात नव्हते तर धावतच होते. त्यातूनही कृष्णाचे जीवन एवढ्या विविध व व्यापक अंगाने घडत गेले की त्याचा तपशीलवार आढावा घेणे शक्यच नाही आणि खरे तर ते आवश्यकच नाही. कारण एकदा जर आपण तपशीलाच्या बाह्य वर्णनात गुंतलो, तर कृष्णचरित्रातील त्याचे माहात्म्यरूपी हृदय आणि भक्तप्रेमासाठी प्रगटलेली कृष्णाची नानाविध व मनोहारी अंगे झाकोळलीच जातील. पण मग त्याशिवाय कृष्णचरित्रातील सौंदर्य ते काय उरले? कृष्णप्रेम प्रगट झाले तरच कृष्णाच्या हृदयातील सौंदर्यही प्रगट होणार आणि तरच आनंदाचा अनुभव येणार हे अगदी स्पष्ट सत्य आहे. तेव्हा लक्ष्मी, तूही प्रसंगाच्या तपशीलात अडकून न राहण्याचा आधी मनाचा निश्चय कर. माझ्याकडून थोड्या प्रमाणात तरी कृष्ण चरित्रातील तपशील प्रगट हा होणारच. पण तू मात्र सावध रहा आणि जास्त प्रश्न व खुलासा न विचारता, भक्तिभावाने श्रवण करीत रहा आणि माझ्या बोलण्यातील मुख्य सूत्र धरून ठेव. कारण कृष्णचरित्रातील पुढील प्रसंगाचा आता जरी मी

थोडक्यात उल्लेख केला, तरी नंतर प्रत्यक्ष प्रसंगाच्या वर्णनाच्या वेळी तो मी अधिक तपशीलवार सांगणारच आहे.”

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मी थोडीशी चकित झालीच, पण त्याचबरोबर सावधही झाली. तरीही तिने नारदाकडे पाहून मंदस्मित करून आपली मान डोलावली आणि ती श्रवणास सादर झाल्याचा निर्देश तिने नारदास केला. नारदानेही क्षणभर आपला श्वास रोखून दम घेतला. नंतर एक दीर्घ श्वास घेऊन नारदाने गंभीरपणे बोलण्यास सुरुवात केली,

“हे लक्ष्मी, कृष्ण सांदिपनींच्या आश्रमातून निघून बलरामासह मथुरेला परत आला हे मी तुला मागेच सांगितलेले आहे. साहजिकच कृष्णाचे व बलरामाचे मथुरेमध्ये अत्यंत उत्साहाने स्वागत झाले. वसुदेव व देवकी यांच्या आनंदाला तर पारावारच उरला नाही. कृष्ण व बलराम यांच्या भेटीने उग्रसेनालाही प्रेमाचे अत्यंत भरतेच आले. काळाची पुढील पावले ओळखून उग्रसेनानेही वसुदेवाला मथुरेच्या सिंहासनावर बसवले आणि स्वतः वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला. सदैव प्रजाहितदक्ष असलेला वसुदेव नित्य प्रजेचे हित व स्वास्थ्य यालाच अग्रक्रम देऊन राज्याचा कारभार चालवीत असे. कृष्ण व बलराम यांची गुणवत्ता जाणून असलेला वसुदेव, राज्यकारभार करताना त्या उभयतांची मदत आग्रहपूर्वक व आठवणीने घेत असे. विशेषतः कृष्णाच्या अभ्यासपूर्ण सूचना व सल्ला तर वसुदेवाला अगदी प्रमाणच असे. सांदिपनी ऋषींनी राजधर्माविषयी सहजपणे कृष्णाजवळ व्यक्त केलेले ज्ञान कृष्णाच्या ठिकाणी सुद्धा जागृत होते. ‘राजधर्म व त्यातून घडणारे राजकारण हे सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी व सुखस्वास्थ्यासाठी तर हवेच, पण त्याहीपेक्षा तो राजधर्म सर्वांच्या ठिकाणच्या आत्मधर्माच्या जागृतीसाठी आधारभूत व साहाय्यभूत ठरावयास हवा’ हा सांदिपनींच्या ज्ञानातील बोध कृष्णाच्या ठायी पूर्णपणे ठसलेला होता. त्यामुळे ‘सर्व सत्वशील व सदाचारी राजांची एकजूट होणे आवश्यक आहे, तरच अत्याचारी व जुलमी राजांचा पूर्ण निःपात करून त्यातील प्रजाजनांची मुक्तता करता येईल आणि सज्जन





वृत्तीच्या लोकांना रक्षण व आधार मिळेल' याची पूर्ण खात्री कृष्णाच्या ठायी होती. तोच निश्चय कृष्णाचा झालेला होता आणि तसाच ध्यासही कृष्णाच्या ठायी निरंतरच असे. केवळ तो हेतू साध्य होण्याच्या दृष्टीनेच कृष्ण वसुदेवाला राज्यकारभारात केवळ मदतच करी असे नव्हे, तर त्याचा त्यासाठी नेहमीच पुढाकारही असे.

हे लक्ष्मी, सज्जनांना सबळ करण्याच्या हेतूनेच कृष्णाने सत्वशील वृत्तीच्या सर्व राजांची एकजूट करण्याचे ठरवले. त्यासाठी अनेक सात्विक वृत्तीच्या राजांची वसुदेवाच्या संमतीने कृष्णाने स्वतःहून भेट घेतली आणि त्यांच्याशी सुसंवाद साधून मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. सर्वांनी एकत्र येऊन अधर्मी व जुलमी राजसत्तांशी सहकार्याने मुकाबला करणे आवश्यक आहे, याविषयी कृष्णाने सर्वांची खात्री पटवून त्यांची अनुमती मिळवली. सात्विक वृत्तीच्या राजांना व त्याद्वारे सर्वच सज्जनांना कृष्णाच्या रूपाने आधार मिळाला आणि नेतृत्वही लाभले. कृष्णाच्या या राजकारणाने व कुशल राजनीतीने वसुदेवाला अत्यंत संतोष झाला आणि तो कृष्णाच्या पाठीशी खंबीरपणे उभाही राहिला. परंतु त्याचबरोबर अधर्मी राजांच्या रागाचा पारा मात्र वर चढला आणि त्यांच्या ठिकाणी कृष्णाविषयी द्वेष व आकसही निर्माण झाला. त्यांनीही आपली एकजूट केली आणि ते कृष्णाच्या विरोधात उभे राहिले. एवढेच नव्हे, तर त्यांनी कृष्णालाच आपले लक्ष्य बनवून मथुरेवर वारंवार हल्ले करण्यास सुरूवात केली. त्या राजांचे नेतृत्व जरासंध नावाच्या मगध राज्याच्या अधिपतीने स्वीकारले होते.

हे लक्ष्मी, त्या जरासंधाने इतर अधर्मी राजांच्या साहाय्याने मथुरेवर जवळ जवळ अठरा वेळा स्वारी केली आणि कृष्णानेही प्रत्येक वेळी सर्व यादवांच्या मदतीने, जरासंधासह त्याच्या सैन्याचा पराभव करून त्याला पळवून लावले. तरीही जरासंधाची रग काही जिरली नव्हती. उलट त्याच्या ठिकाणचा कृष्णाचा सूड उगवण्याचा विचार अधिकाधिक बळावत गेला. कृष्णाविषयीच्या द्वेषाने व मत्सराने जरासंध अगदी पछाडला गेला होता. पण मथुरेतील सामान्य प्रजेला या लढायांचा होणारा त्रास कृष्णाच्या लक्षात

आला आणि त्याने त्याच्यावरती एक अजबच उपाय शोधून काढला. त्याने सर्व मथुरावासीयांनाच बरोबर घेऊन, दुसऱ्या ठिकाणी दूर नवीन नगरी वसवण्याचा निर्णय घेतला. अर्थातच सर्वप्रथम वसुदेवासह सर्वच यादव चकित झाले आणि साहजिकच त्यांनी कृष्णाच्या त्या योजनेला त्यांचा विरोधही दर्शविला. पण कृष्णाने आपल्या चतुर बोलण्याने सर्वांशी युक्तिवाद केला आणि आपल्या उपाययोजनेला सर्वांची संमती शेवटी मिळवलीच. तरीही त्या योजनेच्या अंमलबजावणीसंबंधी सर्वांच्या मनात शंका ही शिल्लक राहिलेली होतीच. पण कृष्णाने त्याची सर्व जबाबदारी स्वतःवर घेतली आणि मोठया हिकमतीने ती पुरीही करून दाखवली.

सर्वप्रथम त्याने मथुरेपासून अत्यंत दूर अशा समुद्राच्या तीरी कोणालाही कळणार नाही अशी गुप्तता बाळगून, योजनापूर्वक एक नवीन नगरी वसवण्यास सुरूवात केली. त्यासाठी कृष्णाने उत्तमोत्तम कारागिरांचे सहाय्य घेतले. मोठे मोठे रूंद व संगमरवरी रस्ते, त्यांच्या दुतर्फा सुंदर व रमणीय अशा विविध वृक्षांच्या रांगाच्या रांगा, जागोजागी स्वच्छ व निर्मळ जलाशय, रस्त्यांच्या चौकांत शीतल व रंगीत जलांचा फवारा उडवणाऱ्या रंगीबेरंगी पुष्करण्या व फळा-फुलांनी बहरलेल्या सुरेख बागा, आजूबाजूला योग्य अंतर ठेवून उभारलेली अशी ऐसपैस निवासस्थाने, त्याहीपेक्षा सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे यादवांच्या वैभवाचे जणू प्रतीक म्हणून, कृष्णाने ती निवासस्थाने व सर्व मंदिरे बाहेरून सोन्याने मढवली होती. सर्व सुखसोयींनी व ऐश्वर्याने युक्त अशा त्या सुवर्णनगरीचे कृष्णाने ‘द्वारका नगरी’ असे नामाभिधान केले. कृष्णाने अगदी थोडक्या वेळात एवढी मोठी सुसज्ज व सुंदर सुवर्णनगरी उभारून जो पराक्रम केला तो तर साधा नव्हताच, पण त्याहीपेक्षा कृष्णाने सर्व मथुरावासीयांना विश्वासात घेऊन एका रात्रीत सर्व नागरिकांना त्यांच्या कुटुंबियांसह मथुरेहून द्वारकेस हलवले, ही गोष्ट तर नवल करण्याच्याही पलीकडचीच होती. कृष्णाची द्वारकेतील व्यवस्था तर एवढी परिपूर्ण होती, की मथुरेतील जनांना द्वारकेला जाताना आपल्या

बरोबर काहीही सामान नेण्याची आवश्यकताच भासली नाही. अशा तऱ्हेने युद्धाच्या संकटाची सावलीसुद्धा जेथे पडणार नाही, अशा त्या द्वारकेत सर्वजण अत्यंत शांततेने, सुखासमाधानाने व वैभवाने आपले जीवन जगू लागले. सर्वांच्या ठिकाणी कृष्णाविषयी कौतुक व कृतज्ञता मात्र कायमचे ठाण मांडून राहिली.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या या पराक्रमाने वसुदेवही संतुष्ट व निश्चिंत झाला. कृष्ण व त्याच्या जोडीला असलेला बलराम, या आपल्या सुपुत्रांच्या हातात यादवांचे व सर्व द्वारकावासीयांचे हित अगदी सुरक्षित आहे याची खात्री वसुदेवाला झाली. अतिशय समाधानाने व विश्वासाने वसुदेवाने राज्याची सर्व सूत्रे कृष्ण व बलराम यांच्याकडे सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला. ज्येष्ठ पुत्र या नात्याने बलरामाला त्याने विधियुक्त राज्याभिषेक करून द्वारकेच्या सिंहासनावर बसवले आणि वसुदेवाने देवकीसह स्वतः वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला. त्याआधी त्याने बलरामासाठी योग्य व साजेशा वधूची निवड करून त्याचा विवाह करून दिला. पुढे काळाच्या ओघात कृष्णानेही त्यावेळच्या रीतीनुसार अनेक विवाह केले खरे, पण ते केवळ रीतीरिवाज म्हणून वा वैयक्तिक सुखासाठी केलेले विवाह नव्हते. प्रत्येक वेळी बाहय कारणामुळे तसा विवाह कृष्णाने करण्याची आवश्यकता निर्माण होत राहिली. काही वेळेला काही सत्शील राजांशी नातेसंबंध जोडून त्यांची मैत्री व राजकीय पाठिंबा मिळवण्यासाठी म्हणून, तर काही वेळेला कृष्णावर ज्यांचे मन जडले आहे अशा काही राजकन्यांच्या भावाचा स्वीकार करण्यासाठी म्हणून, तर काही वेळेला काही राजांनी आपणहून आपल्या राजकन्या कृष्णाला देण्याची इच्छा व्यक्त केल्यावरती, त्यांच्या इच्छेला मान देण्यासाठी म्हणून कृष्णाने अनेक विवाह केले खरे, पण कृष्ण मात्र त्या कोणाच्यातही गुंतून राहिला नाही. त्याने आपल्या सर्व पत्नींना सर्व सुख, विषयभोग व भरपूर प्रेमही दिले. परंतु कृष्ण स्वतः मात्र सर्वांच्यात राहूनही वेगळा व मोकळाच राहिला.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या एवढया सर्व राण्यांमध्ये एकाच राणीचे मात्र कृष्णाशी अगदी वेगळया स्तरावरचे संबंध होते आणि ती राणी म्हणजे रूक्मिणी होय. तिच्या ठिकाणी कृष्णाविषयी आत्यंतिक प्रेम तर होतेच पण ती कृष्णाचे माहात्म्यही पूर्णपणे जाणून होती. त्यामुळे ती कृष्णाची केवळ पत्नीच नव्हती तर कृष्णाची भक्तही होती. त्यामुळे साहजिकच कृष्णाचेही तिच्याशी विशेष सख्यत्व होते आणि तो तिला आपल्या अंतरात अत्यंत जवळ पाहून तसा अनुभवही घेत असे. या रूक्मिणीच्या भक्तिभावाचे रहस्य व तिच्या कृष्णाबरोबर झालेल्या विवाहाचा इतिहास अत्यंत रोमहर्षक व भावपूर्णही आहे. त्याचे श्रवण करायला तुला अतिशय आवडेलच. परंतु त्या विशेष आनंदाचा अनुभव घेण्यासाठी तुला थोडासा धीर धरावा लागणार आहे. कारण ते वर्णन आताच करणे हे कथेच्या प्रवाहाला वेगळेच वळण लावणारे ठरेल. पुढे वर्णनाच्या ओघात तो विषय येणारच आहे. तेव्हाच त्याचेही समग्र वर्णन माझ्याकडून घडेल.

हे लक्ष्मी, ज्येष्ठ पुत्र या नात्याने जरी बलराम राज्यासनावर बसला होता, तरी सर्व राज्यकारभाराची सूत्रे मात्र कृष्णच हलवीत असे. कृष्णाची कुशाग्र बुद्धी, योग्य निर्णय घेण्याची क्षमता, त्याची लोकाभिमुखता व नेतृत्वाचे गुण हे सर्व बलरामही जाणून होता. म्हणूनच बलरामही नेहमीच कृष्णाच्या सांगण्यानुसार राज्यकारभार करीत असे आणि कृष्णाचाच सल्ला प्रमाण मानीत असे. त्यात त्याला कधीही कमीपणा असा वाटलाच नाही. अर्थात् त्याच्या स्वभावानुसार बलराम काही वेळेला कृष्णाशी वादही घालीत असे. पण शेवटी कृष्णाने योग्य समज करून दिल्यावरती मोठया मनाने कृष्णाला पूर्णपणे सहकार्यही करीत असे. बलराम हा कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जरी जाणत नसला, तरी कृष्णाचे विशेषत्व मात्र तो जाणून होता आणि बलरामाला कृष्णाचे अत्यंत कौतुकही वाटत असे. कृष्ण हा सामान्य नाही तर असामान्यच आहे याविषयी बलरामाला पूर्ण खात्री होती. म्हणूनच तर सांदिपनींच्या आश्रमात असताना बलराम सुदाम्याला कृष्णाचे गोकुळात घडलेले दैदिप्यमान चरित्र अत्यंत कौतुकाने व प्रेमाने सांगत असे. ते ऐकूनच सुदाम्याला कृष्णाचे वेगळेपण व मोठेपण लक्षात आले होते आणि त्यामुळेच

तर कृष्णाकडून सहजपणे मिळणाऱ्या प्रेमाचे महत्त्वही सुदाम्याच्या ठिकाणी ठसले होते. परंतु आपण कृष्णाचे वडील बंधू आहोत, याचे विस्मरण मात्र बलरामाला कधीही होत नसे. त्यामुळे वेळप्रसंगी कृष्णाला चार गोष्टी सुनावण्याचा हक्क बलराम नेहमीच व अगदी सहजपणे घेत असे. त्याचबरोबर वडील बंधू या नात्याने कृष्णाला बाह्य अडचणींच्या प्रसंगी सांभाळून घेणे आणि कृष्णाच्या पाठीशी सर्वार्थाने उभे राहणे हे सुदधा बलरामाकडून तेवढयाच सहजतेने घडत असे.

हे लक्ष्मी, बलरामाचा हा स्वभाव व त्याच्या स्वभावाची मर्यादा कृष्ण ओळखून होता. कृष्णही बलरामाचा योग्य तो मान ठेवून स्वतःची धाकटया बंधूची भूमिका अगदी चोखपणे बजावीत असे. परंतु जेव्हा प्रजेच्या खऱ्या हिताचा प्रश्न उभा राही किंवा धर्म-अधर्माच्या झगडयात धर्माच्या बाजूने प्रत्यक्ष कृतीने साथ देण्याचा प्रसंग निर्माण होई, तेव्हा मात्र कृष्ण खंबीरपणे योग्य भूमिका घेऊन तसा निर्णय घेत असे. मग एखादे वेळेस कृष्णाची ती भूमिका वा निर्णय जरी बलरामाला पटला नाही किंवा मानवला नाही, तरी कृष्ण मात्र स्वतःच्या भूमिकेशी ठाम राही. अशा वेळेस कधी बलरामाची योग्य समजूत घालून किंवा वेळप्रसंगी बलरामाला आधी न कळवता, पण नंतर सांगून किंवा कधी बलरामाला सर्व पूर्णपणे न सांगता किंवा कधीकधी बलरामाला काहीही न सांगताच, पण कृष्ण हा त्याने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी मात्र करीत असे, म्हणजे अगदी असेच. एवढा आत्मविश्वास व स्वतःच्या भूमिकेविषयीचा ठाम निश्चय कृष्णाच्या ठायी होता. कृष्णालाही बलरामाशी असे वागणे परिस्थितीनुसार भागच पडत असे. त्यामध्ये बलरामाला फसवण्याचा हेतू किंवा विचारही कृष्णाच्या मनात अजिबात नसे. परंतु बलरामाच्या स्वभावातील चांगुलपणा काही वेळा एवढया टोकाला जात असे, की ती त्याच्या मनाची दुर्बलता ठरून दोषास्पदच होत असे. धर्म-अधर्माच्या निवाडयात धर्माची बाजू घेऊन ठामपणे अधर्माच्या विरोधात उभे राहून मुकाबला करणे आणि त्यासाठी वेळ प्रसंगी साम, दाम, दंड व भेद या सर्वांचा उपयोग करून घेणे बलरामाला मानवत नसे आणि

त्यामुळे तसे करणे जमतही नसे. अशावेळी मग कृष्णाचाही नाइलाजच होई आणि बलरामाला थोडेसे बाजूला करूनच आपला हेतू त्याला साध्य करावा लागत असे. पुढे तर प्रत्यक्ष घडलेल्या धर्म-अधर्माच्या महाभारत युद्धात 'अधर्मी असले तरी ते आपले नातलग, म्हणून स्वकीय आहेत' अशी भूमिका बलरामाने घेतली आणि असे युद्ध आपल्याला पाहवणार नाही असे म्हणून तो तीर्थयात्रेला निघून गेला. हा कथाभाग पुढे कथेच्या ओघात योग्य वेळी येणारच आहे. असो.

हे लक्ष्मी, एक गोष्ट मात्र निश्चितपणे घडली की कृष्ण व बलराम यांच्यामुळे द्वारकेचा नावलौकिक आणि द्वारकेमुळे यादवांचा दबदबा मात्र नित्य वाढत राहिला. त्यातूनही कृष्णाचा पराक्रम, त्याची राजनीती, त्याचे राज्यकारभारातील कौशल्य, त्याचे व्यवहारचातुर्य आणि मुख्य म्हणजे त्याचे नेतृत्वगुण यांची चर्चा व ख्याती एखाद्या दिव्य सुगंधाप्रमाणे सर्वत्र पसरली. कृष्णाच्या कीर्तीचा परिमळ चोहीकडे दरवळून राहिला. आणखीन एक गंमतीची व योगायोगाची गोष्ट म्हणजे, कृष्णाने नव्याने वसवलेली द्वारका नगरी ही सुदामा जेथे रहात होता त्या नगरीच्या जवळपासच होती. सुदाम्याच्या मनाच्या नित्य जवळ असलेला कृष्ण आता जणू बाह्यांगानेही सुदाम्याच्या अगदी जवळ आला होता. अशावेळी मग कृष्णाची थोरवी सुदाम्याच्या कानापर्यंत पोहोचावयास मुळीच वेळ लागला नाही. मनामध्ये आधीच कृष्णप्रेमाचे नित्य स्मरण असलेला सुदामा सदैव कृष्णाची मानसपूजा करीत असे. बाह्यांगाने नित्य उपासना, पूजाअर्चा करीत असतानाही सुदामा मनामध्ये प्रेमाने कृष्णाची मूर्तीच जपत व पूजत असे. पण तरीही प्रत्यक्ष कृष्णाची भेट होत नसल्यामुळे सुदाम्याचे मन मात्र नेहमी आर्तच असे. सांदिपनी ऋषींनी कृष्णाचे माहात्म्य सुदाम्याला आधी सांगितलेले होतेच. त्यात आता द्वारकेतील कृष्णाच्या चरित्रकथांची व गुणकीर्तीची सारखी भर पडत होती. त्या कारणाने सुदाम्याचे मन कृष्णाच्या प्रेमाने व माहात्म्याने पूर्णपणे भरून राहिले आणि वाहण्यासाठी दाटून आले. त्यामुळे कृष्णाच्या भेटीसाठीची व्याकुळता सुदाम्याच्या ठिकाणी अधिकच वाढत राहिली.





मनात दाटलेला कृष्णप्रेमाचा भाव वाहण्यासाठी वाट शोधू लागला आणि तशी वाट त्या प्रेमाला मिळालीही.

*****



# सुदाम्याचा कृष्णभेटीचा ध्यास

हे लक्ष्मी, सांदिपनींच्या आश्रमात असताना घडलेल्या कृष्णाच्या प्रेमाच्या व मैत्रीच्या कथा सुदामा अधूनमधून आपल्या पत्नीला सांगत असे. किंबहुना, त्या कथा तशा मुद्दामहून सुदाम्याला सांगाव्या लागतच नसत. कोणत्याही कारणाने वा कारण नसतानाही सुदाम्याच्या मुखातून कृष्णाचा उल्लेख वारंवार अगदी सहजपणे घडत असे. त्याची पत्नी मात्र सुदाम्याच्या सांगण्याची जास्त गंभीरपणे दखल घेत नसे. परंतु कृष्ण जेव्हा द्वारकेचा राणा झाला आहे असे तिच्याही ऐकिवात आले, तेव्हा मात्र तिचा दृष्टिकोन हळूहळू व थोडाथोडा बदलू लागला. कारण संसारातील अडचणींनी व मुख्य म्हणजे घरी असलेल्या अठरा विश्व दारिद्रयाने सुदाम्याची पत्नी हैराण झालेली होती. संसाराचा गाडा रेटताना ती अगदी मेटाकुटीला आली होती आणि संसारातील नित्य नव्या कटकटींना तोंड देण्याचा उत्साह तिच्या ठिकाणी अजिबात शिल्लक राहिलेला नव्हता. परंतु काहीच मार्ग सापडत नसल्यामुळे ती असहाय्यपणे जीवन कसेबसे जगत होती. अशावेळी द्वारकाधीश कृष्णाचे ऐश्वर्य व वैभव यांच्या नित्य कानावर येणाऱ्या अनेक गोष्टी सुदाम्याच्या पत्नीच्या अंधःकारलेल्या मनाला आशेचा प्रकाशकिरण दाखवू लागल्या. सर्व अडचणींतून बाहेर पडण्याची वाट अंधुकपणे तिच्या दृष्टीसमोर येऊ लागली. आपल्या मनातील हे विचार सुदाम्याच्या पत्नीने लागलीच सुदाम्यासमोर व्यक्त केले आणि बालमित्र असलेल्या कृष्णाची भेट घेण्याची केवळ सूचनाच नव्हे, तर तसा आग्रहच ती सुदाम्यापाशी धरू लागली.

हे लक्ष्मी, सुदाम्यालाही दारिद्रयाची झळ लागत होतीच आणि संसारातील अडचणीसुद्धा त्याला जाणवतच होत्या. परंतु 'आपले विषम प्रारब्ध आपण भोगूनच संपवले पाहिजे. प्रारब्ध टाळण्याचा केलेला प्रयत्न हा व्यर्थच आहे. कारण कर्म व प्रारब्धाचे भोग हे कधीच चुकवता येत नाहीत' याचा निश्चय सुदाम्याच्या ठायी असल्यामुळे, सर्व परिस्थितीत सुदामा मात्र

मनामध्ये निश्चलच होता. त्याच्या ठायीची शांती व समाधान कायम होते. परंतु कृष्णाच्या प्रेमस्मरणाने व ध्यासाने सुदामाही कृष्णभेटीसाठी आर्त झालेला होताच. कृष्णाची गुणकीर्ती सुदाम्याच्या कानावर नित्य येत होती आणि कृष्णाची प्रेममूर्ती तर त्याच्याठायी आधीच पूर्णपणे ठसलेली होती. या सर्वांची पूर्तता कृष्णाच्या भेटीतच आहे हे सुदामाही जाणूनच होता. त्यामुळे योग्य संधीची वाट पहात असणाऱ्या सुदाम्यासाठी तर सुवर्णसंधीच चालून आली. काहीतरी कारण शोधीत असणाऱ्या सुदाम्याला कृष्णभेटीचे चांगले निमित्तच मिळाल्यासारखे झाले. त्याची बायको ज्या कारणासाठी कृष्णाची भेट घेण्यास सुदाम्याला सांगत होती, ते कारण मात्र सुदाम्याला न मानवणारे व कधीही मान्य न होण्यासारखेच होते. कारण कृष्णाकडून त्याला काहीच मागायचे नव्हते. सांसारिक अडचणींसाठी कृष्णाकडून काही धन अथवा इतर सुखाची साधने मागून घेण्याचा विचारसुद्धा सुदाम्याच्या मनाला शिवणे अजिबात शक्यच नव्हते. परंतु या मनातल्या सर्व गोष्टी मनातच ठेवून सुदाम्याने कृष्णाची भेट घेण्याचा निर्धारच केला.

हे लक्ष्मी, सुदाम्याने कृष्णभेटीचा निर्णय घेतलेला पाहून त्याच्या पत्नीला आनंद झाला आणि तिने सुदाम्याच्या प्रवासाची तयारी करण्यास सुरूवात केली. प्रवासात आवश्यक असलेले कपडे, शिदोरी व इतर गोष्टींचे एक गाठोडे व पिण्याच्या पाण्याचा तांब्या तिने तयार करून सुदाम्याला दिला असता, सुदाम्याने तिला कृष्णासाठी काहीतरी प्रेमाची भेट म्हणून बरोबर देण्यास सांगितले. सुदाम्याच्या पत्नीने घरभर शोधले. पण कृष्णाला देण्यास योग्य अशी गोष्ट तिला काही केल्या सापडेच ना. शेवटी सुदाम्याने स्वतःच घरात शोधले तर त्याला थोडेसे पोहे सापडले. सुदाम्याने तेच पोहे घरात शिल्लक असलेल्या थोडया दहयामध्ये भिजवून एकत्र केले आणि ते एका मडक्यामध्ये बांधून बरोबर देण्याविषयी त्याच्या पत्नीला सांगितले. तिला ते पोहे सर्व वैभवाने युक्त असलेल्या कृष्णाला देण्यासाठी संकोच वाटू लागला. पण सुदाम्याने मात्र काहीही संकोच न करता त्या दहीपोह्यांचे मडके एका फाटक्या वस्त्रामध्ये बांधून आपल्याबरोबर घेतले आणि तो लागलीच द्वारकेच्या प्रवासास निघाला सुद्धा!

हे लक्ष्मी, कृष्णदर्शनाच्या ओढीने सुदाम्याचे मन तर कधीच द्वारकेस पोहोचले होते आणि त्या ओढीचा वेग त्याच्या शरीराने घेतला होता. त्यामुळे सुदाम्याची पावले द्वारकेच्या दिशेने अगदी झपाझप पडत होती. कृष्णाच्या प्रेमाने भरलेल्या मनामुळे सुदाम्याच्या ठायी त्याच्या देहाचे भान जवळजवळ नव्हतेच. प्रवास करताना वाटेत थांबून काही काळ विश्रांती घ्यावी, असा विचारही सुदाम्याच्या मनात येतच नव्हता आणि भूकही विसरल्यामुळे पत्नीने आठवणीने बरोबर दिलेली शिदोरी सेवन करण्याचे त्याला स्मरणही होत नव्हते. सूर्यास्त झाल्यानंतर अंधार पडल्यामुळेच, केवळ नाइलाजास्तवच सुदामा वाटेत एखाद्या धर्मशाळेत थांबत असे. मग थोडीशी न्याहारी करून, तेथेच पथारी पसरून त्यावर विश्रांती घेत असे आणि पहाट होण्याच्या आधीच आपले सर्व आन्हिक उरकून त्वरित पुढील प्रवासाला निघत असे. रात्रभर जागाच रहात असलेल्या सुदाम्याच्या मनात पथारीवर पडल्यापडल्या कृष्णप्रेमाची अगदी दाटीच होत असे.

खरे तर, सुदाम्याचे मन कृष्णप्रेमाने नेहमीच भरलेले असे. परंतु आता कृष्णभेटीस प्रत्यक्ष निघाल्यावरती मात्र, सुदाम्याच्या मनातील कृष्णप्रेमाच्या व कृष्णमाहात्म्याच्या असंख्य स्मृती दाटून आल्या आणि जागृत होऊन खेळू लागल्या. अगदी फेर धरून त्या जणू नाचूच लागल्या आणि सुदाम्याच्या मनाला अधिकच व्याकूळ करू लागल्या. सद्गुरु सांदिपनींच्या आश्रमात भाग्याने घडलेली कृष्णाची भेट, त्याचा घडलेला अंगसंग, त्याचे अनेक प्रकारे प्रत्यक्ष अनुभवलेले प्रेम, सांदिपनींनी बोध देताना त्याचबरोबर सांगितलेले कृष्णाचे माहात्म्य, तेव्हापासून कृष्णाच्या प्रेमाच्या नादातच सदैव रमणारे मन, त्या नादाचे मनात नित्य उठणारे निनाद या सर्वांच्या स्मरणाने सुदाम्याच्या अंतरात दाटून असलेले प्रेमपूर वाहूच लागले. अंतःकरणाच्या अशा भरलेल्या व भारलेल्या अवस्थेतच सुदाम्याचा प्रवास घडला कधी व संपला कधी हे सुदाम्यालाही कळलेच नाही. सूर्याच्या प्रभातकिरणांनी उजळून निघालेल्या सुवर्णनगरी द्वारकेत प्रवेश झाल्यावरती, त्या अत्यंत

शोभिवंत व तेजाने झळाळणाऱ्या नगरीच्या दर्शनानेच सुदामा एकदम देहभानावर आला आणि अतिशय उत्साहित व उत्तेजित झाला.

हे लक्ष्मी, द्वारका नगरीचे ऐश्वर्य व वैभव सुदाम्याच्या डोळयांना निश्चितच सुखवीत होते. त्याचबरोबर या सर्वांमागील योजना व प्रेरणा कृष्णाचीच असणार हे जाणून, सुदाम्याला कृष्णाचे अत्यंत कौतुकही वाटत होते. परंतु त्याचे मन कृष्णाच्या दर्शनासाठी अत्यंत व्याकूळ झालेले असल्यामुळे बाह्यांगाने दुसऱ्या कशातच रमू शकत नव्हते. त्यामुळे इकडे तिकडे कुठेही न फिरता व वाटेतही कुठेच न थांबता, सुदाम्याच्या पावलांनी आता अधिकच वेग घेतला आणि कृष्णाच्या राजवाड्याच्या दिशेने ती झपाझप पडू लागली. ‘कृष्णाचा महाल कुठे आहे?’ असा प्रश्न कोणाला विचारावा, असा विचारही सुदाम्याच्या मनात येऊ शकला नाही. कृष्णप्रेमाने भरून दाटून राहिलेले सुदाम्याचे मन त्याच्या पावलांना कृष्णाच्या राजवाड्याच्या दिशेने जणू वळवीत व प्रेरीतच करत होते. जसे जल जलाकडेच अगदी सहजपणे वाहत असावे किंवा गायीचे वासरू भुकेने अतिशय व्याकूळ होऊन, गायीचा पान्हा सेवन करण्यासाठी अत्यंत ओढीने गायीकडे धावत असावे, अगदी तसाच सुदामा त्याच्या आंतरिक प्रेमप्रेरणेने कृष्णाकडे धावत चालला होता म्हणा किंवा चालत धावत होता म्हणा, पण खरे तर सुदामा त्याच्या मनाने आधीच कृष्णापर्यंत जाऊन पोहोचला होता.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने सुदामा कृष्णाच्या राजवाड्यात प्रवेशद्वारापर्यंत आला मात्र, कृष्ण धावतच पुढे आला. एकच क्षण उभयतांनी एकमेकांकडे पाहिले आणि पुढच्याच क्षणी कृष्णाने सुदाम्याला प्रेमाने दृढालिंगन दिले. सुदामाही तेवढ्याच सहजतेने कृष्णाच्या मिठीत शिरून विसावला. कृष्ण व सुदामा यांच्या नेत्रांतून प्रेमपूरच लोटत होता आणि त्याचे सचैल स्नान त्या उभयतांना घडत होते. रूक्मिणीच्या जवळ बसलेला कृष्ण असा अचानक महालाच्या बाहेर, तिला सोडून धावत गेलेला पाहून रूक्मिणीलाही नवलच वाटले. परंतु कृष्णाचा स्वभाव अनुभवाने पूर्णपणे जाणून असल्यामुळे न

रागावता किंवा जराही नाराज न होता, रूक्मिणीही महालाच्या बाहेर आली. कृष्ण व सुदामा यांचे ते प्रेममीलन पाहून तीही भारावून गेली आणि तिचेही नेत्र पाणावलेच. 'कृष्णाचा कोणीतरी परममित्र असावा' असे रूक्मिणीने लगेचच ओळखले. पण काहीही न बोलता ती स्वस्थ उभी राहिली. थोड्या वेळाने सुदाम्यालाच भान आले आणि त्याला थोडेसे संकोचल्यासारखेच झाले. त्याचाच परिणाम म्हणून सुदामा स्वतःला कृष्णापासून थोडे दूर करण्याचा प्रयत्न करू लागला. सुदाम्याची ही कृती व त्यामागील कारणही कृष्णाच्या लक्षात आले आणि कृष्णाने सुदाम्याचे दोन्ही हात आपल्या हातात घट्ट धरून ठेवले.

रूक्मिणीकडे पाहून कृष्णाने स्मितहास्य केले आणि तिला म्हणाला, "अगं रूक्मिणी, हा माझा केवळ मित्रच नाही तर हा सुदामा माझा गुरूबंधू आहे. सांदिपनींच्या आश्रमात आम्ही उभयतांनी त्यांच्या चरणांशी बसून एकत्रितपणे अध्ययन केले आहे. मी, बलराम व सुदामा एकाच पर्णकुटीत रहात होतो. आम्ही केवळ एकत्रच रहात होतो असे नव्हे, तर आमचे अत्यंत प्रेमाचे व भावनिक संबंध होते. या सुदाम्याकडून मला तर केवढेतरी स्नेहसुख मिळालेले आहे, जे मी कधीही विसरणे शक्यच नाही. तेव्हा अशा या माझ्या जिवलग मित्राच्या स्वागताची जय्यत तयारी ताबडतोब कर बघू."

कृष्णाच्या बोलण्यातील सुदाम्याविषयीचा आपलेपणा व जिव्हाळा रूक्मिणीच्या लगेचच लक्षात आला आणि ती त्वरित महालामध्ये निघून गेली. कृष्णही सुदाम्याचा हात आपल्या हातात प्रेमाने धरून त्याला महालामध्ये घेऊन आला आणि त्याने त्याला एका रत्नजडित सुवर्णाच्या मंचकावरती बसवले. सुदाम्याला आधी जरा अवघडल्यासारखे झालेच, पण जेव्हा कृष्ण स्वतः त्याच्या शेजारी बसला तेव्हा मग सुदाम्यालाही मोकळे मोकळे वाटू लागले आणि स्वागताचा स्वीकार करण्यास तोही हसतमुखाने सज्जच झाला.

हे लक्ष्मी, तेवढयातच रूक्मिणी आतल्या दालनातून बाहेर आली. बरोबर तिने दासींच्या हस्ते पूजेचे व आरतीचे सर्व साहित्य आणले होते. रूक्मिणी, सुदामा व कृष्ण यांच्या समोर खाली बसली. तिने सोन्याचे मोठे तबक सुदाम्याच्या पायाखाली ठेवले आणि सोन्याच्या तांब्यातून आणलेले गरम पाणी ती सुदाम्याच्या पावलांवर ओतणार, तेवढयातच सावध झालेल्या सुदाम्याने रूक्मिणीला हाताच्या खुणेने थांबवले आणि तो म्हणाला,

“अहो रूक्मिणीदेवी, कृपा करून माझा एवढा सन्मान करू नका. कारण त्याला मी खरेच पात्र नाही. कृष्णाने मला ‘गुरूबंधू’ म्हणून संबोधिले यातच माझा केवढा तरी सन्मान झाला आहे. कारण सांदिपनींचा शिष्य म्हणून मी केवळ नात्यानेच कृष्णाचा गुरूबंधू आहे. पण सांदिपनींचा खरा सत्शिष्य मात्र फक्त कृष्णच होता. बाकीचे माझ्यासारखे केवळ नात्याचेच शिष्य होते. परंतु सद्गुरू व सत्शिष्य असे सांदिपनींशी संबंध मात्र केवळ कृष्णाचेच होते. मी तर बाह्यांगानेच सांदिपनींच्या आश्रमात होतो. पण माझे मन मात्र तेथे पूर्णपणे कधी रमतच नव्हते. कारण माझ्या मनातील सांसारिक इच्छा व वासना कायमच होत्या. परंतु या कृष्णाने माझ्यावर जणू जादूच केली. त्याच्या व्यक्तिमत्वाने माझ्या मनाला भुरळच घातली आणि त्याच्या प्रेमाने तर माझे मन अगदी मोहितच झाले.

आश्रमात असताना अनेक प्रसंगी या कृष्णानेच मला सांभाळले. पण कृष्णाने माझ्यावर खरी कृपा केली, ती म्हणजे सांदिपनींची थोरवी कृष्णाने माझ्याठायी ठसवली. त्यांच्या ईश्वरी अनुभवाची जाणीव मला करून दिली आणि त्याहीपेक्षा सद्गुरूशरणागती व सद्गुरूंची सेवा याचे माहात्म्य आणि आवश्यकताही कृष्णानेच माझ्या मनामध्ये बिंबवली. एवढेच नव्हे, तर सांदिपनी ऋषींची प्रत्यक्ष सेवा करण्याचे मनोबळही मला कृष्णामुळेच लाभले ही गोष्ट अगदी खरी आहे. कृष्ण आश्रमातून निघून गेल्यावर माझ्याकडून जी थोडीफार सांदिपनींची प्रत्यक्ष सेवा घडू शकली, त्याचे सर्व श्रेय एकीएक कृष्णाला आणि त्याच्या माझ्यावरील प्रेमालाच आहे हे मात्र निःसंशय!

सांदिपनींच्या सेवेचे फळ मला काय मिळाले, तर त्यांनी मला कृष्णचरित्राचीच थोरवी सांगितली आणि कृष्णप्रेमाची महती प्रगट केली. ‘कृष्णाच्या भक्तीनेच सर्व संसारबंधनातून मुक्त होता येईल आणि आपले आपल्यालाच आनंदाचे स्वामी होता येईल’ हाच ज्ञानबोध तर मला सांदिपनींनीच अत्यंत कृपावंत होऊन दिलेला आहे. तेव्हा मी येथे कृष्णाचा गुरूबंधू या नात्याने आलेलो नसून, कृष्णाचा एक प्रेमी भक्त म्हणूनच माझे येथे येणे झालेले आहे. कृष्ण हाच मला नेहमी वंदनीय व पूजनीय आणि त्याहीपेक्षा भजनीय आहे. तेव्हा मला आधी कृष्णाचीच पूजा करायची आहे. त्यासाठीच तर मी एवढ्या दुरून व माझे घर सोडून येथे द्वारकेस आलेलो आहे. कितीतरी काळापासून ही अपूर्णता व आर्तता माझ्या अंतराच्या ठायी लागून राहिलेली आहे आणि केवळ त्याची पूर्तता करण्याच्या हेतूनेच मी येथे आलेलो आहे. सांदिपनींच्या आश्रमात असताना जेव्हा कृष्णाचा व माझा सहवास होता, तेव्हा मी त्याची महती जाणत नव्हतो आणि जेव्हा मला कृष्णाची खरी महती सांदिपनींच्या कृपेने कळली, तेव्हा कृष्ण माझ्यापासून दूर गेलेला होता. आता कृष्णाच्या भेटीत मला हा सर्व दुरावा दूर करायचा आहे आणि कृष्णाच्या व माझ्यामध्ये असलेल्या आंतरिक विभक्ततेतूनही त्यासाठी परमभाग्याने लाभलेली ही सुवर्णसंधी मी साधली, तरच माझ्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सोने होणार आहे.”

असे बोलत बोलतच सुदामा आपल्या आसनावरून त्वरित उठला आणि अत्यंत नम्रभावाने कृष्णाच्या चरणी बसला. सुदाम्याचा उत्साह पाहून थोडीशी चकित झालेली रूक्मिणी सुदाम्याचा भाव ओळखून मात्र आनंदित झाली आणि स्वतः बाजूला उभी राहून सुदाम्याकडे कुतूहल व कौतुकमिश्रित नजरेने पाहू लागली. रूक्मिणीने खाली ठेवलेला सोन्याचा तांब्या सुदाम्याने आपल्या हातात घेतला आणि सोन्याचे तबक कृष्णाच्या पावलांखाली सरकवले. तांब्यातील गरम पाणी कृष्णाच्या दोन्ही पावलांवर हळूहळू ओतत, सुदामा आपल्या हाताने कृष्णाच्या दोन्ही चरणांचे अगदी हळुवारपणे प्रक्षालन करीत राहिला. त्यानंतर सुदाम्याने आपल्या खांद्यावरील उपरण्याने

कृष्णाचे चरण हलकेच पुसले. रूक्मिणीने आणलेल्या पूजेच्या साहित्यातील चंदनाची उटी सुदाम्याने आधी कृष्णाच्या चरणांवरती व मग त्याच्या भाळावर लावून त्यावर अक्षताही लावल्या. पंचज्योती तेवत असलेल्या तबकातील निरांजनाने कृष्णाच्या मुखाभोवती पंचारती ओवाळून, सुदाम्याने अत्यंत प्रेमभावाने कृष्णाच्या सुंदर व रमणीय मुखकमलाचे अवलोकन केले. आपल्या बरोबर आणलेल्या सामानातून सुदाम्याने तुळसीदलाची माळ काढली आणि कृष्णाच्या कंठात अर्पण केली आणि सुगंधित फुले कृष्णाच्या चरणांवर वाहून, त्या चरणांवर आपले मस्तक ठेवले. नेत्रांतून वाहणाऱ्या प्रेमाश्रूंनी कृष्णाच्या चरणांना स्नान होत असताना सुदाम्याचा प्रेमभाव अनावर झाला आणि तो स्फुंदून स्फुंदून रडू लागला.

सुदाम्याची भावपूर्णता अनुभवून कृष्णालाही गहिवरून आले आणि त्याने सुदाम्याला दोन्ही हातांनी प्रेमभरे उठवून आपल्या मिठीत घेतले. कृष्णाच्या कंठात सुदाम्याने घातलेली तुळशीची माळ, कृष्णाने काढून सुदाम्याच्या गळयात घातली आणि त्याला पुन्हा आपल्या शेजारी बसवून घेतले. सुदाम्याने ती माळ लगेचच आपल्या कंठातून काढली आणि आपल्या नेत्रांना तिचा स्पर्श करून, तशीच आपल्या हृदयाशी धरून ठेवली. सुदाम्याचे दोन्ही हात आपल्या हातात घट्ट धरून ठेवून, कृष्ण सुदाम्याकडे सुस्मित नजरेने एकटक पहात राहिला आणि सुदामाही कृष्णाच्या नजरेतील प्रेम सेवन करण्यात दंग होऊन राहिला.

कृष्ण व सुदामा यांची ही प्रेमपूर्ण अवस्था पाहणारी रूक्मिणीही भावपूर्ण झाली आणि आपले दोन्ही हात जोडून वंदन करीत सुदाम्याला म्हणाली,

“अहो सुदामदेवा, तुम्ही खरोखरीच धन्य आहात. या कृष्णाची महती खऱ्या अर्थाने ओळखणे ही साधी गोष्टच नाही, हे मीही माझ्या स्वानुभवानेच सांगत आहे. या कृष्णाचे प्रेम अनुभवायला मिळणे हे तर अत्यंत भाग्याचेच लक्षण आहे आणि त्यातूनही कृष्णप्रेमाने युक्त होऊन त्याच्या भक्तीचा आनंद

अनुभवणे, ही तर दुर्मिळ व असाधारण अशीच गोष्ट आहे हेही मी जाणून आहे. त्यामुळेच तुमच्या ठिकाणी असलेला कृष्णाविषयीचा हा भक्तिभाव मला केवळ कौतुकास्पदच वाटत नसून तो मला आनंदितही करीत आहे. कारण हा भक्तिभावच कृष्णाला आनंदित करीत असतो. किंबहुना 'जो भाव कृष्णाला आनंदित करतो तोच भक्तिभाव होय आणि या भक्तिभावाने सदा सर्वकाळ जो युक्त असतो, तोच खरा भक्त होय' असेच म्हणावे लागेल. म्हणूनच कृष्णाचा असा खरा भक्त हा सुद्धा निश्चितच सन्मानाला योग्यच असतो आणि कृष्णाप्रमाणेच त्याचा असा निस्सीम भक्तही सर्व लोकांसाठी पूजनीय व वंदनीय असतो. तेव्हा कृष्णाचा गुरूबंधू या नात्याने माझ्या पूजेचा स्वीकार करणे तुम्हाला योग्य वाटत नसेल, तर तुमचे म्हणणे योग्यच आहे. परंतु कृष्णाचा भक्त म्हणून मात्र तुमची पूजा करून तुमचा आदरसत्कार व सन्मान करणे, मला अत्यंत आवश्यक वाटत आहे. त्यासाठीच आता मी कृष्ण व तुम्ही या दोघांचेही पूजन करणार आहे. तरी तुम्ही माझ्या भावाचा स्वीकार करावा अशी विनंती करते."

रूक्मिणीच्या या मधुर व यथार्थ वचनाने कृष्णाच्या मुखावर अत्यंत प्रसन्नतेचे सुहास्य झळकले आणि सुदाम्यालाही हसून संमतीदर्शक मान डोलावणे भाग पडले. कृष्णही सुदाम्याच्या आणखीन जवळ झाला आणि त्याने सुदाम्याचा हात आपल्या हातात दृढ धरून ठेवला. कृष्णाने सुदाम्याकडे पाहून सूचक मंद स्मितहास्य केले असता सुदाम्यानेही मोकळेपणाने हसून कृष्णाला प्रतिसाद दिला. कृष्ण व सुदामा यांच्या मुखावरील हास्य हीच संमती आहे हे जाणून रूक्मिणी पुढे सरसावून बसली. प्रथम तिने कृष्ण व सुदामा यांची यथासांग पाद्यपूजा केली आणि त्याचे तीर्थ स्वतः प्राशन केले. त्यानंतर रूक्मिणीने कृष्ण व सुदामा यांच्या भाळी कुंकुमतिलक व त्यावर अक्षता लावल्या आणि पंचारतीने त्या उभयतांना ओवाळून त्यांचे औक्षण केले. कृष्ण व सुदामा यांच्या कंठात सुवासिक सुमनांची माळ रुक्मिणीने अर्पण केली. त्यानंतर रूक्मिणीने कृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवून अत्यंत भक्तिभावाने त्याचे दर्शन घेतले आणि सुदाम्याला वाकून नमस्कार केला. रूक्मिणीच्या पूजनाने संतुष्ट झालेल्या कृष्णाने रूक्मिणीला प्रेमाने आपल्या

जवळ घेतले आणि कौतुकाने तिची पाठ थोपटली. परंतु रूक्मिणीचा हा भक्तिभाव पाहून सुदामाच अत्यंत भावपूर्ण झाला आणि त्यानेही कृष्णाच्या चरणांवर शिरसाष्टांग नमस्कार घातला. नंतर सुदाम्याने रूक्मिणीलाही वाकून नम्रभावाने वंदन केले आणि तिला उद्देशून तो बोलू लागला.

“अहो रूक्मिणीदेवी, तुम्हीच म्हटल्याप्रमाणे तुम्हीही मला वंदनीयच आहात आणि म्हणूनच मीही तुम्हाला नमस्कारच केला, कारण तुम्हीही या कृष्णाच्या भक्त आहात, हे तुमच्या वागण्या- बोलण्यातून स्पष्टपणे प्रगट होत आहे. किंबहुना, तुम्हीच कृष्णाच्या खऱ्या भक्त आहात असेच मी म्हणेन. कारण नात्याने कृष्णाची पत्नी असूनही तुम्ही कृष्णाचे माहात्म्य यथार्थतेने जाणून आहात आणि भक्तिभावाने त्याचा पूर्णपणे अनुभवही घेत आहात, हे तुमच्या प्रसन्न मुखावरून सहजपणे लक्षात येत आहे. तुमच्या ठायी असलेला कृष्णाच्या भक्तीचा आनंद तुमच्या प्रेमळ व मोकळया वागण्या-बोलण्यातून अगदी ओसंडतच आहे आणि हेच कृष्णाच्या खऱ्या भक्ताचे सुलक्षण आहे. पत्नी या नात्याने कृष्णाचा सहवास तुम्हाला सततचाच लाभला आहे आणि कृष्णाची सेवा करण्याची संधीही तुम्हाला नेहमीच आहे. किंबहुना, तुमते सर्व जीवनच कृष्णाच्या जीवनाशी बाह्यांगानेही कायमचे जोडलेले आहे. परंतु तरीही कृष्णाच्या माहात्म्याचे जराही विस्मरण होऊ न देता, तुम्ही त्याच्या भक्तिभावाने युक्त होऊन राहिला आहात ही गोष्ट असाधारणच आहे. कारण कृष्णाच्या अत्यंत जवळीकतेमुळे तुमचा त्याच्या स्वभावाशी, त्याच्या जीवनातील अनेक नातेसंबंधांशी, त्याच्या कारण-अकारण बदलणाऱ्या मनोवृत्तीशी नित्याचाच संबंध येत असणारच. कृष्णाशी वारंवार जुळवूनही तुम्हालाच घ्यावे लागत असणार याची तर मला स्वानुभवाने पक्की खात्री आहे. तरीही कृष्णाच्या माहात्म्याचे जराही विस्मरण न होता, त्याच्या प्रेमाने नित्य युक्त होऊन राहणे हे खरेच कठीण आहे.

अहो, माझ्यासारखे कृष्णाचे भक्त त्याच्या नित्य स्मरणात असले, तरी आम्ही प्रत्यक्ष दूरच रहात असल्यामुळे आमचे बाह्य जीवन हे कृष्णाच्या बाह्य

जीवनापेक्षा परिस्थितीनुसार का होईना, पण अत्यंत वेगळेच असते हे खरेच आहे ना? अशा वेळी सर्व परिस्थितीत तुम्ही कृष्णाचे मन राखता, हे तर तुमच्या कृष्णावरील पराकोटीच्या व्यक्तिगत प्रेमाचे लक्षण आहेच, पण त्याचबरोबर कृष्णाचे माहात्म्यही तुम्ही यथार्थपणे जाणले असल्याचेच ते द्योतक आहे. त्याचप्रमाणे ही गोष्टही खरी आहे, की हे कृष्णाचे माहात्म्य तुम्ही काही केवळ पाहून किंवा बुद्धीने जाणलेले नाही, तर ते माहात्म्य भक्तिभावातून आलेल्या स्वानुभवामुळेच तुमच्या ठायी ठसलेले आहे. म्हणूनच कृष्णाच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग असलेल्या, त्याच्या मनाशी पूर्णपणे समरस झालेल्या आणि त्याच्या अंतःकरणाशी ऐक्य पावलेल्या अशा तुम्ही, मला नित्य वंदनीयच आहात.”

• • • • •

## सुदामा-कृष्ण भेट

सुदाम्याच्या बोलण्यावर रूक्मिणीने किंचित हसून व दोन्ही हात जोडून त्याला नमस्कार केला. कृष्णाने मात्र मोकळेपणाने हसून सुदाम्याच्या पाठीवर प्रेमाची व कौतुकाची शाबासकी दिली आणि मनापासून दाद दिली. सुदाम्याच्या बोलण्याशी तो पूर्णतः सहमत असल्याचा आनंदच कृष्णाने अशा तऱ्हेने व्यक्त केला. कृष्णाच्या या केवळ कृतीतूनच त्याचा रूक्मिणीविषयीचा भावही अगदी सहजपणे व्यक्त झाला होता. जणू प्रत्यक्ष काहीही न बोलताच, कृष्ण रूक्मिणीविषयी केवढेतरी बोलला होता. ते कौतुक फक्त रूक्मिणीलाच कळले आणि त्याचा आनंदही तिनेच अनुभवला. त्या आनंदाच्या भरातच रूक्मिणीने फळफळावळ व स्वादिष्ट पदार्थांनी भरलेली सोन्याची तबके सुदाम्याच्या समोर आणून ठेवली आणि त्यातील पदार्थांचे सेवन करण्याची विनंती सुदाम्याला केली. कृष्णाला मात्र तशी काही सूचना करण्याची आवश्यकताच नव्हती. समोर आलेले नानाविध रुचकर पदार्थ पाहून कृष्णाने कौतुकाने मान डोलावली आणि रूक्मिणीकडे पाहून त्याने मंदहास्य केले. पुढे होऊन कृष्ण त्या पदार्थांना स्पर्श करणार तेवढयातच सुदाम्याने त्याला हाताची खूण करून थांबवले आणि म्हणाला,

"अरे कृष्णा, थांब! आधी जरा थांब बघू! रूक्मिणीदेवींनी स्वहस्ते व प्रेमाने बनवलेल्या या पदार्थांचे सेवन करण्याच्या आधी, तुझ्यासाठी अत्यंत प्रेमाने मी जी भेट आणलेली आहे त्याचा स्वीकार कर. रूक्मिणीदेवींचा आदर-सत्कार स्वीकार करण्याच्या नादात मी तर ते विसरूनच गेलो होतो. पण आता मला आठवण झाली आहे, तेव्हा ती प्रेमभेट मी तुला आधी देतो आणि मगच तुमच्या या पाहुणचाराचा मी स्वीकार करणे योग्य होईल."

असे म्हणून सुदाम्याने आपल्याबरोबर आणलेले गाठोडे सोडले आणि त्यातून एका साध्या कापडात बांधलेले एक साधे मडके बाहेर काढले. सुदामा आपल्या जागेवरुन उठला. अत्यंत प्रेमाने कृष्णाकडे पहात त्याने ते मडके

कृष्णाच्या हातात ठेवले आणि कृष्णाला आपले दोन्ही हात जोडून नमस्कार केला. कृष्णाच्या ठिकाणची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली. त्याच्या स्वभावानुसार त्याला मुळीच धीर धरवेना आणि त्याने ताबडतोब ते मडके आपल्या डाव्या हातात धरून, उजवा हात त्या मडक्यात घातला. हाताला दहीपोह्यांचा स्पर्श जाणवताच कृष्ण अत्यंत सुखावला आणि त्याने हाताच्या मुठीतून थोडेसे दहीपोहे काढून स्वतःच्या मुखात घातले सुध्दा! दहीपोह्यांचा घास मुखात जाताक्षणीच कृष्णाचे नेत्र सहजपणे मिटले गेले आणि त्या दहीपोह्यांच्या स्वादात कृष्ण पूर्णपणे दंगून जणू स्वतःलाही हरवूनच बसला. मुखातील घास जेव्हा संपत आला, तेव्हा कृष्णाच्या मुखातून “वाहवा! छान!! फारच छान!!!” असे अस्पष्ट उद्गार जेमतेम बाहेर आले न आले मात्र, कृष्णाने दहीपोह्यांचा दुसरा घास लागलीच आपल्या मुखात घातला. जणू काही कृष्णाला त्या दहीपोह्यांच्या रुची व स्वादापासून वेगळे होणे शक्यच होत नव्हते, एवढ्या त्वरेने कृष्ण असे एकामागून एक दहीपोह्यांचे घास स्वतःच्या मुखात घालीत होता. एवढा वेळ कृष्णाकडे कौतुकमिश्रित प्रेमाने पाहत असलेली रूक्मिणी अगदी मनापासून हसली. पुढे होऊन तिने कृष्णाचा हात धरून त्याला थांबवले आणि म्हणाली, “अहो नाथ, थांबा! थांबा जरा! एवढी उतावीळ का? तुमची तर प्रत्येक गोष्टीतच घाई गडबडच असते हे तर मी नेहमीच पाहत आले आहे. तुम्ही तर तो पदार्थ असा खात आहात की जणू काही तुम्हाला तो आयुष्यात प्रथमच मिळत आहे. एवढा तो पदार्थ आहे तरी काय? आम्हाला तरी सांगाल की नाही? तसे पाहिले तर तो पदार्थ मला तरी साधाच दिसत आहे. येथे द्वारकेत नेहमीच पंचपक्वान्ने खाण्याची तुम्हाला सवय असताना, असल्या साधारण पदार्थाची तुम्हाला एकदम एवढी गोडी वाटावी याचे मला तरी अत्यंत नवलच वाटत आहे. त्यामुळे त्या पदार्थाविषयी मला अत्यंत कुतूहलही वाटत आहे. एवढे त्या पदार्थाच्या रूचीत आहे तरी काय? मला तरी सांगाल की नाही? आणि तो पदार्थ जर एवढा रूचकर असेल, तर त्याचा स्वाद मला तरी घेऊ द्याल की नाही? का त्या स्वादामध्ये रमलेली स्वारी मला पण विसरली की काय? पण असे बरे

नव्हे हे मी तुम्हाला अगदी बजावून सांगते. तेव्हा तो पदार्थ आधी मलाही लवकर द्या आणि त्याचे एवढे काय वेगळेपण आहे तेही मला सांगा बरे!”

असे म्हणून रूक्मिणी कृष्णाच्या अधिक जवळ आली आणि कृष्णाच्या हातातील मडके आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न करू लागली. पण कृष्णाने हसत हसतच ते मडके रूक्मिणीपासून आणखीनच दूर केले. त्यामुळे रूक्मिणीची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचली आणि ती अधिकच व्याकूळ झाली. शेवटी मुखावरती मिश्किलतेचे भाव असलेल्या कृष्णाने आपल्या हातातील थोडे दहीपोहे रूक्मिणीच्या हातावर ठेवले. रूक्मिणीने क्षणभरच हातातील त्या हदीपोह्यांकडे कुतूहलाने पाहिले आणि पटकन ते स्वतःच्या मुखात टाकले देखील! दहीपोह्यांचा रसास्वाद घेताना रूक्मिणीचे नेत्र सहजपणे मिटले गेले आणि तिच्याही मुखातून सहजोद्गार निघाले. “ओऽहो, सुरेख! फारच सुंदर!!” केवळ एवढेच म्हणून रूक्मिणी थांबली नाही, तर तिने आपला हात कृष्णापुढे करून दहीपोह्यांची आणखीन मागणी केली. रूक्मिणीला चिडवण्यासाठी म्हणून कृष्ण तिला दहीपोहे देण्यास नकार देत होता आणि रूक्मिणीसुद्धा लटक्या रागाने कृष्णाच्या आणखीनच मागे लागल्यासाखे करीत होती. शेवटी कृष्णाने मूठ भरून दहीपोहे काढून घेतले आणि ते सर्व मडकेच रूक्मिणीच्या स्वाधीन केले. रूक्मिणीला झालेला आनंद तिला लपवता आला नाही आणि तिने लपवण्याचा प्रयत्नही केला नाही. हातात आलेल्या मडक्यातील दहीपोह्यांचा रसास्वाद रूक्मिणीने यथेच्छपणे घेण्यास सुरूवात केली. त्या दहीपोह्यांच्या सेवनात रूक्मिणी स्वतःला पूर्णपणे हरवून राहिली होती.

कृष्ण व रूक्मिणी यांच्या प्रेमाची लीला सुदामा अगदी मंत्रमुग्ध होऊन पाहत होता. ‘त्या दहीपोह्यांच्या चवीत एवढे काय आहे, की ज्याचा एवढा आनंद कृष्ण व रूक्मिणी यांना होत आहे’ याचे सुदाम्यालाही अत्यंत नवलच वाटत होते. त्याच्या मनाला तर एक कोडे पडल्यासारखेच झाले होते. पण त्याला काही बोलायची संधी मिळण्याच्या आतच कृष्ण पुढे आला आणि आपल्या हातातील दहीपोह्यांचा घास त्याने सुदाम्याच्या मुखात भरवला. त्या दहीपोह्यांचा स्पर्श व रूची सुदाम्याच्या जिव्हेला जाणवली मात्र,

त्याच्या सर्वांगातून जणू एक आनंदाची लहरच उठली, असेच सुदाम्याला जाणवले. त्या अवीट गोडीचा अनुभव घेता घेता तो घास सुदाम्याच्या मुखात केव्हा विरघळला हे सुदधा त्या सुदाम्याला कळलेच नाही. परंतु सुदामा मात्र कृष्णप्रेमात कधीच विरघळलेला होता.

थोडया वेळाने सुदाम्याला सहजतेने देहभान आले आणि त्याला वस्तुस्थितीची जाण आली. त्याच्या लक्षात आले की 'हे दहीपोहे आपण कृष्णाचा प्रसाद म्हणून सेवन केले म्हणूनच त्याची गोडी एवढी अनुपम व मधुर आहे. नाहीतर दहीपोहे काय, आपण घरीसुदधा नेहमी खात होतोच की! तेच दही व तेच पोहे. पण आपण ते भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले आणि कृष्णानेही तितक्याच प्रेमाने त्याचा सहज स्वीकारही केला. कृष्णाने केवळ दहीपोहेच नाही, तर त्याद्वारे आपले प्रेमच सेवन केले आणि म्हणूनच ते साधे दहीपोहेही एखाद्या स्वादिष्ट पक्वान्नापेक्षाही सुरस व सुमधुर ठरले. तेव्हा ही सर्व कृष्णप्रेमाचीच महती आहे, हेच खरे. त्याच्या प्रेमाच्या गोडीचेच हे माहात्म्य आहे हे अगदी सत्य आहे.'

अशा तऱ्हेच्या विचारात बुडालेले सुदाम्याचे मन कृष्णाच्या प्रेमाने व कृष्णमाहात्म्याच्या जाणिवेने युक्त होऊन राहिले होते. एका आगळयाच आनंदाचा अनुभव सुदाम्याच्या अंतरात व्यापून राहिला होता. सुदामा त्याच्या या अंतर्मुख अवस्थेतून पुन्हा बाहेर आला, तो कृष्णाच्या प्रेमळ स्पर्शाने व प्रेमळ शब्दांनी. सुदाम्याला आनंदाच्या पूर्ण स्थितीत असलेला पाहून कृष्ण त्याच्या जवळ आला. कृष्णाने सुदाम्याच्या खांद्यावर आपला हात अगदी हलकेच ठेवला आणि आपल्या हळुवार व मधुर वाणीने तो सुदाम्याशी बोलू लागला.

"अरे सुदाम्या, माझ्या परम मित्रा, आज तुझ्या या दहीपोह्यांनी मी खरेच अगदी संतुष्ट झालो आहे. त्याच्या अमृततुल्य गोडीपुढे इतर पंचपक्वान्नांची ती काय मातब्बरी? अरे, ती सर्व पक्वान्ने मला या रूक्मिणीच्या कृपेमुळे नेहमीच सेवन करावयास मिळत असतात. परंतु या दहीपोह्यांच्या

सेवनाने जे समाधान व आनंद मला मिळाला ना, त्याची सर दुसऱ्या कशालाही येणे शक्यच नाही. त्याच्या गोडीची बरोबरी इतर कोणत्याही पदार्थाशी मुळीच करता येणार नाही. मित्रा, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे दहीपोहे खाण्याची ही संधी मला गोकूळ सोडल्यापासून प्रथमच मिळत आहे आणि त्यामुळेच माझ्या ठिकाणी असलेल्या गोकुळातील स्मृती पुन्हा जाग्या व ताज्या झाल्या आहेत. तुला मी अगदी खरेच सांगतो, की एवढया गोडीचे दहीपोहे गोकुळातही मी केवळ राधेच्याच हातचे सेवन केलेले आहेत. त्यानंतर एवढा प्रदीर्घ काळ सरला आणि पुन्हा त्याच चवीचे व त्याच गोडीचे दहीपोहे सेवन करण्याची जणू ही सुवर्णसंधीच मला लाभली. खरेच मित्रा, तुझे माझ्यावर अगदी उपकारच झाले आहेत. त्याची परतफेड कशी व कोणत्या प्रकारे मी करू ते सांग बरे?”

बोलता बोलता कृष्णही थोडासा भावपूर्ण झालाच. कृष्णाची भावपूर्णता पाहून रूक्मिणीचेही मन भरून आले. कृष्णाचे माहात्म्य यथार्थपणे जाणून असलेली रूक्मिणी सुदाम्याला उद्देशून बोलू लागली,

“अहो सुदामदेवा, तुमची खरोखरीच धन्य आहे. कारण तुम्ही कृष्णाच्या अंतःकरणातील अगदी कोमल व नाजूक अंगाला स्पर्श करून, त्याला अत्यंत सुखावले आहे. कृष्णाचे गोकुळातील बालपणीचे जीवन आणि त्याने तेथे घेतलेला प्रेमाचा अनुभव, हा त्याच्या अत्यंत जिव्हाळयाचाच विषय आहे. त्यातूनही राधेच्या प्रेमभक्तिभावाचा अनुभवलेला आनंद हा तर कृष्णाच्या अंतःकरणातील कधीही वेगळा होऊ न शकणारा असा अविभाज्य भाग आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. इतर अनेकांच्या मुखातून यासंबंधी मी पुष्कळ ऐकलेले आहे. पण यासंबंधी मी मात्र कृष्णाला कधीच विचारत नाही आणि कृष्णही त्याविषयी कधीही बोलत नाही. परंतु कृष्णाच्या अंतःकरणात राधेचा भक्तिभाव नित्य स्फुरत असतो आणि कृष्ण त्याचा प्रेमानंद सदैव अनुभवीत असतो, याची मला अगदी खात्री आहे. पण आज तुमच्या प्रेमभक्तिभावाचा स्वीकार करताना कृष्णाच्या अंतःकरणातील त्या

'राधाभावा'ला नकळतपणे स्पर्श झाला आणि तो आनंद कृष्णाच्या मुखातून अत्यंत सहजपणे प्रगटही झाला.

अहो सुदामदेवा, मीसुद्धा राधेचे नाव व तिच्या भक्तिभावाचा आनंद कृष्णाच्या मुखातून प्रगट होताना आज प्रथमच श्रवण केला. त्याचा मला आनंद झाला आणि मलाही एकदम धन्य झाल्यासारखेच वाटले. कारण कृष्णाच्या अंतःकरणातील हा अरूप व अनाम असलेला भाव प्रगट करणे, जे मलाही कधी शक्य झाले नाही, ते शक्य करण्यास तुम्ही कारणीभूत झालात. म्हणूनच मला तुमचे अत्यंत कौतुक वाटत आहे. कारण त्या निमित्ताने कृष्णाच्याही अंतःकरणातील साठून व दाटून राहिलेला भाव काही प्रमाणात तरी मोकळा झाला. त्याचाच आनंद कृष्णाच्या मुखावर विलसित झालेला मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे. कृष्णाला आनंदित करणे हाच तर भक्तिभाव आहे. कृष्णाला आनंदात पाहणे, याशिवाय दुसरा काय आनंद त्याच्या भक्ताला असणार आहे बरे? आणि असा भक्ताला झालेला आनंदही केवळ कृष्णाचा दुसरा एखादा भक्तच स्वानुभवाने जाणू शकेल. खरे की नाही?"

रूक्मिणीच्या भावपूर्ण बोलण्याने सुदाम्याला थोडेसे नवल जरूर वाटले, पण आनंद मात्र अधिक झाला हे निश्चित. सुदाम्याला नवल वाटले, कारण कृष्णाची पत्नी या नात्याने रूक्मिणी कृष्णाच्या माहात्म्याला जाणत असेल अशी कल्पनाही सुदाम्याच्या मनात नव्हती. पण कृष्णाच्या एका भक्ताला झालेला आनंद जाणणाऱ्या रूक्मिणीचाही तो भक्तिभाव हा स्वानुभवच आहे, हे सुदाम्याने त्याच्या स्वानुभवाने जाणले आणि म्हणून त्याचा सुदाम्याला अत्यंत आनंद झाला. सुदाम्यानेही सांदिपनींच्या आश्रमात असताना राधेच्या कृष्णप्रेमाविषयी व भक्तीविषयी बलरामाच्या मुखातून सर्व काही ऐकलेले होते. 'राधा म्हणजे कृष्णाची गोकुळातील अत्यंत प्रिय सखी, जी सख्यभक्तीने कृष्णाशी पूर्णपणे ऐक्य पावली होती' एवढया एका वाक्यातच राधेच्या भक्तिभावाचे यथार्थ वर्णन बलरामाने सुदाम्याला

सांगितले होते. त्यावरूनच राधा व कृष्ण यांचे संबंध काय, कसे व किती होते हे सुदाम्याने जाणले होते. परंतु त्या संबंधांची थोरवी रूक्मिणीही जाणून आहे आणि तिला त्याचा अत्यंत आनंदच होत आहे, हे पाहून मात्र सुदाम्यालाही अतिशय आनंद झाला. हे माहात्म्य कृष्णाच्या भक्तिभावाचेच आहे हे सुदाम्याने ओळखले. कृष्णाशी ऐक्य पावलेले त्याचे भक्त, यांचे आपापसात पूर्ण सख्य असते. त्यांच्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव निर्माण करणारी स्पर्धा व चुरस असूच शकत नाही. कारण ते सर्व भक्त एकाच प्रेमरसाने युक्त होऊन कृष्णाशीच समरस झालेले असतात. म्हणूनच ते एकमेकांकडे समभावाने पाहत असतात आणि प्रेमभावाने वागत असतात.

रूक्मिणीच्या भक्तिभावाचा झालेला आनंद कसा व कोणत्या शब्दांत व्यक्त करावा हेच सुदाम्याला सुचेना, म्हणून तो रूक्मिणीकडे केवळ कौतुकाने व आनंदाने पहातच राहिला होता. कृष्ण मात्र रूक्मिणीकडे त्याच्या नेहमीच्या थोडयाशा मिश्किलभावाच्या नजरेने पाहत होता. पण तरीही रूक्मिणीच्या भक्तिभावाने झालेला आनंद मात्र कृष्णाच्या प्रसन्न मुखावर अत्यंत सहजपणाने व मोकळेपणाने विलसताना दिसत होता. तो व्यक्त करण्यासाठी काही शब्दांचा आधार घ्यावा अशी आवश्यकता ना कृष्णाला जाणवताना दिसत होती, ना तशी जरूरी रूक्मिणीलाही वाटताना दिसत होती. कृष्ण व रूक्मिणी यांच्यातील एकरूपतेचेच तर ते द्योतक व लक्षण होते."

नारदाच्या ओघवत्या वाणीचा वेग एवढा वाढला होता की त्यामध्ये स्थळ, काळ व व्यक्ती यांचे वेगळेपण पूर्णपणे विरून गेले होते. लक्ष्मीचे मनही श्रवणानंदात एवढे बुडालेले होते की ती तर स्वतःला हरवूनच बसली होती. तन्मय होऊन श्रवण करतानाही वर्णन करण्याच्या ओघात नारदाच्या मुखातून, जेव्हा रूक्मिणीचा व तिच्या ठिकाणी असलेल्या कृष्णाविषयीच्या भक्तिभावाचा उल्लेख वारंवार होऊ लागला, तेव्हा मात्र लक्ष्मीच्या मनाची श्रवणातील एकाग्रता हळूहळू व थोडीथोडी ढळू लागली. तिच्या मनात थोडीशी चलबिचलही सुरू झाली. रूक्मिणीचे कृष्णाशी असलेले पत्नीचे नाते

आणि तरीही तिच्या ठिकाणी असलेला कृष्णाविषयीचा भक्तिभाव यांची सांगड तिच्या मनाला लागेना. म्हणूनच तिचे मन श्रवणाशी पूर्णपणे एकरूप होऊ शकत नव्हते हे तिच्या एकदम लक्षात आले. तिने मनाला सावरून पुन्हा स्थिर करण्याचा प्रयत्न केला खरा, पण तिचे मन काही केल्या स्थिर तर होईनाच आणि त्या मनाची अस्थिरता वाढूच लागली.

लक्ष्मीने नारदाकडे पाहिले तर भक्तिगायनात पूर्णपणे रमलेल्या नारदाला देहाचे भान नव्हतेच आणि तो सहजासहजी देहभानावर येण्याची काहीच चिन्हेही दिसत नव्हती. काय करावे हे क्षणभर लक्ष्मीलाही सुचेच ना. परंतु एकाएकी ती आपल्या जागेवरून उठली आणि तिने नारदाच्या चरणांना हस्तस्पर्श करून त्याला नमस्कार केला. थोडा वेळ तसाच गेला. लक्ष्मीच्या मनातील आर्तता तिच्या स्पर्शाद्वारे नारदाच्या मनाला स्पर्श करती झाली आणि नारद हळूहळू देहभानावर येऊ लागला. थोडया वेळाने त्याने आपले प्रेमाश्रूंनी पूर्ण भरलेले नेत्र उघडले, तर त्याच्यासमोर लक्ष्मी नतमस्तक आहे हे त्याच्या लक्षात आले. नारदाने लागलीच लक्ष्मीच्या मस्तकावर हलकेच थोपटले असता, लक्ष्मीने आपले मस्तक वरती उचलले आणि आपले दोन्ही हात जोडून ती नारदासमोर बसून राहिली. नारदाने तिला तिच्या जागेवर बसण्यासाठी खुणावले असता लक्ष्मी पुन्हा आसनस्थ झाली. नारदाच्या नजरेतील सहेतुक बघण्याची खूण लक्ष्मीने ओळखली आणि तिने नारदाशी अत्यंत भावपूर्ण स्वरात बोलण्यास सुरुवात केली.

“हे हरिभक्तिपरायण नारदा, या नारायणाच्या अवतारचरित्रातील सगुण प्रेमभक्तीचे गायन ऐकावे तर केवळ तुझ्याच मुखातून! याविषयी दुमत असणेसुद्धा जराही संभवतच नाही. प्रेमरूप व प्रेमस्वरूप या भक्तिभावाच्या दोन्ही अवस्थांचा संयोग व संगमच तुझ्याठायी झालेला आहे. म्हणूनच तुझ्या अंतःकरणातील अखंड भक्तिभाव हा सदैव उत्कट अवस्थेतच असतो आणि त्यामुळेच तुझ्याकडून घडणाऱ्या सगुण प्रेमकथा-वर्णनाला सखोलता तर असतेच, पण त्याचबरोबर त्याला एक प्रकारचा प्रचंड वेगही असतो. त्या आवेगाच्या ओघात वाहत असताना श्रवणाला काहीच ताण नसतो, ऐकताना





मुद्दामहून ध्यान असे द्यावे लागतच नाही. सर्व कथा व प्रसंग त्यातील भावासह मनात सहजतेने प्रवेश करून अंतःकरणाचा ठाव घेत असतात.

पण नारदा, काही वेळा तुझ्या अंतःकरणाच्या भावपूर्ण अवस्थेतून अचानक भक्तिभावाचे एखादे आगळेवेगळे, पण आकर्षक असे अंग एखाद्या व्यक्तिरेखेच्या द्वारा प्रगट होते, तेव्हा मात्र मनाची श्रवणातील तंद्री थोडीशी भंग पावतेच. कारण जरी ती व्यक्ती भक्तिभावाच्या त्या विशिष्ट अंगाला व्यक्त करण्यासाठी कारणीभूत होत असली, तरी ती व्यक्ती केवळ निमित्तमात्र म्हणून मुळीच नसते. त्या व्यक्तीचेही स्वतःचे व्यक्तिमत्व, स्वतःचे जीवन, स्वतःचा भाव व अनुभव म्हणून काहीतरी वेगळा हा असणारच. नेमका तोच तपशील थोडक्यात का होईना, पण कळल्याशिवाय मन तुझ्या सांगण्याचा पूर्णपणे स्वीकार करू शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे खरी आणि ती मान्य करावयास हवीच ना?  कारण मनाची ती जरूरी पूर्ण केल्याशिवाय मन श्रवणात पूर्णपणे बुडू शकत नाही, तर ते श्रवणापासून थोडेसे अलगच राहते आणि पूर्ण आनंदही घेऊ शकत नाही. पूर्ण आनंद देऊ शकत नाही ती भक्ती कसली? भक्तिभाव तोच जो आनंदाचा पूर्ण अनुभव आणून देतो. त्यामुळेच मनाच्या या द्विधा अवस्थेत मनाकडून श्रवणभक्ती न घडल्यामुळे, श्रवणाचा आनंद न होता मन निव्वळ श्रवणसुखच घेत राहते. हेही मनाच्या जेव्हा लक्षात येते तेव्हा मग मन अधिकच बेचैन होते.

. . .

हे नारदा, सुदामा व कृष्ण यांच्या भेटीचे प्रेमरसपूर्ण वर्णन तू करत असताना तुझ्या बोलण्यात प्रथमच जेव्हा कृष्णाची पत्नी रूक्मिणी हिचा उल्लेख आला, तेव्हा माझ्या मनाला तसे काही विशेष जाणवले नाही. पण जेव्हा रूक्मिणी सुदाम्याशी कृष्णप्रेम व कृष्णभक्ती याविषयी बोलू लागली

तेव्हा मात्र मला जरा नवलच वाटले. त्यातूनही राधेच्या भक्तिभावाविषयी रूक्मिणीच्या मुखातून कौतुकाचे बोल उत्स्फूर्तपणे आले आणि प्रत्यक्ष कृष्णाच्या अंतःकरणातील भाव रूक्मिणी जाणत आहे एवढेच नव्हे, तर ती त्याचा पूर्ण आनंद घेत आहे हे जेव्हा माझ्या लक्षात आले, तेव्हा तर मी ओळखलेच की हे तर भक्तिभावाचेच लक्षण आहे. असे लक्षण रूक्मिणीच्या ठायी आहे, म्हणजेच तीही कृष्णाशी पूर्णपणे ऐक्य पावलेली त्याची भक्तच असणार आणि म्हणूनच रूक्मिणीला राधेचा व सुदाम्याचा भक्तिभाव लक्षात येऊन त्याचा अतिशय आनंदही होत आहे. तेव्हा रूक्मिणीच्या या भक्तिभावाचे गुज व मूळ जे आहे ते मी जाणून घेणे हे माझ्यासाठी अत्यंत आवश्यक होऊन राहिलेले आहे. कारण रूक्मिणीचा हा भक्तिभाव दुर्मिळ तर आहेच, पण कृष्णाची पत्नी या नात्याने तो जरा कठीणच आहे असे मला तरी माझ्या अनुभवाने वाटते.

पती-पत्नी हे नातेच मुळी असे आहे की त्या दोघांमध्ये एवढे सख्य व त्यातूनही साधणारे ऐक्य ही साधी व सोपी गोष्टच नाही. कारण संसारासाठी जमलेली किंवा जमवलेली पती व पत्नी यांची जोडी ही सुखदुःखाच्या सर्व प्रसंगात आणि सर्व अडचणी, संकटात परस्परांना साथ व संगत देत असेलही. प्रत्येकाचे प्रारब्ध व स्वभाव भिन्न असूनही एकमेकांवर प्रेम असेल, तर ते जोडीने संसार सुखाचा व समाधानाचाही करत असतील. परंतु पती-पत्नी या नात्यामध्ये भक्तिभावाचे संबंध निर्माण होऊन त्यांनी ऐक्याचा अनुभव घेणे, हे तर केवळ एक अद्‌भुतच आहे असेच म्हणावे लागेल. कारण त्यामध्ये पती-पत्नी या नात्यामुळेच अनेक अडचणी संभवतात आणि अशा अडचणी तर फक्त रूक्मिणीलाच आल्या असणार हे नक्की. कारण कृष्ण हा काय त्याच्या अनुभवाने असणार आणि ऐक्य साधायची जरूरी असणार ती केवळ रूक्मिणीलाच, नाही का? त्या अडचणींवर मात करायची तर कृष्णावरती केवढे तरी व्यक्तिगत प्रेमच असायला हवे आणि कृष्णाच्या माहात्म्याचीही जाणीव पूर्णपणे असावयास हवी. ते तर रूक्मिणीच्या ठायी निश्चितपणे असणारच. कारण म्हणूनच तर रूक्मिणी कृष्णाशी भक्तिभावाने ऐक्य साधू

शकली हे तर सत्यच आहे. पण कृष्णाविषयी एवढे प्रेम व त्याच्या माहात्म्याची एवढी जाणीव रूक्मिणीच्या ठायी कशी काय निर्माण झाली, हेच महत्त्वाचे आहे आणि तेच सर्व मला आधी जाणून घ्यायचे आहे. त्यानेच माझ्या मनाचे समाधान होईल आणि माझ्या मनाकडून पुन्हा श्रवणभक्ती घडावयास लागून आनंदाचा अनुभव घेण्यास ते मन सादर होईल. तेव्हा हे नारदा, माझ्या मनाची ही आर्तता तू त्वरित नाहीशी कर बघू!"

लक्ष्मीच्या विचारण्यामागील तिची भूमिका केवळ उत्सुकतेची नसून, कृष्ण व रूक्मिणी यांच्या आगळयावेगळया संबंधांचे गुज जाणून घेण्याची तळमळच तिच्या ठिकाणी निर्माण झालेली आहे, आणि त्यामुळेच लक्ष्मीच्या मनात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झालेली आहे हे ओळखण्यासाठी नारदाला मुळीच वेळ लागला नाही. परंतु तरीही तो थोडा वेळ काहीच न बोलता स्वस्थच बसून राहिला. त्याच्या कथनाचे सूत्र व लक्ष्मीच्या मनातील प्रश्न यांची कशी सांगड घालावी अशा विचारातच नारद गढून गेला असावा, असे त्याच्या मुखाकडे पाहिले असता जाणवत होते. नारदाच्या स्तब्धतेमुळे लक्ष्मीची अस्वस्थता मात्र वाढू लागली आणि ते नारदाच्याही लगेचच लक्षात आले. म्हणून मग नारदाने सावकाशपणे एकेक शब्द उच्चारीत बोलण्यास सुरूवात केली.

"हे नारायणप्रिय लक्ष्मी, तुझ्या श्रवणभक्तीचे कौतुक मी जे वारंवार करीत असतो ते अगदी योग्यच आहे. केवळ श्रवणसुखात मनाला अडकू न देता तू त्या मनाला कथेतील सगुण प्रेमाच्या प्रवाहातच नेहमी ठेवतेस. त्यामुळेच तुझे मन कथाप्रसंगात गुंतून तर राहत नाहीच, पण त्या मनाच्या ठिकाणी कथेतील मुख्य गाभ्याकडचे लक्ष कायम राहते. त्याचबरोबर तू हेही जाणून आहेस की सर्व कथाप्रसंगातील गाभा म्हणजे या नारायणाचे कृष्णावतारातील अंतःकरणच होय. त्यामुळेच कथेच्या ओघात येणारे काही प्रसंग जेव्हा तुझ्या मनाचे लक्ष कृष्णाच्या अंतःकरणापासून विचलित करतात, तेव्हा साहजिकच तुझे मन अस्वस्थ होते आणि त्यामुळे श्रवणाचा मूळ हेतूच बाजूला राहतो. त्यावेळी तुझ्याकडून श्रवणभक्ती न घडता केवळ श्रवणच

घडत राहते आणि हे तुझ्या जेव्हा लक्षात येते तेव्हा मग तुझे मन खरेच अस्वस्थ होते. कारण श्रवणभक्तीच्या आनंदाचा अनुभव न येता मन केवळ श्रवणसुखच घेत आहे, याचे भान तुझ्या ठिकाणी जागे होते आणि त्याचीच टोचणी तुझ्या मनाला सलत राहते. त्यातूनच तुझ्या मनाच्या ठिकाणी श्रवणभक्तीचा आनंद अनुभवण्याची आर्तता निर्माण होते आणि त्याची पूर्तता करण्यासाठी मग तू एवढी व्याकूळ होतेस, की माझ्या वाणीचा प्रवाह थोडा वेळ थांबवण्याचा माझ्यावरील प्रेमाचा हक्क तू बजावून घेतेस. ही तुझी अवस्था योग्यच आहे आणि निश्चितपणे कौतुकास्पदही आहे.

हे लक्ष्मी, कृष्ण व सुदामा यांच्या भेटीच्या प्रसंगात जेव्हा रूक्मिणीचा व तिच्या ठायीच्या कृष्णाविषयीच्या भक्तिभावाचा उल्लेख आला, तेव्हा तू आधी चकित आणि मग उत्तेजित झालीस. रूक्मिणीच्या भक्तिभावाचे तुला केवळ कौतुकच वाटले असे नव्हे, तर रूक्मिणीविषयीची एक प्रकारची आत्मीयताही तुझ्या ठिकाणी एकदम निर्माण झाली. मला मात्र याचे जराही नवल न वाटता एक प्रकारचा आनंदच झाला, कारण त्यामागचे गुज मी जाणून आहे आणि तुलाही ते कळल्यावर निश्चितपणे अतिशय आनंदच होणार आहे, हेसुद्धा मला ठाऊक आहे.

लक्ष्मी, पण एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेव की, रूक्मिणीच्या कृष्णाविषयीच्या भक्तिभावाचे रहस्य सांगायचे तर ते मला तुला अगदी मुळापासूनच सांगावे लागेल. कारण रूक्मिणीच्या ठिकाणी निर्माण झालेल्या या भक्तिभावाचे मूळ अर्थातच तिच्या ठायी असलेले कृष्णाविषयीचे अपार प्रेम आणि कृष्णमाहात्म्याची पूर्ण जाणीव यामध्येच आहे. तेव्हा मुळापासून व सविस्तरपणे सर्व वर्णन करून सांगितल्याशिवाय तुलाही हे रहस्य उलगडणार नाही. परंतु आता मी कृष्ण व सुदामा यांच्या भेटीतील आनंदात पूर्णपणे बुडालेलो आहे आणि त्यातून थोडा वेळही दूर होणे मला मुळीच शक्य होणार नाही. तेव्हा तुझ्या मनात आलेल्या या प्रबळ भावनेला प्रयत्नपूर्वक थोडावेळ आवर घाल आणि मनाला स्थिर करून पुन्हा कथेतील प्रेमप्रवाहात अलगदपणे सोडून दे. त्याच प्रवाहात पुढे रूक्मिणीची कथा येणारच आहे. परंतु तेवढा

वेळ तरी तुझ्या मनाला धीर हा धरायलाच हवा. तेव्हा आता पुन्हा श्रवणाला अगदी मनापासून सादर हो आणि आताच्या श्रवणाचा पूर्ण आनंद अनुभव.”

नारदाच्या बोलण्यातील मतितार्थ लक्ष्मीच्या लक्षात आला आणि त्यातील भावार्थही तिला भावला. लक्ष्मीने आपली मान संमतीदर्शक हलवली आणि स्मितहास्यपूर्वक नजरेने नारदाकडे पाहत राहिली. लक्ष्मी श्रवणाला सादर झाल्याची खूण नारदाच्याही लक्षात आली आणि त्याने प्रयत्नपूर्वक थांबवलेला आपल्या वाणीचा प्रवाह पुन्हा मोकळा केला.

“हे लक्ष्मी, दहीपोह्यांच्या निमित्ताने सगुण प्रेमाच्या मधुर रसात सुदामा, रूक्मिणी एवढेच काय, स्वतः कृष्ण सुद्धा अगदी पूर्णपणे बुडालेला होता. त्यांचे स्थळ व काळाचे भानच हरवल्यासारखे दिसत होते. परंतु कृष्णाची आंतरिक अवस्था मात्र वेगळी होती. कृष्णाचे मन जरी प्रेमाच्या अनुभवात पूर्णपणे रमलेले होते तरी अंतरात मात्र तो जागृत होता आणि हेच तर कृष्णाचे वैशिष्टय होते. तो कोणत्याही बाह्य गोष्टीत जेवढया चटकन व पूर्णपणे रमत असे, तेवढयाच चटकन व पूर्णपणे त्यातून त्वरेने बाहेरही येत असे आणि आपल्या आंतरिक सहज स्थितीत पुन्हा रमत असे. त्या आंतरिक स्थितीतूनही तो अचानक व स्वेच्छेने बाहेर येत असे आणि दुसऱ्या बाह्य गोष्टीत पुन्हा रमलेला दिसत असे. कृष्णाच्या ठिकाणी ही लीलया खेळणारी मायाच अनेकांच्या मनाला भुलवीत असे आणि त्यांच्या बुद्धीला कुंठीत करीत असे. कृष्णाच्या अंतरातील स्वानंदलहरी जेव्हा नानाविध व सुरेख आविष्कारांच्या रूपाने प्रगट होत, तेव्हा मन तर मोहूनच जाई. परंतु त्यामागचा कार्यकारणभाव जेव्हा बुद्धीला प्रयत्नपूर्वक शोधूनही सापडत नसे, तेव्हा मात्र कोडयात पडलेली बुद्धीही मग चालेनाशीच होई.

अशा कृष्णरूपाच्या प्रेमातच जे पडले आणि त्यात पूर्णपणाने बुडाले, त्यांना मात्र कृष्णप्रेमाच्या या लहरी केवळ सुखवणाऱ्याच ठरल्या असे नाही, तर त्यांना कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचण्याचा सगुण भक्तीचा मार्गच त्या लहरींत सापडला. कृष्णाच्या मनात आलेल्या प्रेमलहरींना

सांभाळीत व त्याचे प्रेमसुख अनुभवीत ते कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत, म्हणजेच कृष्ण त्यांच्या अंतःकरणापर्यंत केव्हा जाऊन पोहोचला आणि तेथेच स्थिर झाला हे त्यांचे त्यांनाही कळलेच नाही. मुख्य म्हणजे, तसे ते कळण्याचीही त्यांना आवश्यकताच वाटली नाही. कारण कृष्णाच्या प्रेमभक्तीने त्यांची अंतःकरणेही कृष्णाच्या अंतःकरणासारखी प्रेमस्वरूप होऊन राहिली आणि अंतःकरणात नित्य व अकारण स्फुरणाऱ्या कृष्णप्रेमाच्या आनंदातच ते सदैव रममाण होऊन राहिले. आत्मरतीची ही अत्यंत दुर्मिळ व सर्वश्रेष्ठ अवस्था कृष्णाच्या प्रेमीभक्तांना अगदी सहजपणे प्राप्त होऊन राहिली.”

बोलता बोलता नारदाचे भक्तीनिरूपण त्याच्या नकळतच सुरू झाले आणि नारदाचे मन मूळ कथेच्या ओघापासून थोडयाशा दूरच्या दिशेने जाऊ लागले. त्याची जाणीव नारद व लक्ष्मी या दोघांनाही एकदमच झाली. लक्ष्मीने नारदाकडे सहेतुक नजरेने पाहून मंदस्मित केले. नारदानेही मोकळेपणाने हसून प्रतिसाद दिला आणि मन ओघात फार पुढे जाण्याच्या आधीच त्याने आपल्या मनाला सावरले. नारदाने मनाला पुन्हा मूळ कथेच्या प्रवाहात आणले आणि आपल्या वाणीचा ओघ पुन्हा प्रवाहित केला.

“हे लक्ष्मी, दहीपोह्यांच्या सेवनामध्ये रमलेला दिसणारा कृष्ण अंतरात मात्र सहजपणे जागृत होता. त्यामुळेच अगदी थोडयाच वेळात कृष्ण तेवढयाच सहजतेने त्या प्रसंगातून आधी मनाने बाजूला झाला आणि मग पुढील कृती करण्यासाठी तत्पर झाला. पुढे होऊन कृष्णाने सुदाम्याचा हात आपल्या हातात घेतला आणि त्याला तो महालाच्या आतील, स्वतःच्या दालनात घेऊन गेला. तेथे कृष्ण सुदाम्यासह झोपाळयावर बसला आणि झोपाळा हळूहळू झुलवत झुलवत सुदाम्याशी बोलू लागला.

“अरे सुदाम्या, माझ्या परममित्रा, केवळ माझ्यावरील प्रेमानेच एवढया दूरवरून तू मला भेटायला आलास, हे मी जाणून आहे आणि त्याचाच मला अतिशय आनंद होत आहे. त्यासाठी तुझे कौतुक जेवढे म्हणून करावे तेवढे कमीच आहे. तुझ्या रूपाने जणू सद्‌गुरू सांदिपनींचेच प्रेम पुन्हा

अनुभवण्याची संधी मला प्राप्त झाली आहे. तुझ्याशी मला केवढेतरी बोलायचे आहे. पण एवढया थोडया वेळात ते साधणे आपल्याला शक्यच होणार नाही. कारण प्रेम अनुभवणे ही घाईगडबडीत करण्याची गोष्टच नाही. त्यासाठी निवांत वेळ व स्वस्थ मन याचीच आवश्यकता आहे. पण राज्यकारभारात लक्ष घालण्यामध्ये आणि बलरामदादांना मदत करण्यामध्ये माझा दिवसाचा सर्व वेळ केव्हा व कसा निघून जातो हे माझे मलाच कळत नाही. पण आता मात्र मला सवड काढलीच पाहिजे. कारण माझा आवडता मित्र माझ्याकडे आलेला आहे आणि त्याच्या भेटीतच जास्तीत जास्त वेळ घालवणे हेच माझे सध्या आद्य कर्तव्यकर्म आहे. त्याशिवाय मित्रप्रेमाचा व गुरूप्रेमाचा आनंद मला लुटता येणार नाही. त्यासाठी आपण आता असे करूया, की तू आधी पूर्ण विश्रांती घे. बऱ्याच काळच्या प्रवासाने तुला नक्कीच थकवा आलेला आहे. विश्रांती घेऊनच तुला प्रवासाचा आलेला भागवटा नाहीसा होईल आणि तू पुन्हा ताजातवाना होशील. तोपर्यंत मीही माझी सर्व कर्मे आटपून घेतो. म्हणजे मग मीही तुझ्याशी सविस्तर बोलावयास पूर्णपणे मोकळा होईन. त्यातूनही तुला काही जरूरी लागल्यास तुझी सर्व काळजी रूक्मिणी घेणारच आहे. तसे तिला काही सांगण्याचीही जरूरी नाही. रूक्मिणीचा तो केवळ स्वभावच आहे असे नाही तर ती खऱ्या अर्थाने माझी अर्धांगिनी आहे. माझ्या मनातील विचार ओळखून व माझ्या अंतरातील भाव जाणून ती अगदी सहजपणे सर्वकाही करत असते. तेच तर तिचे आगळे वेगळेपण आहे.”

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने सुदाम्याचा प्रेमाने निरोप घेऊन कृष्ण राज्याच्या काही महत्त्वाच्या कामासाठी निघून गेला. तेवढयातच तेथे रूक्मिणीचेही आगमन झाले आणि तिने सुदाम्याच्या विश्रांतीसाठी स्वतः जातीने व्यवस्था केली. सुवर्णमंचकावरील रेशमी शय्येवर शांतपणे पहुडलेला सुदामा स्वतःशीच विचार करीत होता. खरे तर, प्रवासाच्या कष्टांमुळे थकलेला सुदामा कृष्णाने केलेल्या पाहुणचारातील सरबराईमुळे थोडासा सुखावला होता. परंतु शरीर विश्रांती घेत असतानाही कृष्णप्रेमात बुडालेले सुदाम्याचे मन अत्यंत ताजे व सावध होते. त्यामुळेच आळस वा सुस्ती यासारख्या तमोगुणी वृत्तींना सुदाम्याच्या मनात मज्जावच होता. कृष्णाच्या प्रेमस्मरणात रमलेला सुदामा कृष्णाच्या प्रत्यक्ष भेटीची आर्ततेने वाट पाहत होता. कारण

त्याला केवढातरी कृष्णाचा व्यक्तिगत सहवास करायचा होता, कृष्णाशी संवाद करायचा होता आणि कृष्णाचे अंतःकरण यथार्थतेने जाणून घ्यायचे होते.

• • •

त्याच वेळी अचानक तेथे बलरामाचे आगमन झाले. सुदाम्याला पाहताच बलरामाला अत्यंत हर्ष झाला आणि सुदाम्याकडे तो जवळ जवळ धावतच आला. बलरामाला पाहताच सुदामाही एकदम उत्तेजित झाला आणि त्वरित उठून बलरामाच्या जवळ धावलाच. एकच क्षण दोघांनी एकमेकांकडे पाहिले आणि पुढच्याच क्षणी दोघेजण परस्परांच्या मिठीत विसावले. एकमेकांविषयीच्या प्रेमाने भरलेल्या मनातून, नेत्रही प्रेमाने भरून आले आणि अश्रूरूपाने वाहून मोकळे होऊ लागले. बलरामाने प्रयत्नपूर्वक सुदाम्याला त्याचा हात धरून पुन्हा मंचकावर बसवले आणि स्वतः त्याच्या शेजारी अगदी जवळ येऊन बसला. सुदाम्याचा धरलेला हात आपल्या एका हातात तसाच धरून ठेवून, बलरामाने आपला दुसरा हात सुदाम्याच्या खांद्यावर ठेवला आणि तो त्याला अत्यंत प्रेमाने थोपटीत राहिला. निःशब्द अवस्थेतील प्रेमाचा अनुभव घेऊनही प्रेम शब्दरूपाने प्रगट होण्यासाठी आतुरलेलेच होते आणि ते बलरामाच्या मुखातून प्रगटू लागले.

“अरे मित्रा सुदाम्या, तू तर मला आश्चर्याचा अत्यंत सुखद असा धक्काच दिला आहेस. तू येथे आल्याची वार्ता कृष्णाने मला राजदरबारातच सांगितली आणि मी लागलीच सर्व कामे बाजूला सारून येथे धावतच आलो. ती कामे सांभाळायला कृष्ण समर्थ आहे. त्यांची मला काळजी नाही. परंतु माझ्या मित्राला आणि त्याहीपेक्षा माझ्या गुरूबंधूला भेटल्याशिवाय मला तरी चैन पडणे शक्यच नव्हते. मित्रा, तुला पाहिल्याबरोबर सांदिपनी ऋषींचे स्मरण होते आणि त्यांच्या आश्रमातील आपले सर्व जीवन आठवते. माझ्या ठिकाणी





असलेल्या त्या सर्व सुप्त पूर्वस्मृती आज पुन्हा जाग्या झाल्या आहेत आणि एका वेगळयाच आनंदाचा अनुभव मला आणून देत आहेत.

अरे सुदाम्या, खरेच त्यावेळेस आपण एकमेकांच्या सहवासात अनुभवलेले प्रेम काही खासच होते यात शंकाच नाही. त्याचे मूळ कारण म्हणजे आपल्या सद्‌गुरूंचे प्रेम हेच होते, हे जरी सत्य असले तरी आपले आपापसातील सूरही चांगलेच जुळले होते हेही खरेच आहे. कृष्ण, तू व मी अशी आपली एक युतीच झाली होती. त्यातूनही कृष्ण हा सतत सांदिपनींच्याच सहवासात व सेवेत असल्यामुळे, तू व मी असेच जास्त एकत्र राहत असू. होय ना? तरीही आपल्यातील दुवा हा कृष्ण व त्याचेच प्रेम होते. सांदिपनींचे माहात्म्य आपण जाणत होतो खरे, पण तरीही आपण त्यांच्या जास्त जवळ जात नसू. कारण त्यांच्याविषयी एक प्रकारची आदरयुक्त भीतीच आपल्या ठिकाणी होती. परंतु आपल्या सद्‌गुरूंच्या सहवासात व सेवेत नित्य असलेल्या कृष्णाविषयी मात्र आपल्याला अतिशय कौतुक वाटत असे. एवढेच नव्हे, तर कृष्णाविषयी आपल्या ठिकाणी अतिशय प्रेमच होते. मुख्य म्हणजे मुळात कृष्णाचेच आपल्यावर आत्यंतिक प्रेम होते. त्यामुळे तो मात्र जेव्हा त्याला संधी मिळेल तेव्हा आपल्यावरील प्रेमाने, आपल्याला सद्‌गुरू सांदिपनींचेच माहात्म्य व थोरवी वर्णन करून सांगत असे. कारण कृष्णाच्या ठिकाणी केवळ एकमेव सांदिपनींचाच ध्यास असे. त्याच्या ध्यानीमनी दुसरे तिसरे काहीच नसे. इतर त्याला काही मुळी दिसतच नसे. बोलायला व सांगायला कृष्णाच्या ठायी सद्‌गुरूमहती हाच विषय असे. हे सर्व आठवते ना तुला?

अरे सुदाम्या, आपल्याला मात्र कृष्णच जास्त प्रिय होऊन राहिलेला होता. त्याच्याकडून घडणारी सद्‌गुरूभक्ती पाहून आपल्याला तर कृष्णाचेच माहात्म्य जाणवत असे. त्यामुळे आपल्या बोलण्यात नेहमी कृष्णाचाच विषय असे. कृष्णाचे गुण, कृष्णाचे रूप, कृष्णाचे व्यक्तिमत्व यांनीच आपण भारून गेलो होतो. खरे तर, हे सर्व मी गोकुळापासून पाहिलेले व अनुभवलेले होते.

पण मी त्याविषयी कधी कुठेच बोलत नसे. आपणहूनही मी कोणाला काहीच सांगत नसे. पण सांदिपनींच्या आश्रमात अगदी प्रथमच मी तुझ्याशी कृष्णाविषयी बोललो. कारण मला तू एकदम माझ्या अत्यंत जवळचा वाटत होतास.

अरे सुदाम्या, या कृष्णाला मी अगदी लहानपणापासूनच पाहत आलेलो आहे आणि तेव्हापासूनच त्याच्या ठिकाणचे वेगळेपण माझ्या लक्षात येऊन, ते माझ्या ठिकाणी पूर्णपणे ठसलेले आहे. स्वतःविषयीचा जबरदस्त आत्मविश्वास आणि सर्वांविषयीचा आत्यंतिक आपलेपणा हीच कृष्णाच्या जीवनातील दोन मुख्य व ठळक वैशिष्ट्ये आहेत. तीच त्याच्या जीवनाची मूलभूत सूत्रे आहेत. पण त्याच्या स्वभावाचे आणखीन एक वैशिष्टय आहे आणि ते म्हणजे ज्या गोष्टी त्याने जशा प्रकारे करायच्या ठरवलेल्या असतात, त्या गोष्टी तो तशाच प्रकारे करीत असतो. एवढेच नव्हे, तर इतरांनाही तो त्या गोष्टी तशाच प्रकारे करावयास लावीत असतो. सुरूवातीला कृष्णाच्या मनात काय बेत आहे हे आपणास ठाऊक नसते आणि तोही सहजपणे काहीतरी विधान करतो किंवा एखादी योजना मांडतो. त्याविषयी सर्वांकडून त्यांची त्यांची मते व सूचना अगदी मोकळेपणाने विचारूनही घेतो. पण एकदम उत्स्फूर्तपणे त्याच्या मनातील योजना कार्यान्वित करून कृष्ण मोकळाही होतो. मला तर असे खात्रीपूर्वक वाटते की त्याच्या उत्स्फूर्तपणातही काहीतरी पूर्वनियोजित योजनाबद्धता असते.

अरे सुदाम्या, खरे म्हटले तर कृष्णाच्या अशा या लहरी स्वभावाशी जुळवून घेणे माझ्यासारख्याला तरी कठीणच झाले असते. कारण माझा स्वभाव अत्यंत साधा व सरळ आहे. त्यामुळे कृष्णाच्या वागण्या-बोलण्यातील अशा अचानक घडणाऱ्या बदलांनुसार स्वतःला जुळवून घेणे, मला तरी सहजासहजी शक्य होत नाही. त्यावेळेस मग माझी अगदी त्रेधातिरपीट उडते आणि त्याची मौज कृष्ण पुरेपूर अनुभवतो. ‘बलराम म्हणजे अगदी भोळा सांब आहे’ असे कृष्णच माझ्याविषयी वारंवार म्हणत असतो आणि त्याचा फायदाही तोच पूर्णपणे नेहमीच घेत असतो. परंतु तुला



मी खरे सांगतो की मी असा भोळसट वगैरे अजिबात नाही. कृष्णाच्या सर्व कारवाया मला नीट समजत असतात. परंतु माझे कृष्णावर लहानपणापासून एवढे प्रेम आहे की मग प्रत्यक्ष कृष्णाच्या समोर माझा काही इलाजच चालत नाहीसा होतो. त्याचेही माझ्यावर अतोनात प्रेम आहे याचीही जाणीव माझ्या ठिकाणी नित्य असते. त्यामुळे जरी मी यदाकदाचित कधी काही कारणामुळे कृष्णावर बाह्यांगाने रागावलो, तरी माझा तो निव्वळ आविर्भाव असतो. मी मनापासून कृष्णावरती कधी रागावूच शकत नाही. मुख्य म्हणजे हे कृष्णालाही ठाऊक आहे आणि तोही त्याचा पूर्ण लाभ उठवीत असतो.

अरे मित्रा सुदाम्या, मी मघापासून तुला जे कृष्णाच्या विचित्र स्वभावाचे सुचित्र वर्णन करून सांगत आहे, ती काही माझी त्याच्याविषयीची तक्रार नाही किंवा माझ्या ठिकाणी असलेला कृष्णाविषयीचा राग या निमित्ताने बाहेर पडत आहे, असेही नाही. तर मी तुला ही सर्व कृष्णाच्या स्वभावाची गंमत म्हणून सांगत आहे आणि त्यातून आमच्या आगळ्या वेगळ्या प्रेमसंबंधातील मजाच तुला दाखवत आहे. परंतु कृष्णावरील माझ्या प्रेमाबरोबरच त्याचे विशेषत्वही मी यथार्थपणे जाणून आहे. जसे कृष्णाचे गोकुळातील जीवन मला आठवते तसेच कृष्णाकडून घडलेली सद्‌गुरूभक्तीही माझ्या नेहमीच लक्षात असते. त्यामुळेच कृष्णाची कृती करण्याची पद्धत जरी मला नेहमीच रुचत नसली, तरी त्याच्या अंतरातील शुद्ध व लोककल्याणाच्या हेतूची मला पक्की खात्री आहे. त्यामुळेच कृष्णाचे वागणे-बोलणे जरी काही वेळेला माझ्या मनाला मानवत नसले, तरी मी त्याला माझ्यापरीने सक्रिय साहाय्य करीत असतो. अर्थात बऱ्याच वेळेस कृष्णाला माझी प्रत्यक्ष कृतीने मदत नकोच असते, तर त्याला केवळ माझी मान्यता हवी असते हे मी ओळखून आहे. त्यातूनही जर एखादे वेळेस काही अडचणी निर्माण झाल्या किंवा कृष्ण स्वतःच काही कारणाने वा त्याच्या कृतीने अडचणीत आला, तर मात्र माझा त्याला पूर्ण पाठिंबा असतो आणि मी माझ्या सर्व शक्तीनिशी कृष्णाच्या समवेत उभा राहतो.

अरे सुदाम्या, कृष्णाचा गंमत करण्याचा स्वभाव तर तूही अगदी आश्रमात असल्यापासून पाहत आहेस आणि जाणतही आहेस. पण कृष्णाने खरेच एक मोठीच गंमत येथे केली आहे आणि ती म्हणजे या द्वारकानगरीच्या सिंहासनावर त्याने मलाच राजा म्हणून बसवले आहे. खरे सांगायचे तर त्याने मला अक्षरशः राजा बनवलेच आहे. मी मोठा भाऊ आहे असा माझा मान सांगून, त्याने आमचे पिता वसुदेव यांना अत्यंत आग्रहपूर्वक मला राज्यासनावर बसवण्यास भाग पाडले. खरे तर आमच्या सर्वांच्याच, एवढेच नव्हे तर सर्व नगरवासियांच्या मनातही, कृष्णानेच राज्यावर बसावे असेच होते. परंतु कृष्ण कोणाचेही ऐकण्यास मुळी तयारच नव्हता. शेवटी त्याचेच म्हणणे त्याने त्याच्या नेहमीच्या वाक्चातुर्याने व कृतीकौशल्याने खरे केले. कृष्णाच्या केवळ प्रेमाखातरच मी राज्यासनाचा स्वीकार केला.

परंतु एक सत्य मी तुला सांगतो की आम्हा सर्वांच्या मनावर मात्र एकीएक कृष्णाच्या प्रेमाचेच राज्य आहे आणि त्या प्रेमाच्या राज्यातच आम्ही सर्व आनंदाने नांदत असतो. प्रत्यक्ष राज्याचा कारभारही कृष्ण स्वतःच पाहत असतो. मी केवळ नामधारी राजा आहे, पण कार्यकारी राजा मात्र केवळ कृष्णच आहे. मीसुद्धा हे पूर्णपणे जाणून आहे आणि माझ्या या भूमिकेला न्याय देण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीत असतो. अर्थात काही वेळा माझे प्रयत्न कमी पडतात व मला त्याचा त्रासही होतो आणि त्यावेळेस इतरांनाही माझा त्रास होतो. परंतु कृष्ण मात्र त्याच्या भूमिकेला पक्केपणाने धरून असतो आणि अत्यंत प्रेमाने व कौशल्याने माझ्या मनाची समजूत घालून मला पुन्हा मूळस्थितीला आणतो. मग मलाही माझ्या भूमिकेची जाणीव होते आणि घट्ट झालेले माझे मन कृष्णाच्या प्रेमाने विरघळून पुन्हा मोकळे होते. माझ्या मनातील कृष्णप्रेम व त्याची महती पुन्हा जागी होते आणि कृष्णाच्या खेळात मी पुन्हा सामील होऊन, त्याच्या खेळाचा आनंद अनुभवण्यास सुरूवात करतो."

बलरामाने अशा तऱ्हेने जी बोलायला सुरूवात केली ती केलीच. तो थांबायचे काही लक्षणच दिसेना. बलराम असा किती वेळ बोलत राहिला





असता कोण जाणे? सुदाम्याला पाहिल्याबरोबर बलरामाला जे भरून आले, ते मोकळे करताना त्याच्याकडून कृष्णाचे प्रेम व माहात्म्यच प्रगट होऊ लागले. खरे तर, कृष्णाचे प्रेम व माहात्म्य हे दोन्ही एकरूपच आहेत. कृष्णाचे प्रेम प्रगट करायला गेले की त्याचे माहात्म्यच प्रगट होते आणि कृष्णाचे माहात्म्य वर्णन करायला गेले, की त्याचे प्रेमच अधिकाधिक प्रगट होऊ लागते. कृष्णप्रेमाचे व कृष्णमाहात्म्याचे हेच ऐक्य एकाच वेळी बलरामही अनुभवीत होता आणि सुदामाही अनुभवीत होता. हेच तर कृष्णाच्या भक्तीचे माहात्म्य आहे. कृष्णाच्या भक्तीने कृष्णाशी एकरूप झालेले त्याचे भक्त, एकमेकांच्या सहवासातही कृष्णाशी ऐक्य पावल्याचाच आनंद अनुभवीत असतात.

हे लक्ष्मी, बलराम कृष्णाविषयी ज्या मोकळेपणाने बोलत होता तसे बोलणे त्याला प्रत्यक्ष कृष्णासमोरही प्रगट करणे शक्य झाले नसते. कारण कृष्णाच्या प्रत्यक्ष उपस्थितीत त्याच्याचविषयी बोलण्याला थोड्याशा मर्यादा या आल्याच असत्या आणि बलरामाला त्याच्या स्वभावामुळेही त्या मर्यादा जरा जास्तच जाणवल्या असत्या. परंतु सुदाम्याशी बोलताना मात्र बलराम पूर्णपणे मोकळा झाला. कृष्णाविषयी एवढया मोकळेपणाने बहुधा तो प्रथमच बोलत असावा. म्हणूनच बलरामाकडून कृष्णाचे स्वभाववैशिष्ट्य प्रगट होत असताना त्याचा आनंद जसा बलरामाला झाला, तसाच तो सुदाम्यालाही झाला आणि त्या दोघांचेही स्थळ-काळाचे भान थोडा वेळ हरवल्यासारखेच झाले.

तेवढयातच तेथे प्रत्यक्ष कृष्णाचेच आगमन झाले आणि तेथील सर्व चित्रच एकदम पालटले. कृष्णाने प्रथम सुदाम्याच्या जवळ जाऊन त्याच्याशी हस्तांदोलन केले आणि त्याचे खास मिश्किल हास्य करीत तो सुदाम्याकडे पाहत राहिला. त्यानंतर झटकन वळून कृष्ण बलरामाच्या जवळ गेला आणि त्याने बलरामाला वाकून नमस्कार केला. बलरामाने पटकन कृष्णाला उचलून आपल्या मिठीत घेतले आणि कृष्णाच्या पाठीवर कौतुकाची थाप मारून बलराम म्हणाला,

“कृष्णा, हे मात्र तुला चांगलेच जमते. माझ्या बाह्यांगाने असा मान ठेवून मी तुझा मोठा बंधू आहे याची तू मला सारखी आठवण करून देत असतोस. पण मी मात्र जाणून आहे की मानाच्या मोठेपणापेक्षा मनाचा मोठेपणा हाच महत्त्वाचा आहे आणि तोच खरा सर्वांसाठी उपयोगाचा आहे. असा मनाचा मोठेपणा फक्त तुझ्यापाशीच आहे हेही खरे आहे. म्हणूनच तू नेहमीच सर्वांचा योग्य तो मान राखीत असतोस आणि सर्वांची योग्य ती काळजीही घेत असतोस. कोणाच्याही प्रत्यक्ष मदतीसाठी तूच नेहमी धावून जात असतोस आणि हे सर्व तुझ्याकडून अगदी निरपेक्षपणे व निःस्वार्थीपणे घडत असते. त्याचे कारण म्हणजे तुझ्याठायी सर्वांविषयी असलेला आत्यंतिक आपलेपणा हेच आहे.

असो. कृष्णा, आता तू या आपल्या मित्राचा ताबा घे आणि त्याच्या सुखस्वास्थ्याची नीट व पूर्ण काळजी घे. त्याला पुरेशी विश्रांती घेऊ दे. तो प्रवासातून दमून भागून आलेला आहे हे लक्षात ठेव. आता उगाचच त्याच्याशी जास्त बोलण्यात वेळ घालवून त्याला जास्त त्रास देऊ नकोस. नंतर तुला बोलायला पुष्कळ अवधी व संधी मिळणारच आहे. कारण एकदा का तू बोलायला लागलास की मग तुला वेळेचे भानच राहत नाही आणि तुझ्या गोड बोलण्याने ऐकणाराही एवढा मंत्रमुग्ध होऊन राहतो, की तो तर सर्वच भान विसरतो. म्हणूनच मीसुद्धा सुदाम्याशी अगदी थोडावेळच बोलत होतो. आता मी माझ्या कामासाठी निघतो आणि माझे काम तरी काय? तर हेच की जे काही कृष्णा, तू ठरवले आहेस त्याला माझी मान्यता देणे! होय की नाही कृष्णा?”

असे म्हणून बलरामाने मिश्किलपणे हसून कृष्णाच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली आणि तो लगबगीने तेथून निघून गेला.

बलरामाच्या पाठमोऱ्या रूपाकडे पाहून कृष्ण मंदस्मित करीत तेथेच थोडा वेळ उभा राहिला. पण सुदाम्याच्या नजरेत मात्र बलरामाविषयी कौतुक व एक प्रकारचे कुतूहलही होते. त्याला माहीत नसलेला असा बलरामाच्या व्यक्तिमत्वातील एक नवाच पैलू आज सुदाम्याला पहायला

मिळाला. मागे सांदिपनींच्या आश्रमात असताना बलरामाने सुदाम्याशी, कृष्णाच्या बालपणीच्या गोकुळातील चरित्राविषयी केवढे तरी रंगवून रंगवून बोलणे केले होते. पण यावेळेस कृष्णाचे द्वारकेतील जीवन, त्याचे बलरामाशी असलेले संबंध आणि कृष्णाच्या स्वभावाचा बलराम त्याच्या परीने घेत असलेला आनंद, हे सगळे प्रत्यक्ष बलरामाच्या मुखातून ऐकताना सुदाम्याला एकीकडे नवलही वाटत होते आणि दुसरीकडे एक प्रकारचा आनंदही होत होता.

सुदाम्याच्या मनाची अवस्था व त्यातील भाव कृष्णाने लागलीच ओळखले आणि थोडेसे हसून तो सुदाम्याला म्हणाला,

“अरे सुदाम्या, तू बलरामदादांकडे एवढया चकित नजरेने का बरे पाहत आहेस? आमच्या दादांनी तुला एवढे सांगितले तरी काय? त्यांनी तुला निश्चितपणे माझ्याविषयीच आणि तेही अगदी कौतुकाने काहीतरी सांगितले असणार याची मला खात्री आहे. कारण मला आमच्या दादांचा स्वभाव पूर्णपणे माहित आहे. साधे, सरळ व अत्यंत प्रेमळ असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. त्यांना छक्के पंजे कधीच करता येत नाही आणि कोणी केले तर ते त्यांच्या लक्षातही येत नाही. परंतु व्यवहारात आणि विशेषतः राजकारणात असा सरळपणा व भोळसटपणा हे दोषच ठरतात. तेथे केवळ सरळमार्गी असून चालत नाही. कारण आपण सरळमार्गाने जात असताना दुसरा कोणी वाकडी वाट करून आपल्या मार्गात शिरला आणि आपल्याला आड आला, तर वेळप्रसंगी आपल्यालाही आपला सरळ मार्ग सोडून वाकडया वाटेने जावे लागते किंवा आपल्या आड येणाऱ्याला बाजूला करून, त्याला त्याच्या वाटेला लावावे लागते.

पण नेमके हेच आमच्या दादांना समजत नाही आणि जमतही नाही. त्यांचे नेहमी एकच म्हणणे व सांगणे असते की आपला चांगला मार्ग आपण सोडायचा नाही. मग भले त्यासाठी आपल्याला काही त्रास झाला तरी बेहत्तर! परंतु व्यवहारात काय किंवा राजकारणात काय, दुष्ट व दुर्जनांच्या

बरोबर सरळ मार्गाने वागणे ही मनाची दुर्बलताच ठरते आणि त्यामुळे आपल्याला तर त्रास होतोच, परंतु त्याचबरोबर इतर अनेकांना व विशेषतः सामान्य जनांना अतिशय दुःख सहन करावे लागते. त्यातून पुन्हा दुर्जनांचे दुष्टत्व पोसले जाऊन ते अधिकच वाढते हे वेगळेच. तेव्हा अशा लोकांशी वागताना साम, दाम, दंड व भेद या सर्वांचा उपयोग करूनच त्यांना आपल्या मार्गातून दूर करावे लागते. त्यासाठी शक्ती, युक्ती व मुख्यतः विवेक यांचा वापर करावा लागतो.

अरे सुदाम्या, पण नेमके हेच आमच्या दादांना मानवत नाही. त्यामुळे अशा गोष्टींना त्यांची कधीच मान्यता मिळत नाही. मग मला काही वेळा त्यांच्या नकळत काही निर्णय घेऊन त्यांची कार्यवाही करावी लागते. काय करणार? माझाही नाइलाजच होतो. पण नंतर कधीतरी मी सावकाशीने, सवडीनुसार दादांच्या कानावर सर्व गोष्टी घालतो. तेव्हा मात्र आधी दादांच्या रागाचा पारा एकदम वरती चढतोच, पण थोडया वेळाने ते शांत होतात. त्या निर्णयांच्या मागची कारणमीमांसा व त्या निर्णयांची फलनिष्पत्ती जेव्हा मी त्यांच्या लक्षात आणून देतो तेव्हा ते माझे कौतुक करून मला दादही देतात. परंतु माझ्या कार्यपद्धतीविषयीचा त्यांचा निषेध मात्र नोंदवून ठेवण्यास ते मुळीच विसरत नाहीत.

पण सुदाम्या, आमच्या दादांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांचा प्रेमळपणा होय. बाह्यांगाने ते बरेचसे गंभीर व काहीवेळा थोडेसे रागीटही वाटतात. त्यांच्या एकदम जवळ जाण्याची सामान्याला थोडीशी आदरयुक्त पण भीतीच वाटते. दादाही आपणहून सर्वांच्यात तसे मिसळत नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी गैरसमज संभवतात हे खरे आहे. परंतु एकदा का त्यांची मेहेरनजर एखाद्यावर झाली आणि दादांनी त्याला एकदा का आपला म्हटला, की मग मात्र ते त्याच्याशी प्रेमाच्या अत्यंत मोकळेपणाने वागतात. त्यांच्या ठिकाणी काही आत-बाहेर असे नसल्यामुळे एखादयाचे चुकले तर दादा स्पष्टपणे त्याला त्याची चूक दाखवून देतात. त्यामुळेच लोक दादांवर कित्येकवेळा नाराजही होतात. परंतु तेच आमचे दादा एखादयाचे कौतुक

करायला लागले, की मग मात्र ते त्याचे एवढे कौतुक करतील आणि त्याला एवढे इनामही देतील, की विचारायची सोय नाही. कुठचीही गोष्ट हातची राखून करणे मुळी त्यांना जमतच नाही. हाच त्यांच्या स्वभावाचा गुणही आहे आणि तसे बघायला गेले तर तोच दोषही आहे.

अरे सुदाम्या, आपल्या व्यक्तीच्या कोणत्याही संकटप्रसंगी धावून जाणे आणि त्याला पूर्णपणे मदत करणे हाही आमच्या दादांचा एक विशेषच गुण आहे. मग त्यासाठी ते कधीही मागेपुढे पाहणार नाहीत. त्यामुळेच मलाही दादांचा नेहमीच भरवसा वाटत असतो. समजा काही कारणाने दादा माझ्यावर नाराज असले तरीही मला जेव्हा जेव्हा त्यांच्या मदतीची जरूर लागते, तेव्हा तेव्हा हक्काने मी त्यांच्याकडे जातो आणि त्यांच्याकडे त्यांचे साहाय्य मागतो. त्यावेळेस तेही पूर्वीच्या रागालोभाचे जराही स्मरण न ठेवता अगदी सहजपणे व पूर्णपणे माझी मदत करतात. पण त्यानंतर मात्र दादा त्यांचा माझ्याशी असलेला अबोला पुन्हा धरतात. अशी ही आमच्या दादांच्या स्वभावाची मोठी मौज आहे आणि त्याची गंमत मी नेहमीच अनुभवत असतो."

कृष्णाच्या बोलण्यावरती मध्येच हसून सुदामा म्हणाला, "अरे कृष्णा, तुला तर सर्वांचीच व नेहमीच गंमत वाटत असते आणि माझ्या मते हीच खरी सर्वात गमतीची गोष्ट आहे. पण जीवनात गंभीरतेने घेण्यासारखे काही आहे की नाही? कारण जीवन हीच एक अत्यंत गंभीर गोष्ट आहे, हे मी माझ्या अनुभवाने सांगतो. सर्वच गोष्टी आपण हसण्या—खेळण्यातच पाहत व करीत राहिलो, तर मग जीवनातील गांभीर्यच निघून जाईल आणि जीवन म्हणजे एक पोरखेळच होऊन राहील. पण तसा तो नक्कीच नाही. तू मात्र सर्वच गोष्टी हसत खेळत करताना दिसतोस आणि दुसऱ्यांच्या गोष्टीही अगदी त्याच वृत्तीने घेतानाही दिसतोस. पण मग खरे जीवनात कसे वागावयास हवे बरे? तसे बघायला गेले तर तुझेही जीवन मला तरी बरेच कटकटीचे व गुंतागुंतीचेच दिसत आहे. तरीही तू मात्र कशाचीही व कोणाविषयीही तक्रार

न करता, सर्व गोष्टी अगदी शांतपणे व हसतमुखाने करताना दिसतोस आणि सदासर्वकाळ आनंदाचा अनुभव घेत असतोस. याचे नेमके रहस्य काय हे मला उलगडून सांगशील का?”

• • •





# कृष्ण—सुदामा संवाद

सुदाम्याच्या बोलण्यावर कृष्ण अत्यंत मोकळेपणाने हसला आणि सुदाम्याला म्हणाला,

“अरे मित्रा, तू तर अगदी कळीचाच प्रश्न विचारलास. पण तू म्हणतोस तसे यात रहस्य वगैरे काहीही नाही. सर्व काही अत्यंत स्पष्ट व सरळ आहे. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव, की जसा काळाचा प्रवाह आहे तसाच जीवनाचाही प्रवाहच आहे. म्हणजे निदान तो तसा असावयास तरी हवा. कारण तरच त्याला खऱ्या अर्थाने जीवन असे म्हणता येईल. जसे प्रवाहात कोणतीही गोष्ट कायमची टिकत नाही, तर ती प्रवाहाबरोबर वाहून जाते, तसेच कालप्रवाहात अनेक व्यक्ती येतात व जातात आणि अनेक प्रसंग घडतात व घडून जातात. दाखवायला म्हणून काहीही शिल्लक राहत नाही. परंतु जेव्हा मन त्या व्यक्ती वा प्रसंगात अडकून राहते तेव्हा त्या मनाला दुःखाचा अनुभव येण्यास सुरूवात होते. एकतर सुख संपले म्हणून दुःख होते किंवा अनुभवलेल्या दुःखाच्या स्मरणाने दुःख अधिकाधिक वाढत राहते. त्यामुळे मग जरी बाहयांगाने जीवन चालू असले तरी मनाच्या ठायी जीवनाचा प्रवाह अडल्यासारखा होतो. मन पुढे जायला मागतच नाही. तेव्हा मनाठायी मोकळेपणा असणेच अत्यंत आवश्यक आहे. कारण तरच मन कशातही व कोणातही गुंतून न राहता वस्तुनिष्ठ राहील आणि प्रसंगानुसार त्या त्या वेळेस तसा तसा अनुभव घेऊन लगेचच मोकळेही होईल.

असा मोकळपणाही मनाला तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा ते मन ईश्वरी प्रेमाने युक्त असेल. कारण हा मोकळेपणाचा गुण फक्त ईश्वरी प्रेमातच आहे. हेच ईश्वरी प्रेम तर आपल्याला आपले सद्गुरू सांदिपनी यांच्या रूपाने अनुभवायला मिळाले आणि त्यांच्याच कृपेने ते आपल्याठायी निर्माण झालेले आहे हेही खरेच आहे. ते ईश्वरी प्रेम जेव्हा त्याच्या गुणात्मकतेने व गुणवत्तेने प्रगट होते, तेव्हा आपल्या मनालाही त्या प्रेमाचा मोकळेपणा सहजतेने प्राप्त

होतो. मग आपले मन केव्हाही, कशातही गुंतून न राहता त्या ईश्वरी प्रेमाने नेहमी ताजेतवाने व टवटवीत राहते.

अरे सुदाम्या, तू म्हणतोस त्याप्रमाणे जीवन हे खरोखरी गंभीरच आहे. तो पोरखेळ नाही हे सत्यच आहे आणि ते जीवन गांभीर्यानेच जगायचे आहे. कारण भाग्याने लाभलेले मानवी जीवन हे तर त्या परमेश्वराचे एक वरदानच आहे. ती आपल्याला मिळालेली एक अमूल्य संधीच आहे. तेव्हा ती संधी फुकट दवडता कामा नये. केवळ सुखासाठी व मौजमजेतच आपण आपले आयुष्य घालवले, तर मिळालेला मानवी जन्म हा व्यर्थच गेला असेच म्हणावे लागेल. पण एक गोष्ट लक्षात ठेव की जीवन गांभीर्याने जगणे म्हणजे केवळ कोरडेपणाने किंवा उदासीनतेने जगणे नव्हे, तर जीवनाचा खरा हेतू जाणूनच तसा अनुभव प्रत्यक्ष जीवनात घेणे, म्हणजेच त्या जीवनाचे गांभीर्य आपल्याला खऱ्या अर्थाने उमगले असे होईल.

तेव्हा जीवन आनंदाने जगायचे आहे, कारण असा आनंद अनुभवण्यासाठीच आपल्याला हे जीवन प्राप्त झालेले आहे. बाहय जीवनात आनंद शोधत बसलो तर आपल्या वाटयाला फक्त सुखदुःखाच्या द्वैताचाच अनुभव येईल. परंतु ईश्वरी प्रेमाचा आनंद आपल्या अंतरात सदैव स्फुरत असेल तर त्या आनंदाचा अनुभव आपल्या बाहय जीवनातही निश्चितपणे येईलच येईल. परमशांती, परमतृप्ती, सर्वांविषयी उदासीनता म्हणजे अलिप्तता, तरीही आपलेपणा आणि सदासर्वकाळ मोकळी वृत्ती हीच त्या आनंदाची लक्षणे आहेत.

अरे सुदाम्या, एक गोष्ट लक्षात ठेव, या आनंदाच्या अनुभवाची अवस्था अंतःकरणात अत्यंत सखोल असते आणि या सखोलतेलाच गंभीरता असे म्हणतात. तेव्हा आनंदाच्या अनुभवासाठी जीवन जगणे म्हणजेच गंभीरतेने जीवन जगणे होय. त्यामुळेच जीवनातील सर्व वागणे, बोलणे हे गंभीरतेनेच घडते. त्यामध्ये केव्हाही उतावीळ किंवा उथळपणा असत नाही, तर







सखोलताच असते. बाह्य प्रसंग किंवा व्यक्तींचे विविध स्वभाव यांच्या मनावरील तात्कालिक परिणामाने कधीही उच्छृंखल प्रतिक्रिया व्यक्त होत नाहीत. तर प्रत्येक गोष्टीचा योग्य व सखोल विचार घडून विवेकानेच उच्चार व आचार घडत असतात. पण असे घडणे हे फक्त स्वतःच्या बाबतीतच शक्य आहे. कारण आपले गांभीर्य आपल्या ठायी असते आणि आपला विवेक हा आपल्या ठिकाणी सदैव जागृत असतो. पण दुसऱ्यांच्या बाबतीत काय घडावे हे आपल्या हातात अजिबात नसते. कारण प्रत्येकजण हा त्याच्या त्याच्या स्वभावानुसार जीवनात वागत असतो आणि परमेश्वरी सत्तेत त्याच्या त्याच्या नशिबानुसार त्याला फळे मिळत असतात. अशा व्यक्ती या जेव्हा आपल्या बाह्य जीवनाचा एक भाग असतात तेव्हा आपल्यालाही त्यांच्यात बाह्यांगाने सहभागी होणे भागच पडते. त्यावेळेस त्यांच्या स्वभावानुसार घडणाऱ्या त्यांच्या वागण्या बोलण्याचा आपल्यावर बरावाईट परिणाम होणे साहजिकच असते. अशावेळी मनाची शांत स्थिती राखून आपल्या मनात रागलोभादी विकार निर्माण होणार नाहीत, याची काळजी आपली आपल्यालाच घ्यावी लागते. कारण दुसरा काही आपली काळजी घेईल अशी त्याच्याकडून अपेक्षा करणेही चुकीचेच ठरेल.

हे सुदाम्या, अशा वेळीच दुसऱ्याकडून घडणाऱ्या गोष्टी आपल्या मनातून आत खोलवर जाणार नाहीत याची खबरदारी घेणे आवश्यक असते. त्यासाठीच मग आपल्याला आपल्या मनाची मुळातील जडणघडणच बदलावी लागते. आपल्या मनाच्या स्वभावातही बदल घडवावा लागतो. बाह्यांगाच्या गोष्टी ज्या आपल्या हातात नाहीत, त्या गांभीर्याने न घेण्याची मनाला सवय लावावी लागते. आता त्या गोष्टींकडे गांभीर्याने पाहायचे नसेल तर गंमतीच्या दृष्टीनेच पाहणे घडावे लागेल. तरच त्या गोष्टींचा होणारा परिणाम हा तात्कालिक राहील आणि तेथल्या तेथेच तो संपूनही जाईल. त्याचा शेंडा बुडखाही मनामध्ये अजिबात शिल्लक राहणार नाही. मग त्या गोष्टी मनातून आणखी आत उतरण्याचाही प्रश्नच उरणार नाही. सर्व निवाडा हा मनातल्या मनातच होऊन मन पुन्हा तात्काळ मोकळेच होईल. प्रत्येकाचे भिन्न भिन्न स्वभाव, त्याची वेगळी वृत्ती, कृती करण्याची वेगवेगळी शैली यांची एक मौजच मनाला वाटत राहील. नाहीतरी विविध अंगांनी व रंगांनी

प्रगटलेली ही सृष्टी हा त्या परमेश्वराचा एक विनोदच आहे. उत्स्फूर्तपणे घडणारा, मनाला सुखवणारा आणि मनाला नेहमी हलक्या फुलक्या स्थितीत ठेवणारा हा परमेश्वराचा विनोद ज्याला कळला, मानवला आणि भावला त्यालाच खरा आनंद अनुभवता आला आणि त्याचेच त्या आनंदाने जीवन जगणे घडले, हेच सत्य आहे.

अरे सुदाम्या, पण एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेव की दुसऱ्याच्या स्वभावाचा व वागण्या-बोलण्याचा आपल्यावरती नकारात्मक व खोलवर परिणाम होऊ नये, म्हणूनच केवळ त्याचा स्वभाव व वागणे-बोलणे गंमत म्हणूनच स्वीकारणे योग्य आहे. पण त्याचा अर्थ असा नव्हे, की आपण दुसऱ्याचा उपहास करावा किंवा त्याच्या दुःखाला वा अडचणींना कमी लेखावे. दुसऱ्याच्या संकटाचा वा त्रासाचा एखाद्याला जर आनंद वाटायला लागला, तर असे नक्की समजावे की त्याच्या ठायी काहीतरी मानसिक विकृती निर्माण झालेली आहे. पण ईश्वरी प्रेमाने नित्य युक्त असल्यामुळे ज्याचे मन स्वच्छ व निर्मळ आहे त्याच्या ठिकाणी मात्र निश्चितपणे इतरांच्या दुःखाविषयी व अडचणींविषयी दया व कणव हेच असणार. सांसारिक व्यापांनी व संकटांनी तप्त झालेल्या जीवांविषयी त्याच्या ठिकाणी सहानुभूतीच असणार. एवढेच नव्हे, तर त्याच्याकडून अशा जीवांना मदत करण्याचा व शांत करण्याचाच प्रयत्नही अगदी सहजपणे घडणार. अर्थात स्वतःच्या मर्यादा ओळखून असल्यामुळे तो स्वतःच्या मर्यादेबाहेर जाऊन दुसऱ्याला मदत करणार नाहीच. परंतु ईश्वरी सत्तेवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळे तो संसारातील दुःखितांना व पीडितांना ईश्वराची आळवणी करण्याचा व त्या ईश्वरालाच शरण जाण्याचा मार्ग सांगणार आणि तो स्वानुभवाने दाखवणारही, हे मात्र निश्चित."

कृष्ण असा कितीतरी वेळ बोलतच होता आणि सुदामाही भारावल्यासारखा ते सर्व तन्मय होऊन ऐकत होता. असेच बोलणे आणखीही कितीतरी वेळ चालूच राहिले असते. परंतु श्रवणाने मन तृप्त होत असलेल्या

सुदाम्याच्या मुखातून एकदम कृष्णाला दाद देणारे उद्गार सहजपणे निघाले,

"अरे कृष्णा, तुझी तर अगदी कमालच आहे. तुझ्या मुखातून जीवनाविषयी ऐकत असताना श्रवणाची जरी पूर्ती झाली नाही आणि ती कधी होऊ शकेल असे मला वाटत नाही, तरी माझे मन मात्र पूर्णपणे भरून राहिले आहे. जीवनासंबंधी ज्ञान म्हणून जरी ते कितीही ऐकले तरी ते नुसते शब्दज्ञान किंवा तत्वज्ञान नव्हते, तर त्यातून तुझ्या अंतःकरणातील ईश्वरी अनुभवाची सहज अवस्थाच प्रगट होत होती. म्हणूनच ऐकत असताना बुद्धीला तुझ्या सांगण्यातील सत्यत्व जसे लगेचच पटले, तसेच मनालाही त्याने विचार करायला लावले. तुझे सांगणे प्रत्यक्ष जीवनाशी निगडित असल्यामुळे ते तशा आचरणाला उद्युक्त तर करीलच, पण त्याचबरोबर तसे आचरण करता येणे शक्य आहे असा विश्वासही माझ्या मनामध्ये निर्माण झाला आहे.

अरे कृष्णा, तसे म्हणशील तर तू जे सांगणे केलेस ते मी सद्गुरू सांदिपनींच्या मुखातूनही श्रवण केलेले आहे. पण त्यावेळेस केवळ त्यांचे निरूपण किंवा प्रवचन म्हणून श्रवण करणे घडत असे. ते ज्ञान म्हणून बुद्धीला आकलन होत असे खरे, पण मन मात्र त्या श्रवणात पूर्णपणे कधी न रमता, अलिप्तच राहत असे. कारण या ऐकलेल्या ज्ञानाचे प्रत्यक्ष आचरण आपल्याकडून घडेल की नाही, अशी शंका मनामध्ये कुठेतरी घर करून राहिलेली असे. किंबहुना असे प्रत्यक्ष आचरण करता येणे आपल्याला शक्य होणारच नाही, याची खूणगाठ मनामध्ये पक्केपणाने बांधलेली असे. पण तुझे सांगणे हे मुख्यत्वेकरून प्रत्यक्ष जीवनासंबंधीचे व दैनंदिन व्यवहाराविषयीचे आहे. ते माझ्यावरील अत्यंत प्रेमाने घडत आहे आणि मुख्य म्हणजे तुझे बोलणे हे माझ्याशी प्रत्यक्ष संवाद केल्यासारखे आहे. त्यामुळे माझ्या मनावर त्याचा प्रभाव अगदी सहजपणे व कायमचा होऊन राहतो आहे. त्याने माझ्या मनाच्या विचाराला चालना तर मिळालीच आणि तसे प्रत्यक्ष वागण्याचा

दृढनिश्चयही होत आहे. कारण निरपेक्ष ज्ञान तत्व म्हणून बुद्धीला कळले, तरी त्याचा अनुभव प्रत्यक्ष जीवनात घेतल्यानेच त्या ज्ञानाच्या सत्यत्वाची प्रचिती येणार आहे. त्यासाठी आधी मनाचीच तशी अवस्था होणे हे अत्यंत आवश्यक व महत्वाचे आहे. तशी मनाची अवस्था होण्यासाठीच तुझा प्रत्यक्ष सहवास करणे, तुझ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे व तुझ्याशी प्रत्यक्ष संवाद साधणे अत्यंत जरूरीचे आहे. कारण त्यामुळेच तुझे रूप, तुझे ध्यान व तुझा बोध मनामध्ये सहजपणे ठसेल.

हे कृष्णा, सांदिपनींच्या आश्रमात मला तुझा सहवास भाग्याने मिळाला आणि तुझ्या व्यक्तिगत प्रेमाचा अनुभवही मला घेता आला खरा, पण त्यावेळेस तुझे माहात्म्य मला माहीतच नव्हते. बलरामाच्या मुखातून तुझे गोकुळातील चरित्र ऐकल्यावर तुझे आगळे वेगळेपण जरी लक्षात आले होते, तरी तेवढयाने तुझे माहात्म्य मात्र माझ्या लक्षात आले नव्हते. सद्‌गुरू सांदिपनींनी कृपावंत होऊन जेव्हा तुझे यथार्थ माहात्म्य मला सांगितले आणि माझ्या कल्याणासाठी तुझ्याच भक्तीचा मार्ग मला दाखवला, तेव्हा मात्र मला तुझ्याकडे पाहण्याची खरी दृष्टी लाभली. पण पाहण्यासाठी म्हणून तूच माझ्या सन्मुख नव्हतास. मग मात्र तुझ्या दर्शनाची ओढ माझ्याठायी लागून राहिली आणि तुझ्या पराक्रमाच्या व थोरवीच्या कथा कानावर आल्यावर तर, ती ओढ सतत वाढतच राहिली. परंतु तुझी भेट कशी व कधी घ्यावी हेच लक्षात येईना. शेवटी तू व सर्व यादव मथुरा सोडून येथे, तूच नवीन वसवलेल्या द्वारकेला राहायला आल्याची बातमी माझ्या कानावर आली आणि माझा आनंद गगनात मावेच ना! हे तर केवळ माझ्यासाठीच घडलेले आहे याची मला पक्की खात्री वाटली. ईश्वराच्या नियतीतील लाभलेल्या या अनुकूलतेची खूण माझ्या लक्षात आली. तुझी भेट कोणत्याही परिस्थितीत आता घ्यायचीच अशी खूणगाठ मी माझ्या मनाशी बांधली. एकीएक तुझ्या भेटीचा ध्यासच माझ्या मनाला लागला आणि शेवटी सर्व संसार बाजूला सारून तुझ्या भेटीसाठी धावतच निघालो.





हे कृष्णा, तुझ्या भेटीचा तर मला अत्यंत आनंद झालाच. पण त्याहीपेक्षा मला भेटल्यावर तुला झालेला आनंद जेव्हा मी पाहिला, तेव्हा तर मला आनंदाचे भरतेच आले. कारण तू माझ्याकडे तुझा भक्त म्हणून पाहत असल्याचेच ते सुचिन्ह होते आणि तुझा भक्त म्हणून असण्याशिवाय दुसरा कोणताही आनंद या त्रिभुवनात नाही. पण त्याहीपेक्षा प्रत्यक्ष तुझे जीवन आणि त्या जीवनातील तुझा मोकळेपणाचा सहज वावर मला अगदी जवळून पहायला मिळाला, तेव्हा मात्र मी आधी चकित व नंतर सावधच झालो. ‘आनंदाने जीवन जगणे’ म्हणजे काय हे मला तुझ्या रूपाने प्रत्यक्ष पहायला मिळाले. तुझे व रूक्मिणीचे संबंध आणि तुझे व बलरामाचे संबंध पाहून मला जेवढे नवल वाटले, तेवढेच मला त्यापासून केवढेतरी शिकायलाही मिळाले. तुमचे सर्वांचे स्वभाव भिन्न भिन्न असूनही तुमच्या संबंधात कोठेच ताणतणाव दिसला नाही. तुझे वागणे तर सर्वांशी एवढया मोकळेपणाचे असते, की तूही काही ताण घेत नाहीस आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे तुझ्यामुळेही कोणाला ताण निर्माण होत नाही. सर्व वातावरणच मुळी खेळीमेळीचे असते. परस्परांच्या वेगळया वेगळया स्वभावाची व वृत्तीची तुम्ही गंमतच अनुभवत असता. परंतु एवढे करूनही तुमचे परस्परांवर अतिशय प्रेम आहे ही गोष्ट अधिक महत्वाची आहे.

हे कृष्णा, बाह्यांगाचा एवढा प्रेमाचा मोकळेपणा असण्यासाठी तो मुळात अंतरातच असावयास हवा हे तर खरेच आहे. तसा तो तुझ्या ठिकाणी आहे आणि तेच तुमच्यातील प्रेमसंबंधाचे मूळ आहे हे मी जाणून आहे. तुझ्या अंतःकरणातील प्रेमस्वरूप अवस्थाच तुझ्या बाह्य जीवनातून प्रगट होत असते आणि सर्व संबंधितांपर्यंत पोहोचत असते. त्या प्रेमाने सर्वच जण तेवढा वेळ तरी निश्चितपणे प्रभावित होतात. अर्थातच ती प्रेमयुक्त अवस्था कायमची राखण्याचा प्रयत्न मात्र ज्याचा त्यानेच करावयास हवा. त्यासाठीच तुझ्या प्रेमाचे, तुझ्या सांगण्याचे आणि त्याहीपेक्षा तुझ्या प्रत्यक्ष जीवनातील अनुभवाचे केवळ नित्य स्मरणच नव्हे, तर ध्यासच हवा. एवढे दिवस मी केवळ तुझ्या रूपाचेच स्मरण करीत असे. त्याने माझ्या मनाला एक प्रकारचे

सुखही वाटत असे खरे. पण प्रत्यक्ष जीवनात मात्र आनंदाचा अनुभव घेणे मला मुळीच जमत नसे. कारण तुझ्या प्रेमाने नित्य युक्त राहणे मला शक्य होत नसे. काहीना काही बाह्य कारणाचे निमित्त होऊन मनाची स्थिती डळमळीत होत असे आणि काही वेळा तर ती पूर्णपणे कोलमडतच असे. ते लक्षात आल्यावर, मग तर मनाची आणखीनच चिडचिड होत असे आणि त्याचा सर्व रागही मग कुटुंबीयांवरतीच निघत असे.

अरे कृष्णा, तसे पाहिले तर तुझ्या बाह्य जीवनाचा व्याप माझ्या जीवनापेक्षा जास्त आहे. पण तुझ्या ठिकाणी त्याचा अजिबात ताप तर दिसत नाहीच, उलट तू अगदी शांत व नित उत्साही असतोस. सर्व करताना दिसतोस खरा, पण तू मात्र नामानिराळाच राहतोस. सर्व गुंत्यात गुंतल्यासारखा दिसतोस, पण तू मात्र पूर्णपणे मोकळाच असतोस. सर्व बाह्यरंगातही त्या त्या वेळेला तू रंगलेला दिसतोस आणि त्यावेळी तू त्या त्या रंगाने शोभूनही दिसतोस. पण तरीही तुझा खरा मूळ रंग मात्र वेगळाच असतो.

अरे कृष्णा, मला खरेच सांग, तुला हे सर्व जमते तरी कसे? त्याचे रहस्य तरी काय बरे? ते मला सांगशील तरी की नाही? कारण माझ्या जीवनात मला मात्र नेमका उलटा अनुभव येत असतो. ज्ञान व बोध मी सर्व जाणून आहे. पण प्रत्यक्ष त्याचा अनुभव काही मला जीवनात घेता येत नाही हे मात्र खरे आहे. तसे बघायला गेले तर तूही सर्व नित्य कर्तव्यकर्मे करताना दिसतोस. पण ती तू एवढया सहजपणे व मोकळेपणाने करत असतोस की तुझ्या दृष्टीने जणू तो एक खेळच आहे. पण तीच कर्तव्यकर्मे जेव्हा मी करायला बघतो, तेव्हा तो एक घोळच होऊन बसतो आणि त्यामुळे मनाची तळमळ मात्र अधिकच वाढते. तेव्हा याच्यावरती निश्चित उपाय काय? तुझ्याशिवाय दुसरा कोण बरे तो मला सांगणार? कारण तुलाच तो माहीत आहे याची मला अगदी खात्री आहे."



सुदामा बोलत असताना त्याच्या बोलण्यातील सर्व भाव त्याच्या मुखावर अगदी स्पष्टपणे दिसत होते. उद्विग्नता, असहाय्यता व अगतिकता हे भाव, ज्यांचा अनुभव तो नित्यच जीवनात घेत असे, ते सर्व भाव त्याच्या ठिकाणी जागे झाल्याचेच ते चिन्ह होते. कृष्ण सुरूवातीला सुदाम्याचे बोलणे ऐकताना त्याच्याकडे पाहून गंमतीने स्मितहास्यच करीत होता. पण सुदाम्याच्या मनाची होणारी तगमग आणि प्रत्यक्ष जीवनात आनंदाचा अनुभव घेण्याची त्याच्या ठिकाणी निर्माण झालेली तळमळ जेव्हा कृष्णाच्या लक्षात आली, तेव्हा मग कृष्णही अगदी गंभीरच झाला. त्याच्या मनात सुदाम्यावरील प्रेमापोटी त्याच्याविषयी दयाच निपजली. कृष्णाने सुदाम्याच्या खांद्यावर आपला हात ठेवून थोपटले आणि त्याचे म्लान झालेले मुख आपल्या हाताने अगदी प्रेमाने कुरवाळले. सुदाम्यालाही कृष्णाच्या प्रेमस्पर्शाने एकदम भरूनच आले. त्याचे अश्रूंनी भरलेले नेत्र शेवटी नाईलाजाने वाहूच लागले आणि तो एकदम कृष्णाच्या कुशीतच शिरून तेथेच विसावला. संसारातील कर्तव्यकर्मे योग्य प्रकारे करण्याच्या प्रयत्नांचा सुदाम्याच्या ठिकाणी दीर्घ काळ साचून राहिलेला सुप्त ताण, एका क्षणात नाहीसा झाला आणि त्याचे मन पूर्णपणे मोकळे होऊन शांत झाले.

कृष्णाने सुदाम्याला तशा स्थितीत थोडा वेळ राहू दिले. सुदाम्याच्या ठिकाणी आलेला भावनेचा आवेग हळूहळू कमी झाला आणि सुदामा भानावर आला. कृष्णापासून दूर होऊ पाहणाऱ्या सुदाम्याला, कृष्णाने प्रेमाने स्वतःच्या जवळ बसवून घेतले. कृष्णाने सुदाम्याचे दोन्ही हात आपल्या हातात धरून ठेवले आणि कृष्ण सुदाम्याशी हळुवार सुरात बोलू लागला.

“अरे सुदाम्या, आता शांत हो बघू. किती तरी काळ तुझ्या मनात हे दुःख दबून राहिले होते, ते आज मोकळे झाले आणि तुझे मन अगदी हलके झाले आहे. आता मी जे काही तुला सांगत आहे ते नीट लक्षपूर्वक ऐक. तसे पहायला गेले तर कर्तव्यकर्मे करणे हे कोणाला म्हणजे कोणालाही चुकलेले नाही, अगदी मलाही नाही. पण कर्तव्यकर्मेच करीत राहणे हेच व एवढेच काही जीवन नाही, तर तो आपल्या जीवनाचा एक भाग आहे. पण तेवढेच

किंवा त्याहीपेक्षा स्वधर्माचरण महत्वाचे आहे. कारण ते स्वतःशी संबंधित आहे, हे जर आपण कायम लक्षात ठेवले तर कर्तव्यकर्माच्या मर्यादा आपल्या लक्षात येतील आणि कर्तव्यकर्माचे रूपांतर आपण मोहामध्ये होऊ देणार नाही. कर्तव्यकर्म हे नातेसंबंधांमुळे आपल्या जवळच्यांच्या बाबतीत असते. पण ते कितीही आपल्या जवळचे असले तरी दुसरेच असतात. प्रथम आपण, मग सर्व जग! आपण आहोत तोपर्यंतच हे जग आहे. आपण गेलो की हे सर्व जग बुडालेच की! आपण ह्या जगातून गेलो आणि जग शिल्लक राहिले, की ते आपले जाणे म्हणजे मृत्यूच होय. परंतु आपण आहोत आणि सर्व जगाचे अस्तित्व आपल्या भानातून हरवले, की तीच आपली मुक्तीची अवस्था होय. अशी मुक्ती प्राप्त करून त्या मुक्त स्थितीत कायमचे रमून राहणे हाच आपला स्वधर्म होय आणि त्याचे प्रत्यक्ष आचरण करून तसा अनुभव घेणे, हेच आपले स्वधर्माचरण होय.

अरे सुदाम्या, खरे तर दुसऱ्याच्या बाबतीतील आपल्या कर्तव्यकर्माला सहजच मर्यादा पडत असतात. एक तर ज्याचे त्याचे प्रारब्ध असते आणि त्यानुसार ज्याला त्याला कर्मफळ मिळून ते भोगावे लागते. दुसरे आणि सर्वात महत्वाचे व मूलभूत म्हणजे, सर्वश्रेष्ठ अशी परमेश्वराची सत्ता आहे. त्यामध्ये नियतीनुसार सर्व गोष्टी घडत असतात. त्यामुळे आपल्या प्रयत्नाला वाव असला तरी मर्यादा असतात आणि आपल्या कर्तृत्वाच्या अहंकारालाही जागाच शिल्लक राहत नाही. त्यामुळेच दुसऱ्यासंबंधीचे आपले कर्तव्यकर्म कधीतरी संपते किंवा आपल्याला ते संपवावे लागते. पण स्वधर्माचरण हे आपल्या स्वतःसाठी असल्यामुळे कधीच संपू शकत नाही किंवा थांबूही शकत नाही. कारण तेच तर आपल्या जीवनाचा आधार आहे. किंबहुना, स्वधर्माचरणामुळेच आपले अस्तित्व आहे. खरे तर, स्वधर्म हेच आपले खरे अस्तित्व आहे.

अरे सुदाम्या, हा स्वधर्म म्हणजेच आत्मधर्म किंवा ईश्वरी धर्म होय आणि याचीच तर ओळख आपल्याला आपले सद्गुरू सांदिपनी यांनी करून

दिलेली आहे, नाही का? त्याचाच ध्यास धरता धरता आपल्याला त्याचा अनुभव येतो आणि अनुभवाचे रूपांतर कायमच्या जाणिवेत होऊन राहते. स्वानुभवाच्या या सहजावस्थेतच स्वानंदाचा अनुभव नित्य होऊन राहतो. त्या आनंदाच्या सहजस्थितीतूनच जेव्हा सर्व बाह्य सृष्टीकडे पाहणे घडते तेव्हा सर्वकडे तोच आनंद भरून राहिला आहे, असेच दृष्टीला येते आणि सर्व सृष्टी ही स्वानंदाचा अनुभव बाह्यांगानेही घेण्यासाठी माध्यमच होऊन राहते. ज्याप्रमाणे सागराचे पाणी उचंबळून कितीही वरती गेले तरी पुन्हा स्वस्थानी अगदी सहजपणे येऊन पावते, अगदी त्याचप्रमाणे अंतःकरणातील स्वानंदाच्या अनुभवाठायी स्फुरलेली आनंदाची उर्मी बाह्यरूपाने प्रगट होते आणि पुन्हा स्वतःच्याच ठायी विलय पावते. म्हणून आनंदाच्या या बाह्यरूपात कितीही वेगवेगळी अंगे प्रगटली, तरी त्यात मनाचे गुंतणे अजिबात घडत नाही आणि कितीही विविध रंग उमटले तरी ते रंग मनाला मुळीच चिकटत नाहीत. मन पुन्हा आपल्या आत्मस्वरूपात रममाण होते आणि आत्मरंगात रंगून राहते. असा हा अंतर्बाह्य खेळ आपल्या या देहाचे अस्तित्व आहे तोपर्यंत सहजपणे चालूच राहतो. हीच तर त्या परमेश्वराची मानवी देहातील लीला आहे. ती लीला ज्याने जाणली त्यालाच या खेळाचा आनंद होतो. एवढेच नव्हे, तर तो हा खेळ खेळून स्वतः आनंद अनुभवतो आणि इतरांनाही आनंदित करण्यास निमित्तमात्र होतो."

स्वानंदाच्या स्थितीतील अंतर्बाह्य अनुभवाच्या खेळाचा आनंद कृष्णाकडून एवढ्या सहजपणे प्रगट होत होता, की त्याचे श्रवण करणारा सुदामा अगदी तल्लीन होऊन कृष्णाकडेच पाहात राहिला होता. कृष्णाची अवस्था पाहूनच सुदाम्याने ओळखले, की ज्या अंतर्बाह्य आनंदाच्या खेळाचे वर्णन कृष्णाच्या मुखातून सहजपणे शब्दरूप होत आहे, तेच तर कृष्णाच्या आंतरिक अवस्थेचे लक्षण आहे. तोच स्वानंदाठायी सहजपणे स्फुरणारा आनंददायी खेळ कृष्णाच्या ठिकाणी आताही घडत आहे आणि त्या खेळात सहभागी व समरस होऊन, त्या खेळाचा आनंद अनुभवण्याची सुवर्णसंधी

सुदाम्याला मोठया भाग्यानेच लाभली आहे, हे सुदाम्याच्या लक्षात आले. त्या आगळ्या वेगळ्या आनंदाच्या अनुभवाने सुदाम्याची सर्व कायाच पुलकित व रोमांचित झाली आणि त्याचे मनही पूर्णपणे अंतर्मुख होऊन स्वतःच्या स्वतःत रममाण झाले. त्या आनंदाच्या तुरीयावस्थेतून स्वतःहून स्वतः बाहेर येणे सुदाम्याला शक्यच झाले नसते.

परंतु कृष्ण हा खरा खेळिया होता. त्यामुळे खेळात वाहून जाऊन खेळाच्या अधीन तो कधीच होत नसे, तर तो खेळ त्याच्या स्वतःच्या पूर्णपणे स्वाधीन असे. कृष्णच त्या खेळाचा सूत्रधार असे आणि त्या खेळाची सर्व सूत्रेही त्याच्याकडूनच अगदी लीलया हलवली जात असत. त्या सूत्राच्या आधाराने कृष्ण अनेकांना अत्यंत प्रेमाने बांधून ठेवीत असे. ज्यांनी स्वतःला त्या कृष्णप्रेमाने बांधून घेतले, तेच त्या कृष्णाचे प्रेमीभक्त होऊन राहिले आणि तेच भक्त कृष्णाच्या खेळात समरस होऊन कृष्णाशी खेळत राहिले. कृष्ण त्या भक्तांना त्याला हवे तसे खेळवीत राहिला आणि त्याचे भक्तही कृष्णाला हवे तसे खेळत राहिले. भक्त त्या खेळाद्वारे त्याचे प्रेम अनुभवीत राहिले, तर कृष्णानेही त्याच खेळाद्वारा स्वानंद उपभोगला. अशा तऱ्हेने उभयता खेळत खेळत आणि परस्परांना खेळवीत खेळवीत एकमेकांच्या हृदयात कायमचे स्थान घेते झाले. कृष्णाच्या अंतःकरणात त्याचे भक्त पूर्णपणे विलीन झाले. पण भक्तांच्या अंतःकरणात स्थानापन्न झालेल्या कृष्णाचे खेळणे तेथेही चालूच राहिले. आपल्या अंतःकरणातील स्वानुभवाच्या कृष्णाशी, मग त्याच्या भक्तांनीही खेळ मांडला आणि त्यांना हवे तसे ते त्या कृष्णाशी खेळत राहिले आणि त्याला खेळवीत राहिले.

आता मात्र कृष्णानेच मांडलेल्या आनंददायी खेळाची सर्व सूत्रे कृष्णाच्याच हातात होती आणि सुदामा त्या सूत्राने कृष्णाशी पूर्णपणे बांधला गेला होता. म्हणूनच सुदामा संसारभावापासून पूर्ण मुक्त होऊन, एकीएक कृष्णप्रेमानेच युक्त होऊन राहिला होता. देहभान पूर्णपणे हरवलेल्या सुदाम्याजवळ कृष्ण गेला आणि त्याने सुदाम्याच्या मस्तकावर अत्यंत प्रेमाने हात ठेवून त्याला थोपटले. सुदाम्याने आपले मिटलेले नेत्र हळूच उघडले.

त्याच्या अश्रुपूर्ण दृष्टीला कृष्णाची प्रेममूर्ती दिसली मात्र, सुदामा लागलीच उठून उभा राहिला आणि न राहवून त्याने कृष्णाला दृढ प्रेमालिंगन दिले. अंतरातील एकरूपता बाह्यांगानेही अनुभवताना उभयतांचा आनंद द्विगुणीत नव्हे, तर शतगुणितच होऊन राहिला होता. परमानंदाच्या परमसुखाचा अनुभव घेताना कृष्ण व सुदामा हे उभयता पूर्णपणे तादात्म्य पावले होते. काया, वाचा, मन व बुद्धी यांच्यासकट आणि त्यांच्याही परता असलेला अद्‌भुत आनंदाचा अनुभव घेणे, ही मानव देहातील अत्यंत दुर्मिळ असलेली अवस्था कृष्ण व सुदामा अगदी सहजपणे अनुभवत होते. थोडयावेळाने त्याच व तेवढयाच सहजतेने देह व मन यांना प्रेमपूर्ण अवस्थेतच ठेवून, सुखाचा अनुभव ओसरू लागला. पण अंतःकरणातील आनंदाची सहजस्थिती मात्र कायमच राहिली होती. त्यामुळे कृष्ण व सुदामा अगदी सहजतेने देहाने एकमेकांपासून दूर सरले पण त्यांच्या मुखावरील एकरूपतेच्या अनुभवाचा तृप्तीभाव मात्र ओसंडूनच वाहत होता. त्याच तृप्तभावाने युक्त होऊन सुदामा कृष्णाशी भावपूर्ण शब्दांनी बोलू लागला.

"अरे कृष्णा, अरे माझ्या देवा, आज आता या क्षणाला मी अनुभवलेली आनंदाची पूर्णावस्था खरोखरीच शब्दातीत व अद्‌भुतच आहे. तुझ्या ठिकाणी नित्य असलेली ही आनंदाच्या अनुभवाची अवस्था तुझ्या सहवासात लाभलेल्या अंगसंगाने, मला थोडावेळ का होईना पण अनुभवावयास मिळाली. हीच तर तुझी माझ्यावरील अनन्यसाधारण कृपा होय. माझ्या परमभाग्यानेच हे फळ मला मिळाले याची मला पूर्ण खात्री आहे. तुझ्या अंतःकरणातील आनंदाचे चैतन्य हे तुझ्या अंगाअंगातून खेळत असते आणि रोमरोमातून प्रगट होत असते. म्हणूनच तुझ्या सहवासात लाभलेल्या अंगसंगाने तुझ्या अंतर्यामीच्या आनंदाच्या अवस्थेचा स्पर्श माझ्या देहाला व मनाला झाला. तुझ्या प्रेमाने युक्त असलेल्या आणि तुझ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी व्याकूळ असलेल्या माझ्या मनाला, तेवढया स्पर्शाचेही निमित्त पुरेसे होते. त्यामुळे तुझे प्रेम माझ्या मनात प्रवेश करून सहजपणे

माझ्याही अंतःकरणाचा ठाव घेते झाले आणि त्या ठिकाणी कायमचे स्थित झाले.

तुझ्यासारखी नित्य आनंदाची स्थिती माझ्या अंतःकरणाची नाही. कारण स्वतःचे प्रेम स्वतःच अनुभवून, स्वप्रेमातच रमण्याची तुझ्यासारखी वृत्ती माझी अजून झालेली नाही. परंतु तुझे प्रेम जरी माझ्या ठायी स्थिर झाले तरी तेही माझ्यासाठी पुष्कळ झाले. कारण त्या तुझ्या प्रेमातूनच माझ्या ठिकाणी तुझा सततचा ध्यास लागू शकेल आणि कृष्णा, तू म्हणजे आता माझ्यासाठी केवळ तुझे बाह्यरूप वा बाह्यदर्शन नाही. कारण तेवढाच तू नाहीस, हे मला आता पूर्णपणे कळून चुकले आहे. तू म्हणजे तुझे प्रेमस्वरूप अंतःकरण, तू म्हणजे तुझी आनंदी वृत्ती आणि तू म्हणजे तुझ्या जीवनाद्वारे तू अनुभवत असलेला तुझा स्वानंद हेच खरे आहे. खरे तर, हेच एकमेव सत्य आहे आणि त्याचाच अनुभव घेण्यात मानवी जन्माचे सार्थक आहे.

हे कृष्णा, तसे पाहिले तर तू म्हणतोस त्याप्रमाणे, आपल्या सद्‌गुरूंनी आपल्याला सर्व जीवनाचे मूळ असलेले आत्मज्ञान सांगितले आहे आणि मलाही ते थोडेफार कळले आहे, पण तेही केवळ शब्दांनीच. त्याचे प्रत्यक्ष फळ म्हणजे जो स्वानंदाचा अनुभव, तो मात्र ज्याने त्यानेच घ्यायचा आहे आणि तोच घेणे माझ्यासाठी बाकी राहिलेले आहे. तुला एक गोष्ट मी अगदी प्रामाणिकपणे सांगतो की महात्मा सांदिपनी यांच्या मुखातून ज्ञान श्रवण करताना त्याचे श्रेष्ठत्व मला निश्चितच जाणवत असे. परंतु त्याच वेळी मनात असा विचार येत असे, की या सत्य ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मला जीवनात घेता येणे शक्य होईल का? तर मनाचे त्यावर उत्तर असे, की त्याप्रमाणे जीवन जगणे आपल्याला कठीणच नव्हे तर जवळ जवळ अशक्यच आहे.

माझ्या मनातील ही शंका व अडचण सांदिपनींनी ओळखली आणि त्यावरील मला जमण्यासारखा सोपा उपाय सांगितला. तो म्हणजे कृष्णा, तुझीच भक्ती करण्याचा! तुझ्या भक्तीनेच त्यांनी सांगितलेल्या ज्ञानाचा





अनुभव घेणे मला शक्य होईल, असे सांदिपनींनी अगदी खात्रीपूर्वक सांगितले. मलाही त्या वेळेस वाटले की मला अगदी सुलभ मार्ग मिळाला आहे. कारण तुझे प्रेम मी प्रत्यक्ष अनुभवले होते आणि माझ्याही ठिकाणी तुझ्याविषयी प्रेम आहे असे मलाही जाणवत होते. म्हणूनच सांदिपनींच्या वचनावरती पूर्णपणे श्रद्धा ठेवून आणि स्वतःविषयीचा विश्वास धरून मी मोठ्या खुशीत व उत्साहात घरी परतलो होतो.

हे कृष्णा, परंतु प्रत्यक्ष संसारात परत आल्यावरती मात्र मला वेगळाच अनुभव येऊ लागला. माझा विवाह झाला. मला अपत्यप्राप्तीही झाली आणि माझे कर्तव्यकर्म वाढतच राहिले. ते संपता म्हणून संपेचना आणि संपण्याची काही चिन्हेही दिसेनात. एकीकडे माझ्या ठिकाणी तुझ्या रूपाचे व तुझ्या अनुभवलेल्या प्रेमाचे स्मरण होते, परंतु कर्तव्याच्या ओझ्याखाली दबलेल्या मनाच्या ठिकाणी, त्या स्मरणाला विस्मरणाची बाधा वारंवार होऊ लागली. त्यामुळे मनाची शांतताही पूर्णपणे हरवली. बाह्यांगाने मी नित्य उपासना व सांदिपनींनी दिलेली मंत्रादिक साधनेही करीतच होतो. परंतु तरीही मनाच्या ठायीचे मोह, आसक्ती, राग इत्यादी विकार पुन्हा पुन्हा बळावतच होते. कारण मनातील वासनेचे मूळ कायमच होते. त्यामुळे माझ्या मनाची उद्विग्नता अधिकच वाढत असे आणि आपल्याकडून बाह्यकर्माचे केवळ ढोंगच घडत आहे, या जाणीवेने मनातून माझी मलाच लाज वाटत असे. मनाचा होणारा असा कोंडमारा मला असह्य होऊ लागला आणि माझ्या एकदम लक्षात आले की कृष्णा, प्रत्यक्ष तुझा सहवास झाल्याशिवाय तुझी भक्ती घडणे शक्यच नाही. त्याशिवाय माझे मन मोकळे होणार नाही आणि मोकळे झाल्याशिवाय निर्मळही होणार नाही.

हे कृष्णा, मग मात्र तुझ्या भेटीचाच एकमेव ध्यास लागला. मनाच्या ठिकाणी आर्तता व तुझ्या भेटीसाठीची व्याकुळता वाढतच राहिली. कुठल्याही सांसारिक गोष्टीत तर मन लागेचना, परंतु नित्य उपासना, जपजाप्य, पूजाअर्चा इत्यादी बाह्य साधनातही मन रमेनासे झाले. शेवटी

माझी तपश्चर्या फळाला आली. तुझे आगमन माझ्या नगराच्या जवळ येथे द्वारकेला झाल्याची बातमी माझ्या कानावर आली आणि माझ्या मनाची झालेली कोंडी फुटण्याचा मार्ग सापडला. एक दिवस असाच मनाचा निश्चय करून उठलो आणि तडक तुझ्या भेटीस धावतच निघालो. प्रत्यक्ष तुझ्या भेटीत आणि सहवासात माझे मन एकदम मोकळे झाले. तुझे प्रत्यक्ष जीवन थोडेफारच, पण अगदी जवळून पहावयास मिळाले आणि माझ्या मनाचा गुंता हळूहळू सुटू लागला. अंतःकरणात कशाविषयीही व कोणाविषयीही मोह नाही, पण संसारात बाह्यांगाने वावरताना मात्र नेहमी मोकळी वृत्ती आहे, कोणाविषयीही राग नाही, तर सर्वांविषयी दया आहे आणि कोणाविषयीही लोभ नाही, पण सर्वांविषयी आपलेपणा आहे, अशी तुझी सहजावस्था पाहिली आणि माझ्या लक्षात आले की हीच तुझ्या ईश्वरी अनुभवाची लक्षणे आहेत. त्या स्वानुभवातूनच निर्माण झालेल्या आत्मविश्वासापोटीच एवढा मोकळेपणा तुझ्याठायी आलेला आहे, हे निश्चित.

हे कृष्णा, तुझे रूक्मिणीदेवी व बलरामदादा यांच्याशी असलेले संबंध मी पाहिले आणि आधी मी चकितच झालो. पण नंतर मला तुझे अतोनात कौतुकच वाटले. कारण तुझ्या वागण्या बोलण्यात ना कोठे ताण होता, ना कोठे मुद्दामहून चांगुलपणा दाखवण्याचा प्रयत्न होता. वेगळया वेगळया मताला संधी होती आणि वेळप्रसंगी मतभेदालाही वाव होता. परंतु तरीही तुमच्या संबंधातील मोकळेपणा जराही कमी झालेला नव्हता याचेच मला मोठे अप्रूप वाटून राहिलेले आहे. मला याचे अनुकरण तर निश्चितच करता येणार नाही. पण अशी अंतःकरणाची अवस्था माझीही असली पाहिजे असे मात्र मला अगदी मनापासून वाटत आहे. कारण तेच आनंदाने जीवन जगण्याचे मुख्य गमक आहे. पण ते साधावे कसे हाच मोठा प्रश्न माझ्या मनाला पडलेला आहे.

मला खात्री आहे की प्रत्यक्ष तुझ्या सहवासात राहता राहताच माझ्याही ठिकाणी तुझी ही वृत्ती हळूहळू उतरत राहील आणि ती माझीही सहजवृत्ती होऊन राहील. त्यासाठीच मी आणखीनही काही काळ येथे



तुझ्याजवळ राहणार आहे. तुझा जास्तीत जास्त सहवास करणार आहे. तुझ्याशी तुझ्या जीवनाविषयी व तुझ्या अनुभवाविषयी भरपूर मोकळेपणाने बोलून संवाद साधणार आहे. तुला जवळून निरखून पाहणार आहे आणि मुख्य म्हणजे तुझ्या प्रत्यक्ष प्रेमाचा यथेच्छ अनुभव घेणार आहे. कृष्णा, त्यासाठी तुझी मला परवानगी आहे ना? का तू माझी लगेचच माझ्या घरी रवानगी करणार आहेस? तुझा बेत काय आहे? तुझ्या मनात काय आहे ते मला अगदी खरे खरे सांग हं! कारण तू जे ठरवशील व करशील त्यातच माझे खरे हित आहे याचा मला अगदी पूर्ण विश्वास आहे."

. . .

सुदाम्याच्या बोलण्यावर कृष्ण प्रसन्नतेने हसला आणि म्हणाला, "अरे मित्रा, सुदाम्या, हे काय तुझे बोलणे झाले? अरे, येथे राहण्याचा तुझा तर प्रेमाचा हक्कच आहे. त्यासाठी परवानगीची मुळी जरूरीच नाही आणि अजून तू माझे सर्व जीवन कोठे पाहिले आहेस? जे काही तू पाहिलेस तो तर सागरातील पाण्याचा जणू एक थेंबच होता. मुख्य म्हणजे मलाही तुझ्याशी पुष्कळ बोलायचे आहे. तुझे प्रत्यक्ष जीवन काय व कसे आहे? त्यात तुझी काय दुःखे व अडचणी आहेत? आणि मुख्य म्हणजे मी तुला काय व कशी मदत करू शकतो? हे सर्व मला तुला विचारायचे आहे. त्यासाठी माझ्याकडून तुझ्या काय अपेक्षा आहेत हेही मला जाणून घ्यायचे आहे. तेव्हा तू घरी परत जाण्याची मुळीच घाई करू नकोस. तो विचारही मनातून पूर्णपणे काढून टाक. आता माझ्या परवानगीचा प्रश्नच नाही, हे जरी खरे असले तरी माझ्या पत्नीची परवानगी घेणे मात्र आवश्यक आहे हो! कारण माझ्या संसारात तीच मुख्य आहे हे लक्षात ठेव. तिच्या संमतीशिवाय येथे काहीच घडू शकत नाही बरे!"

कृष्णाने आपल्या बोलण्याचा शेवट समोरून येणाऱ्या रूक्मिणीकडे मिश्किलतेने पाहत व हसत हसत केला. कृष्णाने केलेली गंमत सुदाम्याच्याही

लक्षात आली आणि त्यानेही मोकळेपणाने हसून कृष्णाला साथ दिली. रूक्मिणीनेही कृष्णाचे बोलणे ऐकले होतेच. तीही सुस्मित चेहऱ्याने कृष्णाच्या गंमतीमध्ये सामील झाली आणि सुदाम्याकडे पाहून हसत हसत म्हणाली,

“अहो सुदामदेवा, या कृष्णाचे हे बोलणे तुम्हाला खरे वाटते की काय? ते तुम्ही काही तेवढेसे गंभीरपणाने घेऊ नका. दुसऱ्यांना मुख्य करून काम मात्र स्वतःचे कसे साधून घ्यायचे, ही कला कृष्णाला अगदी सहजगत्या अवगत आहे. राज्यकारभारात बलरामदादांना मोठेपणा देऊन या कृष्णाने त्यांना राज्य सिंहासनावर बसवले आहे खरे, पण सर्व राज्यकारभार मात्र हा कृष्ण स्वतःच्या मनाप्रमाणेच करीत असतो. अर्थात याची जाणीव बलरामदादांसह सर्वांनाच असल्यामुळे त्यांच्यासह कोणीही या बाह्य मोठेपणाला भुलत नाही किंवा तो मोठेपणा तेवढया गंभीरतेने घेतही नाही. एवढेच नव्हे, तर कोणालाही कृष्णाचा राग तर येत नाहीच, उलट सर्वांनाच कृष्णाच्या या स्वभावाची गंमतच वाटते आणि त्यामागील कृष्णाचा हेतू जाणत असल्यामुळे सर्वांनाच त्याचा आनंदही होत असतो.

इथेही संसारात मला ‘मुख्य’ पद देऊन कृष्णाने मोठी चतुराई दाखवली आहे. त्या निमित्ताने संसाराची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे आणि कृष्ण स्वतः मात्र अगदी मोकळा राहिलेला आहे. अहो, आमच्या आत्यंतिक प्रेमसंबंधातून जन्मलेल्या मुलांकडेसुद्धा लक्ष द्यायला या कृष्णाला वेळ नाही. त्यांची पूर्ण देखभाल व काळजी तर मलाच घ्यावी लागते. राज्यकारभाराच्या निमित्ताने कृष्णाची स्वारी तर नेहमी बाहेरच असते. महालात परत यायला तर बऱ्याच वेळा रात्रीचा शेवटचा प्रहरही उलटून गेलेला असतो.

काही काही वेळेला तर दुसऱ्यांना मदत करण्याच्या निमित्ताने कृष्णाचे अनेक दिवस बाहेरच राहणेही घडते. केव्हा तरी मग सर्व गोष्टी आटोपल्यावर जेव्हा कृष्णाला विश्रांतीची जरूरी भासते, तेव्हा मग स्वारीची पावले

आमच्या या महालाकडे आणि तीही मोठ्या नाईलाजास्तव वळतात. आल्यावरसुद्धा त्याला तहान भुकेचीही आठवण नसते. 'आता मी अगदी दमलोय. मला उगाच त्रास देऊ नकोस. मला नीट विश्रांती घेऊ दे.' असे म्हणता म्हणताच कृष्ण जो मग मंचकावर पहुडतो तो उठायलाच मागत नाही. मोठ्या मिनतवारीने कृष्णाला उठवून मला त्याला काहीतरी सेवन करण्याचा आग्रह करावा लागतो. अहो, वेळप्रसंगी कृष्णाला मला भरवायलाही लागते. काय करणार? तो तसा हट्टच धरतो, ऐकतच नाही मुळी. त्यानंतर मग अगदी हक्काने माझ्याकडून स्वतःचे मस्तक चेपून घेणार, पाय दाबून घेणार आणि त्यामध्ये कृष्ण केव्हा निद्रेच्या स्वाधीन होतो ते केवळ त्या निद्रादेवीलाच माहीत. त्या वेळेस कृष्णाला जणू माझ्यापेक्षा ती निद्रादेवीच अधिक प्रिय असते. अगदी खुशाल त्या निद्रादेवीच्या कुशीत स्वस्थपणे व मस्तपणे हा कृष्ण विसावतो. त्यावेळचे त्याच्या मुखावरचे लहान मुलासारखे असलेले निरागस भाव मात्र अगदी पाहण्यासारखे असतात आणि मीही मग ते भाव पहात पहातच कृष्णाच्या कुशीत विसावते.

अहो सुदामदेवा, एवढे होऊनही कहर म्हणजे हा कृष्ण जेव्हा दुसऱ्या दिवशी त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे प्रातःकाळी अगदी लवकर उठतो, तेव्हा त्याला आदल्या रात्रीचे काहीच आठवत नसावे असेच त्याच्या मुखावरून व त्याच्या वागण्या बोलण्यातून वाटते. कारण उठल्याबरोबर पुन्हा याची धावपळ सुरू होतेच. एकीकडे लगबगीने आपले प्रातर्विधी हा कृष्ण आटपीत असतो आणि दुसरीकडे मला एकेक हुकूमावरती हुकूम सोडत असतो. 'रूक्मिणी मला मुखमार्जनासाठी गरम पाणी दे, माझ्या स्नानासाठी मला पाणी दे, रूक्मिणी, पण ते पाणी जास्त गरमही नको आणि जास्त थंडही नको, अगदी सोमळ हवे. रूक्मिणी, मला नवीन पीतांबर व नवीन शेला दे बघू. रूक्मिणी, माझे केस जरा नीट कर बघू. रूक्मिणी, मला गरम दूध दे. रूक्मिणी, मला काहीतरी फराळाला दे बघू आणि लवकर दे. मला उशीर होतोय. आज बरीच कामे आहेत.' असा कृष्णाचा सारखा 'रूक्मिणी,

रूक्मिणी' जपच चालू असतो. प्रत्येक वाक्याची सुरूवात 'रूक्मिणी' या शब्दाने होत असते आणि प्रत्येक वाक्याचा शेवट 'कर, दे, आण' अशा आज्ञावाचक शब्दांनी होत असतो. एवढे करूनही कुठलीही गोष्ट या कृष्णाच्या मनास येत नाही, ती नाहीच.

म्हणूनच सुदामदेवा, जेव्हा कृष्ण मला 'मुख्य' म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ 'मी त्याची मुख्य दासी आहे' असाच असतो. कृष्णाला तोच अर्थ अभिप्रेत असतो आणि काय सांगू, माझाही तोच भाव असतो. अहो, या कृष्णाचा कायमचा दास होऊन राहायला मिळणे यापेक्षा दुसरे भाग्य काय असेल बरे? त्याचे सख्यत्व तो आपल्याला प्रेमाने आपणहूनच देतो. पण आपण मात्र त्याचे दास राहूनच नित्य त्याचीच सेवा करावयास हवी. त्याच्यातच आपले हित आहे. बाह्यांगाने व मनानेही त्याची जवळीकता साधण्याची तीच तर आपल्याला संधी असते.

या सेवाभावामुळेच आपल्या ठायीचे स्वभावाचे दोष तर नाहीसे होतातच, पण त्याचबरोबर आपल्या गुणांचेही चीज होते. एवढेच नव्हे, तर त्या गुणांचा आपल्या ठायी असलेला सूक्ष्म अहंकारही लयाला जातो आणि हीच सर्वात महत्वाची गोष्ट आहे. कारण आपल्या दोषांमुळे जसे आपण कृष्णापासून दूर जातो, तसेच आपल्या अहंकारामुळे आपल्याला या कृष्णाच्या माहात्म्याचे विस्मरण होते. आपल्या दृष्टीला कृष्ण गुणदोषांनी युक्त असलेला असा केवळ एक सामान्य मनुष्यच दिसतो. आपल्या दृष्टीदोषांमुळे मग आपल्याला कृष्णाचे अंतःकरणच दिसेनासे होते. त्याच्या अंतःकरणातील ईश्वरी प्रेमस्वरूप अवस्था आपल्याला जाणवेनाशी होते. त्यामुळे आपणच कृष्णाच्या शुद्ध प्रेमाला मुकतो आणि आपल्या ठिकाणचा कृष्णाविषयीचा भक्तिभावही झाकोळला जातो. या सर्वांची परिणती आपला आनंद आपणच गमावण्यात होते. एकदा का मग उदासीनतेने व नैराश्याने आपल्या मनाला ग्रासले, की त्यातून स्वतःहून सुटणे आपल्यालाही शक्यच होत नाही.





आपल्या मनाला लागलेले हे ग्रहण केवळ कृष्णाच्या कृपेमुळेच सुटू शकते. कृष्णाचे आपल्यावरील प्रेम मात्र कायमच असते, कारण त्याचे अंतःकरण हे प्रेमस्वरूपच आहे. पण त्याच्या आपल्यावरील प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी कृष्ण ते प्रेम प्रगट करतो, ही मात्र त्याची आपल्यावरील खरीच कृपा आहे. त्या कृपेचाच लाभ आपल्याला होतो. त्याच्या आपल्यावरील प्रेमाचा अनुभव घेता घेता आपल्याही ठिकाणी कृष्णावरील प्रेम हळू हळू जागे होते आणि आपल्याला कृष्णाचे माहात्म्यही पुन्हा जाणवू लागते. आपल्या 'मी'पणाच्या अहंकाराची आपल्यालाच लाज व घृणा वाटू लागते आणि आपण पुन्हा कृष्णाच्याच चरणी शरण होतो."

बोलता बोलता रूक्मिणीचे अंतःकरण भरून आले आणि ती एकदम भावपूर्ण झाली. तशाच अवस्थेत ती अगदी सहजपणे कृष्णाच्या जवळ आली. कृष्णाच्या चरणांना स्पर्श करण्यासाठी रूक्मिणी वाकली असता, कृष्णाने पटकन तिचे दोन्ही हात धरून तिला उठवले आणि प्रेमाने तिला आपल्या जवळ घेऊन आलिंगन दिले. कृष्ण व रूक्मिणी यांचे ते प्रेमानंदाचे मीलन पाहून सुदाम्याचेही अंतःकरण भरून आले आणि त्याचेही नेत्र पाणावले. रूक्मिणीच्या आधीच्या बोलण्याने व नंतरच्या कृतीने आश्चर्यचकित झालेला सुदामा स्वतःशीच विचार करू लागला.

"अरे, आधी कृष्णाची गंमत करून विनोदाने बोलणाऱ्या या रूक्मिणीदेवी अशा एकदम गंभीर व भावपूर्ण कशा काय झाल्या बरे? खरे तर, आधी कृष्ण माझ्याशी अतिशय गंभीरतेने बोलत असताना रूक्मिणीदेवी आल्याबरोबर एकदम गंमतीने बोलू लागला. तेच गंमतीचे सूत्र पुढे घेऊन रूक्मिणीदेवी बोलू लागल्या आणि त्याही पुन्हा एकदम गंभीरच झाल्या की! मग यातील खरे काय? गंभीरता की गंमत? खरेच या रूक्मिणीदेवींची तर धन्यच आहे. कृष्णाच्या बदलत्या वृत्तीला रूक्मिणीदेवी अगदी सहजपणे अनुरूप होतात आणि कृष्णाच्या खेळात समरस होऊन त्याच्याशी अगदी बरोबरीने खेळतात. त्यामुळेच त्या कृष्णाच्या प्रेमाचा पूर्ण अनुभव घेतात आणि कृष्णालाही त्यांच्या प्रेमाचा पूर्ण अनुभव घेऊ देतात.

या प्रेमाच्या मोकळेपणामुळेच कृष्ण व रूक्मिणी यांच्या नात्यामध्ये केव्हाच जराही ताणतणाव निर्माण होतच नाही. खरे तर, काही वेळेला तशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते. पण तरीही प्रेमाच्या मोकळेपणामुळे सर्वांची परिणती आनंदाच्या अनुभवामध्येच होते आणि हेच महत्वाचे आहे. पण याचे सर्व श्रेय मी तरी रूक्मिणीदेवींनाच देईन. कारण कृष्णाशी जुळवून घेऊन मेळ जमवण्याचा त्यांचा भाव व स्वभाव हाच त्याला कारणीभूत आहे. म्हणूनच तर कृष्णाचाही प्रेमखेळ रंगत राहतो. कृष्णाची आनंदाची वृत्ती हे तर निश्चितच त्याच्या खेळाचे मूळ कारण आहे. परंतु रूक्मिणीदेवींच्या कृष्णाठायी असलेल्या भक्तिभावामुळेच कृष्णाच्या प्रेमखेळाची रंगत वाढत राहते, हे मात्र नक्की!

रूक्मिणीदेवींच्या या भक्तिभावाचे मूळ जसे त्यांच्या ठायीच्या कृष्णावरील व्यक्तिगत प्रेमात आहे, तेवढेच त्यांच्या ठायी असलेल्या कृष्णाच्या माहात्म्याच्या जाणिवेत आहे. म्हणूनच कृष्णाचे प्रेम बाह्यांगाने अनुभवताना रूक्मिणीदेवी अतिशय मोकळेपणाने खेळून ते अनुभवतात आणि तेव्हा त्या प्रेमातून हलका फुलका विनोद व गंमत सहजगत्या निर्माण होते. त्यात कृत्रिमतेचा जराही लवलेश नसतो, तर त्यात अत्यंत निरागसता व निर्मळता असते. परंतु त्याच रूक्मिणीदेवी कृष्णाच्या माहात्म्याच्या भावाने युक्त होतात तेव्हा मात्र त्या एकदम भावविभोर होतात. ते माहात्म्य त्यांच्या ठिकाणी अत्यंत सखोल असल्यामुळे मग त्या अतिशय गंभीरही होतात. तेव्हा कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव त्याच्या भक्तांना गंभीर करते आणि कृष्णाच्या प्रेमाचा अनुभव हा त्याच्या भक्तांना मोकळा व खेळकर करतो हेच खरे आहे. कृष्णाच्या भक्तीचे हेच तर खरे लक्षण आहे. त्यामुळेच कृष्णाचे प्रेम अनुभवताना त्याचे माहात्म्यच अधिक जाणवेल आणि कृष्णाचे माहात्म्य यथार्थतेने जाणताना त्याचे प्रेमच अधिक अनुभवता येईल.”

अशा तऱ्हेने स्वतःच्याच ठायी विचारमग्न असलेला सुदामा कृष्णाविषयाच्या विचारात एवढा बुडाला होता, की तो तर अगदी कृष्णमयच होऊन राहिला होता. कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव





सुदाम्याच्या अंतःकरणात अगदी सखोल अशी जागी झाली होती आणि त्याचे मनही कृष्णप्रेमात पूर्णपणे रंगून गेले होते. कृष्ण व रूक्मिणी यांच्या अस्तित्वाचे भानही सुदामा पूर्णपणे विसरून गेला होता. परंतु कृष्णाच्या ठायी मात्र सर्वांचे भान अगदी व्यवस्थित होते. त्यामुळेच रूक्मिणीच्या भक्तिभावाचा स्वीकार करून आनंदित झालेला कृष्ण सुदाम्याकडेही तेवढयाच प्रेमाने पाहात होता. सुदाम्याची मानसिक अवस्था कृष्णाने जाणली. काही काळ कृष्णाने मुद्दामहूनच जाऊ दिला आणि थोडया वेळाने तो आपणहून सुदाम्याच्या अगदी जवळ येऊन उभा राहिला. कृष्णाने सुदाम्याच्या मस्तकावर आपला हात ठेवून त्याला हलकेच थोपटले असता, कृष्णाच्या प्रेमळ स्पर्शाने सुदामा भानावर आला. सन्मुख असलेल्या कृष्णाला पाहून सुदाम्याने आपले दोन्ही हात जोडून कृष्णाला वंदन केले आणि म्हणाला.

“कृष्णा, ही सारी थोरवी एकीएक तुझीच आहे. तुझ्याच भक्तीने आनंदाचा अनुभव येतो आणि त्या आनंदानेच जीवन जगले जाते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच रूक्मिणीदेवी होय! तुझ्या माहात्म्याची पूर्ण जाणीव त्यांच्या अंतःकरणात अगदी सखोलपणाने आहे आणि त्याचबरोबर तुझ्या सहवासात तुझ्या प्रेमाचा अनुभव घेण्याचा पुरेपूर मोकळेपणाही आहे. एक गोष्ट मात्र मला निश्चितपणे जाणवते की जो तुझ्या सहवासात तुझ्याशी प्रेमाच्या मोकळेपणाने राहू शकतो, तो दुसऱ्या कोणाच्याही सहवासात मोकळा मोकळाच असणार. त्याला दुसऱ्याच्या स्वभावाची कधीच अडचण वाटणार नाही आणि बाह्यांगाची कोणतीही परिस्थिती त्याच्या मोकळेपणाला आडकाठी करूच शकणार नाही. अर्थात स्वतः जरी तो पूर्ण मोकळा असला तरी दुसऱ्याशी वागताना व बोलताना मात्र तो दुसऱ्याचा स्वभाव जाणून विवेकानेच वागणार व बोलणार. आपला मोकळेपणा दुसऱ्यावर जबरदस्तीने तो कधीच लादणार नाही. पण दुसऱ्याच्या मनाला मोकळे करण्याचा प्रयत्नही त्याच्याकडून तेवढयाच सहजतेने घडत राहणार हेही नक्कीच.

तेव्हा तुझ्या माहात्म्याची जाणीव अंतःकरणात सखोलतेने ठेवून सर्वांशी, सर्व परिस्थितीत मोकळेपणाने वागण्याचा प्रेमाचा मोकळेपणा आपल्या स्वतःच्या मनात ठेवायचा हेच ते वर्म आहे. तुझ्या भक्तीनेच ते वर्म मला आत्मसात होईल याचा मला आत्मविश्वास आहे. कारण तुझ्या भक्तीनेच मला तसा ध्यास लागेल आणि त्या ध्यासानेच मला तसा अनुभवही येईल. त्यासाठीच माझी येथे आणखी काही दिवस राहण्याची इच्छा आहे. म्हणजे मग मला तुझे व रूक्मिणीदेवी यांचे सहजीवन अगदी जवळून पाहता येईल व त्यात सहभागीही होता येईल. आता त्यासाठी मला कोणी परवानगी द्यावी असाच व एवढाच जर किरकोळ प्रश्न असेल तर कृष्णा, तू एकच गोष्ट कर आणि ती म्हणजे मला तशी परवानगी देण्याची रूक्मिणीदेवींना आज्ञा कर. म्हणजे माझे काम अगदी सहजपणे होऊन राहील.”

असे म्हणून सुदामा अत्यंत मोकळेपणाने हसला आणि त्याला कृष्ण व रूक्मिणी यांनीही तेवढयाच मोकळेपणाने हसून साथ दिली.

म्हणता म्हणता संध्याकाळची वेळ केव्हा टळून गेली हे कोणाच्याही लक्षात आले नाही. पण अचानक कृष्णाच्या महालातील सर्व दीप उजळले आणि सर्वत्र मंगल प्रकाश पसरून राहिला. त्या तेजोमय व पवित्र वातावरणाने सुदामा एकदम भावूक झाला आणि त्याने उठून कृष्णाच्या चरणांना स्पर्श करून वंदन केले. कृष्णानेही सुदाम्याच्या मस्तकावर थोपटून त्याच्या भावाचा स्वीकार केला. कृष्णाने प्रसन्न मुद्रेने सुदाम्याचा हात आपल्या हातात घेतला आणि सुदाम्याला घेऊन त्याच्या महालाच्या बाहेर आला. त्यांच्या जोडीकडे कौतुकाने पाहात रूक्मिणीने मंदस्मित केले आणि भोजनाची व्यवस्था करण्यासाठी तीही लगबगीने महालाच्या बाहेर पडली.

सुदाम्याचा हात धरलेला कृष्ण, त्याला घेऊन मंद पावलांनी चालत चालत राजवाड्याबाहेरील उपवनात आला. शांत परिसरात उपवनातील नानाविध वृक्षही स्तब्ध झालेले होते. अनेक प्रकारच्या फुलाफळांच्या सुवासाने सर्वच वातावरण सुगंधित झालेले होते. त्या उपवनातून सर्व द्वारका नगरीच दृष्टीक्षेपात येत होती. सर्वत्र दिव्यांचा प्रकाश चमचमत होता. दिवसा सूर्याच्या तेजस्वी प्रकाशात तेजाळून निघणारे सुवर्णद्वारकेचे सौंदर्य रात्रीच्या

मंद प्रकाशातही अधिकच खुलत होते. अशा वातावरणात एका वेगळ्याच सुखाचा अनुभव घेणारे कृष्ण व सुदामा हे उभयता एकमेकांशी काहीही न बोलता त्या उपवनात अगदी सहजतेने बराच वेळ विहार करीत होते. त्यावेळी व त्याक्षणी सर्व सुखाची परमावधी झाल्याचाच एकमेव अनुभव सुदामा घेत होता. सर्व परिसर तर अत्यंत सुखमय होताच, परंतु त्या सर्व सुखाच्याही पलीकडे असलेला परमसुखाचा ठेवाच असा कृष्णरूपातील परमानंद हा सुदाम्याच्या हातात प्रत्यक्ष होता आणि तेच त्या सुदाम्याचे परमभाग्य होते.

रात्री सुदाम्याला आपल्या पंगतीला घेऊन कृष्ण भोजनास बसला. रूक्मिणीने स्वतः जातीने लक्ष घालून अनेक उत्तमोत्तम असे स्वादिष्ट व रूचकर पदार्थ बनवले होते. रूक्मिणी आग्रह करकरून स्वतःच्या हाताने कृष्ण व सुदामा या उभयतांना वाढीत असता कृष्णाने रूक्मिणीला पंगतीत स्वतःच्या शेजारी प्रेमाच्या आग्रहाने जेवण्यासाठी बसवून घेतले. हास्यविनोदाच्या वातावरणात चाललेल्या भोजनाची रंगत अधिकच वाढत होती. भोजनोत्तर रूक्मिणीने स्वतःच्या हाताने तयार केलेला तांबूल कृष्ण व सुदामा या उभयतांना दिला. कृष्णाने आपले दोन्ही हात वर करून ‘अन्नदात्याचे परमेश्वर कल्याण करो’ असे साभिप्राय उद्गार रूक्मिणीकडे बघून विनोदाने काढले आणि रूक्मिणीही आपले दोन्ही हात वर करून ‘तथास्तु’ असे हेतूपुरस्सरच म्हणाली. कृष्ण व रूक्मिणी यांच्यातील हे प्रेम बघून सुदामाही अत्यंत सुखावला. कृष्णाकडे सहेतुक पाहून स्मितहास्य करणाऱ्या सुदाम्याचा हात कृष्णाने आपल्या हातात घेतला आणि त्याला घेऊन कृष्ण राजवाड्याच्या गच्चीवर गेला. तेथेच ठेवलेल्या एका सुवर्णमंचकावर कृष्ण सुदाम्यासह बसला.

वातावरणातील सुखद गारव्याने सुदाम्याचे तन व मन दोन्हीही अत्यंत सुखावले होते. मनाच्या त्याच अवस्थेत सुदाम्याने कृष्णाकडे पाहिले तर कृष्ण वर नजर करून, विशाल गगनाकडे एकटक नजरेने पाहात असल्याचे सुदाम्याच्या लक्षात आले. ‘कृष्णालाही आकर्षित करून घेण्यासारखे एवढे

काय आहे बरे?’ असा विचार मनात येऊन सुदामाही कुतूहलाने वरती आकाशाकडे पाहू लागला मात्र, तोही एकदम चकितच झाला.

सोळा कलांनी युक्त होऊन पौर्णिमेचा पूर्ण चंद्रमा आपल्या शीतल चांदण्याच्या प्रकाशाने सर्व गगनालाच उजळून व व्यापून राहिलेला होता. त्याच्या शांत तेजापुढे आकाशातील चमचमणाऱ्या असंख्य ताऱ्यांचा प्रकाशही फिकाच जाणवत होता. वाऱ्याच्या हलक्या झुळूकेवर इतस्ततः बागडणाऱ्या पांढऱ्या शुभ्र ढगांचा, त्या ताऱ्यांबरोबर जणू लपंडावाचा खेळच चालला होता आणि त्या खेळात त्यांनी चंद्रालाही हक्काने सामील करून घेतले होते. ताऱ्यांच्या नादाने ढगांबरोबर खेळताना चंद्रही अनेक वेळा ढगांच्या आड लपल्यासारखा होई आणि पुन्हा पुन्हा प्रगट होई. परंतु तरीही ढगांच्या पातळ व पारदर्शक पडद्यातूनही, चांदण्याची बरसात कुठलाही आडपडदा न ठेवता होतच राही आणि रात्रीच्या समयी आकाशामध्ये असलेल्या चंद्राच्या स्वयंभू व अविरोध सत्तेची जाणीव व खात्री करून देई. चंद्राच्या शीतल चांदण्याचे मधुर रसपान करण्यात दंग असलेल्या सुदाम्याने त्याच धुंदीत कृष्णाकडे पाहिले आणि कृष्णप्रेमाने त्याचे मन एकदम उचंबळून आले.

सुदामा कितीतरी वेळ कृष्णाकडे एकटक नजरेने पाहातच राहिला. पाहता पाहता सुदाम्याला एकदम जाणवले, ‘अरे, या कृष्णाचे सुंदर व प्रसन्न मुखकमल तर त्या आकाशातील चंद्रापेक्षाही विलोभनीय व शोभनीय आहे. कृष्णाच्या मुखचंद्रावरील शांत प्रेमाचा भाव हा तर अत्यंत रमणीय आहे. मनाला त्याचे मनपण विसरायला लावून कृष्णप्रेमाने युक्त करून ठेवण्याचे सामर्थ्य कृष्णाच्या या प्रेमरूपात आहे. प्रेमाचे चैतन्य कृष्णाच्या मुखावर पूर्णपणे विलसत आहे आणि कृष्णाच्या प्रेमाचे चांदणे तर त्याच्या नेत्रांतून सतत बरसत आहे. या कृष्णरूपी प्रेमचंद्राला व त्याच्या प्रेमचांदण्याला कशानेही व कधीही बाधा येत नाही. आकाशातील चंद्राला तर क्षय आहे पण हा कृष्णचंद्र तर अक्षय प्रेमाचा व आनंदाचा निधीच आहे. आकाशातील चंद्र ही प्रेमाची देवता समजली जाते, पण हा कृष्ण तर प्रेमस्वरूप असा देवच आहे आणि म्हणूनच तर त्याच्या ठायी प्रेमाची देवघेव नित्य घडत असते.





त्यामुळेच कृष्णाची भक्ती घडणे शक्य होऊन आनंदाचा अनुभव घेता येतो. एवढेच नव्हे, तर कृष्णाच्या भक्तांचीही अवस्था कृष्णासारखीच प्रेमस्वरूप होऊन राहते आणि त्याच्या भक्तांना आनंदाचा ठेवा स्वतःच्याच ठायी सापडतो.’

• • •

# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी



श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला





आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ ‘दत्त हाचि अवधूत’ २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह ‘आनंदाचे डोही’ २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. ‘दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा’ ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे ‘दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा’ हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या . मोबाईलवर आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य